(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

राज्यातील कृषि विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांना

आश्वासित प्रगत योजना लागू करण्याबाबत

(1) * **२८७२ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतीश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील कृषी विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांना आश्वासित प्रगत योजना (वेतन श्रेणी व निवड श्रेणी) लागू झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अन्य विद्यापीठातील प्राध्यापकांना ही योजना लागू आहे काय,

(3) असल्यास, कृषी विद्यापीठातील प्राध्यापकांवर होणारा अन्याय शासन केव्हा दूर करणार आहे,

(4) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) होय.

(2) नाही.

(3) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरात थोडी दुरुस्ती करु इच्छितो लेखी उत्तरातील पहिल्या प्रश्नाचे उत्तर "होय"असे दिलेले आहे ऐवजी "नाही" असे वाचावे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी पहिल्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे सांगितले. माझा प्रश्न आहे की, राज्यातील प्राध्यापकांना ही योजना केव्हा पासून लागू करणार आहात ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, कृषी विद्यापीठातील प्राध्यापक पद हे "अ" वर्गात मोडत असल्यामुळे तसेच त्यांच्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केल्यानुसार कारकीर्द उंचविण्यासाठी (CES) योजना राबविण्यात येत आहे. त्यामुळे त्यांना सेवातंर्गत आश्वासित प्रगत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

योजना लागू करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. ते या योजनेमध्ये नसते तर त्यांचा विचार करण्यात आला असता.

17-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-2

AJIT/ AKN/ ST/ 12:00

ता.प्र.क्र.2872...

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, अशाप्रकारची समांतर स्कीम चालू आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अशी समांतर स्कीम चालू नाही. ही पदे "अ" वर्गातील असल्यामुळे या विद्यापीठांना अनुदान आयोगाच्या माध्यमातून सीईएस योजना लागू आहे. त्यामुळे अन्य आश्वासित प्रगत योजना लागू करण्याचा प्रश्न नाही.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, राहुरी विद्यापीठात ही योजना लागू नाही असे समजते. राहुरी विद्यापीठाला ही योजना लागू आहे किंवा कसे याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राहुरी कृषी वा राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांना सीईएस योजना लागू आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यवतमाळ जिल्ह्यात सन २००५ मध्ये अतिवृष्टीमुळे बेघर

झालेल्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत

(2) * ३४३५ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) यवतमाळ जिल्ह्यात सन २००५ च्या अतिवृष्टीत २४ गावे बेघर झाली असून अनेक वेळा पाहणी, दौरे करुन या गावांचे माहे डिसेंबर, २०१४ अखेर पुनर्वसन करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(3) तसेच सदर गावांचे तातडीने पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप कांबळे, श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता : (१) होय.

(2) सुधारित प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(3) मौजा.भिमकुंड, मौजा सावंगी ता.घाटंजी या दोन गावाचे सुधारित प्रस्ताव शासनास प्राप्त आहेत. उर्वरित गावाचे सुधारित प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(4) सदर प्रस्तावामध्ये मोजणीबाबत हद्द कायम करणे तसेच अभिन्यास तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यातील 24 गावे पूर्णतः बाधित आहेत काय, असल्यास त्यांच्या पुनर्वसनाबाबत शासनाचे काय धोरण आहे, या 24 गावांचे पुनर्वसन करण्यासाठी सन 2007-08 मध्ये शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाला होता काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, ही 24 गावे वेगवेगळी आणि बाधित आहेत. शासनाकडे काही गावांचा सुधारित प्रस्ताव आलेला आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मौजा भीमकुंड, मौजा सावंगी, ता.घाटंजी या दोन गावांच्या पुनर्वसनासाठी किती निधीची आवश्यकता आहे आणि सदर गावांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर केव्हा ठेवण्यात येईल?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, या दोन गावांचे प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले आहेत. उर्वरित गावांचे प्रस्ताव घेण्याचे काम सुरु आहे. दोन्ही गावांच्या पुनर्वसनासाठी किती निधीची आवश्यकता आहे याची माहिती मी आता सांगू शकत नाही. ..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3435....

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, हा प्रश्न यवतमाळ जिल्ह्यातील आहे हे मला माहीत आहे. परंतु 1976 पासून नंदूरबार जिल्ह्यातील तापी काठावरील 10 गावांचा पुनर्वसनाचा प्रश्न अजून प्रलंबित आहे. आपण पुनर्वसनासाठी जमिनी घेतलेल्या आहेत. परंतु अजूनपर्यंत त्या 10 गावांचे पुनर्वसन झालेले नाही. मध्यंतरी नदीला पूर आला असताना गाव वाहून जाईल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. आम्हाला फक्त प्लॉट द्यावेत अशी गावातील लोकांनी मागणी केली आहे. कारण त्यावेळी घर बांधण्यासाठी सत्तर हजार, एक लाख की दीड लाख रुपये द्यावेत याचा शासन स्तरावर निर्णय झालेला नव्हता. माझा प्रश्न आहे की, तापी काठावरील 10 गावातील लोकांना प्लॉट वितरित करण्यात येईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न मूळ प्रश्नाशी संबंधित नाही. तरी देखील मी त्याचे उत्तर देतो. पूरग्रस्त आणि धरणग्रस्त यामध्ये फरक आहे. तापी काठावरील घरे ही पूरग्रस्त प्रकारातील आहेत. नदीला पूर आला तर त्यांना कधीतरी फटका बसू शकतो. परंतु ती 10 गावे कोणत्याही प्रकल्पामध्ये बाधित झालेली नाहीत. अशाप्रकारच्या पूरग्रस्त गावांना फक्त प्लॉटचे वाटप करण्यात येते. त्यांना अन्य सुविधा देण्यात येत नाहीत. अस्तित्वात असलेल्या नियमानुसार त्यांना फक्त प्लॉटचे वाटप करता येईल. त्या गावातील लोकांना प्लॉट मिळाले नसतील तर त्यांना ते देता येईल का याबाबत तपासणी करण्यात येईल. कारण हा 1976 पासूनचा प्रश्न आहे. तेव्हा नेमकी काय परिस्थिती होती हे तपासून घेण्यात येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यातील नद्यांना सातत्याने पूर येऊन नद्यांचे पाणी गावांमध्ये शिरत आहे. नद्यांना आलेल्या पुरामुळे अनेक घरे वाहून जातात आणि नदीकाठावरील घरांना धोका निर्माण होतो. सन 2005 पासून अशा गावांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न सुरु आहे, परंतु त्यास अद्याप यश आलेले नाही. त्याचे कारण म्हणजे त्या ठिकाणी जमिनी उपलब्ध करुन घेतल्यानंतर त्या गावकऱ्यांच्या पसंतीला येतीलच असे नाही, असा तिढा असल्यामुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3435....

श्री.माणिकराव ठाकरे...

शासनाचे त्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. परंतु आपण त्याकडे दुर्लक्ष केल्यास, एखादी मोठी आपत्ती आल्यास मोठे नुकसान होऊ शकते. तेव्हा तेथील लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी शासन तातडीने जमीन अधिग्रहण करण्यासाठी पावले उचलणार काय ? दारव्हा तालुक्यातील हातगावामध्ये नदीचे पाणी घुसत आहे. त्यामुळे गावच्या गावे वाहून जाण्याची शक्यता आहे. त्या ठिकाणी पुनर्वसनासाठी पर्यायी जमीन शोधण्यात आलेली नाही की, त्या गावांचे पुनर्वसन झालेले नाही. तेव्हा यवतमाळ जिल्ह्यातील पूरग्रस्त गावांचे प्रश्न सोडविण्यासाठी मंत्री महोदय बैठक घेतील काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन 2005-05मध्ये आलेल्या पुरामुळे ही गावे बाधित होऊन गावाचे नुकसान झाले होते. त्यानंतर कुठेही पुराचा धोका आलेला नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे काही ठिकाणी शासन त्याबाबत नक्की विचार करेल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन 2005-06 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे यवतमाळ जिल्ह्यातील काही गावांचे फार नुकसान झाले होते. जवळपास 2 हजार 64 हेक्टर जमीन वाहून गेली होती. सन 2007-08 मध्ये शासनाकडे या गावांच्या पुनर्वसनाबाबत प्रस्ताव आला होता. या सर्व गावांचे पुनर्वसन करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे, या गावांचे केव्हा पुनर्वसन होणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे् : सभापती महोदय, या गावांचे पुनर्वसन करण्याचा विचार सध्या तरी नाही. त्या ठिकाणी सातत्याने पूर येत असेल, त्यामध्ये घरे वाहून गेली असतील, गावाला त्याला फटका बसला असेल तर त्या गावांचे पुनर्वसन करण्याचा विचार करण्यात येईल. त्या गावांमध्ये सन 2005मध्ये पूर आला आणि त्यानंतर मागील दहा वर्षात या गावांना पुराचा फटका बसलेला नाही. पुरामुळे वारंवार नुकसान होत असेल तर त्याबाबत राज्य शासनाकडून नक्की विचार करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संदिप बाजोरिया यांनी या विषयीचा प्रश्न दुसऱ्यांदा विचारला आहे. त्या भागात अविवृष्टी येऊन आज 10 वर्षे झाली आहेत. माननीय मंत्र्यांनी आताच सांगितले की, आता त्या भागात पूर येत नाही. वास्तविक पाहता 2005 साली ज्या ठिकाणी पूर आला होता आणि त्यात जे बेघर झाले होते त्यांच्या पुनर्वसनाबाबतचा हा प्रश्न आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, अजूनपर्यंत त्या लोकांचे पुनर्वसन का झाले नाही आणि ते पुनर्वसन केव्हापर्यंत करण्यात येईल ? पूरग्रस्तांना मदत देण्याबाबतचा हा प्रश्न नाही, तर त्यांच्या पुनर्वसनाचा हा प्रश्न आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, ज्या अधिकाऱ्यांनी या लोकांचे पुनर्वसन करण्यात टाळाटाळ केली त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, ज्या भागात वारंवार हानी होत असेल, अतिवृष्टीचा फटका बसत असेल तर त्या ठिकाणी नक्की पुनर्वसनाचा विचार करण्यात येईल. परंतु यापूर्वी त्या भागातील कोणत्याही गावांना वारंवार अतिवृष्टीचा त्रास झालेला नाही किंवा त्याचा फटका बसलेला नाही. ज्या दोन गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे त्या गावांच्या पुनर्वसनाबाबतचा सुधारित प्रस्ताव शासनाने मागविलेला आहे. पुनर्वसनाच्या निकषामध्ये जर ती गावे बसत असतील तर राज्य सरकार त्या गावांच्या पुनर्वसनाबाबत नक्की प्रयत्न करेल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, 2005 च्या अतिवृष्टीमध्ये 24 गावे बेघर झाली होती, परंतु त्यापैकी दोन बाधित गावांच्या पुनर्वसनाचा विचार होणार आहे. बाकी गावांमध्ये गेल्या 10 वर्षात वारंवार पूर परिस्थिती आली नाही, म्हणून त्या गावांचा विचार या योजनेत केला जाणार नाही, असेही माननीय मंत्र्यांनी शासनाच्या वतीने सांगितले. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी विचारले की, 2005 साली झालेल्या अतिवृष्टीचा 24 गावांना फटका बसला होता. त्या गावातील लोक बेघर झाले होते. परंतु नंतरच्या कालखंडात उर्वरित गावे बाधित झालेली नाहीत. वास्तविक पाहता 2005 च्या अतिवृष्टीमध्ये ती गावे बाधित झाली होती आणि त्यांची घरे नष्ट झाली होती. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, अशा बाधित कुटुंबांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्यासाठी आणि त्यांना मदत करण्यासाठी शासन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3435....

श्री.हेमंत टकले...

काय उपाययोजना करणार आहे आणि त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार केला जाईल. पुरापासून त्या लोकांचा बचाव झाला पाहिजे यासाठी अन्य मार्गांचा विचार केला जात आहे. गेल्या 10 वर्षात त्या गावांना पुराचा फटका बसला नाही. पुढच्या कालखंडात त्या भागाला पुराचा फटका बसू नये याची काळजी घेण्यासाठी त्या भागात संरक्षक भिंत बांधणे, नदीकाठचा प्रदेश उंच करणे आणि तेथे पाणी पाहोचणार नाही यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, या सारख्या व्यवस्था राज्य सरकार तपासून करेल.

श्री.विनायक मेटे : महोदय, 2004 मध्ये त्या भागातील 24 गावे बेघर झाली. 2014 पर्यंत त्या गावांचे पुनर्वसन झालेले नाही. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "मौजा भिमकुंड व मौजा सावंगी, ता.घाटंजी या दोन गावांचे सुधारित प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहे. उर्वरित गावांचे सुधारित प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे." परंतु आताच माननीय मंत्र्यांनी सांगितले की, त्या गावांच्या पुनर्वसनाबाबत उपाययोजना केली जाणार नाही. जर त्या गावांचे पुनर्वसन केले जाणार नाही तर मग उर्वरित गावांचे सुधारित प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही का सुरु आहे ? माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारले की, पुनर्वसनाच्या कामी नेमका किती खर्च अपेक्षित आहे. परंतु माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, त्या बाबतची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, जर गावांनी सुधारित प्रस्ताव पाठविला असेल तर त्यामध्ये काय अंतर्भूत केलेले आहे, जर प्रस्तावामध्ये खर्चाची आकडेवारी नसेल तर त्यामध्ये नेमके काय नमूद केले आहे ? महोदय, दोन गावांचा प्रस्ताव मंजूर होऊन ते काम केव्हा सुरु होईल, तसेच उर्वरित गावांच्या बाबतीत काय निर्णय घेतला जाणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपल्याकडे पूरग्रस्त आणि प्रकल्पग्रस्त हे दोन वेगवेगळे कायदे आहेत. पूरग्रस्तांच्या पुनर्वसनाची कायद्यात तरतूद नाही. ज्या ठिकाणी पूरग्रस्त आहेत अशा लोकांना नागरी सुविधा देणे, नुकसान भरपाई देणे, पुनर्वसन कायद्याअंतर्गत बाबींचा लाभ देणे अनुज्ञेय नाही. महोदय, सन्माननीय सदस्यांनी पुनर्वसनाची मागणी केली असली तरी,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3435....

श्री.एकनाथराव खडसे....

मी सांगू इच्छितो की, ते लोक पूरग्रस्त आहेत. पूरग्रस्तांच्या सोयीसाठी कायमस्वरूपी गावठाण बसविणे, त्यांना प्लॉट देणे, मूलभूत सोयी उपलब्ध करून देणे याची कायद्यात तरतूद नाही. पण पूरग्रस्तांचे नुकसान झाले तर त्यांना मदत केली पाहिजे या भूमिकेतून जागा उपलब्ध असेल तर दुसऱ्या जागेवर प्लॉट देणे, बीपीएल, अनुसूचित जमाती, अनुसूचित जातीच्या लोकांची यादी करून त्यांना अस्तित्वात असलेल्या योजनेच्या माध्यमातून घरे बांधून देण्याचा कार्यक्रम राज्य सरकार हाती घेत आहे. सध्या दोन गावांचा सुधारित प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. त्या प्रस्तावामध्ये पैशांचा आणि अंदाजपत्रकाचा उल्लेख नाही. त्या प्रस्तावात घर किती उंचीवर आहे, काही उपाययोजना करता येईल, संरक्षक भिंत बांधून होणारे नुकसान थांबविता येईल काय या गोष्टींचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

रेडीरेकनर व स्टॅम्प डयुटीचे वाढलेले दर कमी करण्याबाबत

(3) * 3818 श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनील तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड. हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनंत गाडगीळ, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, प्रा.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयवंतराव जाधव, डॉ.अपूर्व हिरे: सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सन 2014-2015 सालासाठी रेडीरेकनर व स्टॅम्प ड्युटीच्या दरात 14 ते 18 टक्के वाढ करण्यात आलेली असून ही दरवाढ करतांना कोणत्याही शास्त्रशुध्द निकषांचा विचार केला गेलेला नाही किंवा स्वतंत्र नियामक आयोग नेमण्यात आलेला नाही. नवीन भूमापन कायद्यामुळे शासकीय प्रकल्पांसाठी लागणाऱ्या जागांचेही दर वाढणार असून त्याचा फटका शासकीय प्रकल्पानांही बसणार आहे, असे माहे जानेवारी, 2015 च्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास रेडीरेकनर आणि स्टॅम्प ड्युटीत वाढ केल्याने राज्यातील सर्व स्तरातून नाराजी व्यक्त करण्यात येत असून रेडीरेकनरचे दर ठरवितांना शासनाने कोणते निकष विचारात घेतले आहेत,
(3) असल्यास, रेडीरेकनर आणि स्टॅम्प ड्युटीचे दर कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथराव खडसे : (1) व (2) राज्यातील सन 2015 साठी वार्षिक मूल्यदर तक्त्यातील सर्वसाधारणपणे सरासरी वाढ 14 % असून ती मर्यादित स्वरुपात असून काही क्षेत्रात सन 2014 चे दर सन 2015 करिता कायम ठेवण्यात आलेले आहेत. मुद्रांक शुल्क हे कर आकारणीशी संबंधित असल्याने नियामक आयोगाची आवश्यकता नाही. भूसंपादन कायदा 2013 मधील तरतुदीनंसार जमिनीचा मोबदला निश्चित करण्याची कार्यवाही करणे कायद्याने बंधनकारक आहे.

वार्षिक मूल्यदार तक्ते हे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम व मुंबई मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम 1995 मधील तरतुदी, कार्यपध्दती तसेच नोंदणीकृत खरेदी विक्री व्यवहारातील दर, व्यवहारांची संख्या, वास्तु प्रदर्शनातील दर, स्थानिक चौकशीतील दर इ. आधारे तयार केले जातात. वार्षिक मूल्यदार तक्त्यांचे प्रस्तावावर, जिल्हाधिकारी यांचे अध्येक्षतेखाली मा. लोकप्रतिधी यांचे समवेत बैठक आयोजित करुन चर्चा केली जाते त्यानंतर प्रती वर्षी दि. 01 जानेवारी रोजी निर्गमित करण्यात येतात.
(3) सन 2015 चे वार्षिक मूल्यदर तक्ते दि.01 जानेवारी, 2015 पासून अंमलात आले असून, वार्षिक मूल्यदर तक्ते अंमलात आलेनंतर त्यामधील दर कमी करणेबाबत नियमात तरतूद नाही. तथापि, वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दर मान्य नसल्यास, दस्त नोंदविणेकामी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 31 अन्वये अभिनिर्णयाकरिता अर्ज करुन सुधारित दर निश्चित करुन घेण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 3818....

श्री.एकनाथराव खडसे....

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम व मुंबई मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम 1995, अंतर्गत जे बाजारमूल्य ठरविण्यात येते ते शास्त्रोक्त पध्दतीवर आधारित नाही अशा स्वरूपाचे वक्तव्य मंत्री महोदयांनी केले होते. वास्तविक पाहता बाजारमूल्याचे पुनर्विलोकन करण्यासाठी श्री.मिलिंद म्हैसकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने आपला अहवाल सादर केलेला आहे. माझी विनंती आहे की, माननीय मंत्र्यांनी त्या समितीच्या अहवालाबाबतची माहिती सभागृहाला द्यावी.

महोदय, पूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यात रेडी रेकनरच्या दरात 300 टक्के वाढ करण्यात आली होती. ते वास्तव असल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात दरवाढ करु नये अशा प्रकारचा निर्णय झाला होता. असे असताना त्या जिल्ह्याच्या रेडी रेकनर दरात वाढ करण्यात आली आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, त्या ठिकाणी दरवाढ करु नये असा निर्णय झाला असताना तेथे रेडी रेकनरच्या दरात वाढ का करण्यात आली ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मिलिंद म्हैसकर समितीने आणि अन्य समित्यांनी या विषयाच्या संदर्भात रेडी रेकनरचे दर कोणत्या प्रकारचे असावयास पाहिजे या बाबतीत काही निकष सुचविले होते. उदाहरणार्थ मागच्या कालखंडातील रेडी रेकनरच्या निकषात काही सुधारणा करता येईल काय, हे सुचविले होते. आपल्याला माहीत आहे की, शहरी भागात वस्त्या आणि शहर वाढत चालले आहे. त्यामुळे शहरालगतच्या जमिनींचे भाव वाढलेले आहेत. शहरात रेडी रेकनरचा दर काय असेल, शहरालगत तो काय असेल, भावी कालखंडात एखाद्या ठिकाणी प्रकल्प होऊ घातल्याचे माहीत झाल्यानंतर त्या भागातील जमिनीच्या किंमती वाढतात, अशा ठिकाणी रेडी रेकनरचा दर कोणता असावयास पाहिजे या संदर्भात समितीने केलेल्या शिफारशी सरकारकडे आलेल्या आहेत. त्यानुसार रेडी रेकनरचा दर ठरविण्यात येतो. समितीने ज्या प्रमुख 14-15 शिफारशी केल्या होत्या त्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, 2014 मध्ये रेडी रेकनरचा दर मोठ्या प्रमाणावर वाढला. त्यावेळी तत्कालीन विरोधी पक्ष नेते असलेले माननीय श्री.एकनाथराव खडसे यांनी, तत्कालीन महसूल मंत्र्यांची भेट घेऊन वाढलेल्या रेडी रेकनरच्या दरावर स्थगिती घेतली होती. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, त्यांच्या त्या वेळच्या धोरणात काही बदल झाला आहे काय ? तसेच दुसरी बाब अशी की, हिरानंदानी यांची कोलशेत येथे टाऊनशिप आहे. त्या ठिकाणी रेडी रेकनरच्या दरापेक्षा कमी दराने आकारणी केली गेली होती, या बाबतीत जो आक्षेप होता त्या बाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, नाशिक शहरातील नागरिकांचा रेडी रेकनरचा दर जास्त आकारण्यात आल्याबाबतची तक्रार होती. त्यामुळे मागच्या कालखंडात तत्कालीन महसूल मंत्र्यांची भेट घेऊन सदरहू बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्या कालखंडात वाढीव दराला स्थगित देण्यात आली होती. त्या काळात आकारण्यात येणारा वाढीव दर शासनाने कमी केला नव्हता. पुढील कालखंडात रेडी रेकनरच्या दरात काही चुका असतील तर त्या दुरस्त करण्याचे आश्वासन सरकारने सभागृहात दिले होते. पूर्वीच्या रेडी रेकनरच्या दरात जी अनियमितता वाटली किंवा थोडीशी त्रुटी आढळली त्या बाबतची दुरुस्ती करुन आताचे रेडी रेकनरचे दर ठरविलेले आहेत. पूर्वीच्या दरामध्ये दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

महोदय, दुसरी बाब अशी की, कोलशेत येथे रेडी रेकनरच्या दरापेक्षा कमी दर आकारण्यात आल्याचे माननीय सदस्यांनी सांगितले. या बाबतची तपासणी राज्य सरकारकडून करण्यात आली आहे. त्यामध्ये फारसे तथ्य आढळून आले नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, वार्षिक मूल्यदर तक्त्यांचे प्रस्तावावर, जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली माननीय लोकप्रतिनिधी यांचे समवेत बैठक आयोजित करुन चर्चा केली जाते. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या संदर्भात राज्यातील किती जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींबरोबर बैठका घेतल्या आहेत आणि जर बैठका घेतल्या नसतील तर शासन त्यांच्यावर काय कारवाई करणार आहे ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, रेडी रेकनरचा दर जाहीर करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींसमवेत बैठक आयोजित करून चर्चा करावी अशा सूचना सरकारच्या वतीने दिलेल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी नोव्हेंबर महिन्यात लोकप्रतिनिधींबरोबर बैठक आयोजित केली होती.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3818....

श्री. एकनाथराव खडसे ....

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये नोव्हेंबर महिन्याच्या आसपास अशा बैठका घेतल्या होत्या. परंतु त्याच दरम्यान आचारसंहिता लागल्यामुळे लोकप्रतिनिधी बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत असे मला विभागाकडून सांगण्यात आले. काही ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून बैठका झालेल्या आहेत आणि काही ठिकाणी आचारसंहिता लागल्यामुळे बैठका होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना अहवाल पाठविला आहे.

श्री. अनंत गाडगीळ : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे की, मुंबई मुद्रांक, 1995 च्या आधारे ही प्रक्रिया केली आहे. सभापती महोदय, त्यामध्ये एक निकष आहे. वास्तू प्रदर्शनातील दर विचारात घेतले आहेत. विकासक वास्तू प्रदर्शनामध्ये सर्वांत जास्त दर लावून घरे विकणार आहेत. पुण्याच्या परिसरात पिंपळे-सौदागर-वाकड येथे बेस रेट 7 हजार रुपये धरला आहे आणि पुणे शहरातील प्रमुख ठिकाणी सुध्दा बेस रेट 7 हजार रुपयेच धरला आहे. त्यामुळे ही विसंगती का आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दरपत्रक ठरविताना विविध स्वरूपाच्या बाबी लक्षात घेतल्या जातात. सन्माननीय सदस्य पुणे शहरातील वाकडच्या संदर्भात तसेच अन्य ठिकाणांच्या संदर्भात सांगत आहेत. आपण या प्रक्रियेसाठी सर्वसाधारपणे 3-4 सूत्रे विचारात घेतो. अनेक जमिनी विकसित झालेल्या आहे. पुणे शहरात अस्तित्वात असलेल्या ठिकाणी फारशी भाव वाढ होणार नाही आणि फारच झाले तर 5-10 टक्क्यांच्या पलीकडे भाव वाढत नाही असा आपला अंदाज आहे. मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक इत्यादी जिल्ह्यांच्या शेजारी लागून असलेल्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात नव्याने बांधकाम उभे राहत असते. परंतु जागा एनए झालेली नसते, शेतीची जागा असते. जागा एनए करून त्यावर इमारत बांधण्याची प्रक्रिया सुरू असते. शहरी भागातील रस्ते अर्बन नसतात, ती ग्रामपंचायतीची जमीन असते. त्यामुळे अशा ठिकाणी विस्ताराच्या दृष्टीने दरपत्रकात त्यांचा विचार केला जातो, मग ते औरंगाबाद, नाशिक सारखे शहर असेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3818....

श्री. एकनाथराव खडसे ....

आपल्याला यावर्षी अनुभव आलेला आहे की, संभाजीनगर शहरामध्ये रेडिरेकनरचे दर ठरविताना, त्याला लागून असलेल्या क्षेत्रामधील दर हे संभाजीनगर शहरापेक्षा अधिकचे करावे लागले. ते शहर नव्हते. परंतु शेंद्रा एमआयडीसीमध्ये केंद्र सरकारच्या माध्यमयातून साडे चार हजार कोटी रुपयांचा प्रकल्प येत आहे असे सांगून त्या प्रकल्पाला काही प्रमाणात प्रत्यक्षरित्या पैसा दिला तेव्हा त्या ठिकाणचे भाव वाढले. मात्र तोपर्यंत तेथील भाव कमी होते. प्रत्यक्षात प्रकल्प उभारत आहे असे पाहिल्यानंतर तेथील भाव वाढले. ती शेत जमीन आहे. तेथे एनए होत आहे.

सभापती महोदय, नगरपालिका, 'अ' वर्ग नगरपालिका, महानगरपालिका, इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट झोन, व्यापारी क्षेत्र, ट्रेडिंगच्या संदर्भातील विस्ताराचे झोन अशा स्वरूपाचे वेगवेगळे निकष लक्षात घेऊन तेथे भाव किती असू शकतात किंवा किती किंमतीने ते विकले जातात हा एक भाग आहे. मागच्या 5 वर्षांमध्ये झालेल्या खरेदी विक्रीच्या व्यवहारांमध्ये रेडिरेकनरप्रमाणे किती व्यवहार झाले, रेडिरेकनरच्या दरापेक्षा काही जास्त किंमतीने विकले गेले की काय यामधून एक ॲव्हरेज काढून, मूल्यांकनाला समोर ठेवून, रेडिरेकनरच्या दरांचा अंतिम निर्णय केला जातो.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, पूर्वीच्या शासनाने मिलिंद म्हैसकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली होती. समितीने रेडिरेकनरच्या बाबतीत काही शिफारशी केल्या होत्या. आता रेडिरेकनरच्या दरात वाढ करीत असताना त्या शिफारशी गृहीत धरल्या गेल्या का ? संपूर्ण जिल्ह्याला युनिट समजले जाते आणि जिल्ह्यामध्ये शेती व बिनशेतीचे अनेक खरेदी विक्रीचे व्यवहार होतात. या सर्व व्यवहारांची माहिती घेण्यासाठी आपल्याकडे कोणती यंत्रणा उपलब्ध आहे, केवळ एक जिल्हा निबंधक व तालुक्याचा दुय्यम निबंधक एवढीच यंत्रणा असेल तर या दोन्ही यंत्रणांच्या आधारावर रेडिरेकनरचा दर कसा काय ठरविण्यात येऊ शकतो ? सर्वसाधारणपणे यावेळी 14 टक्यांची वाढ झाली आहे असे म्हटले जाते. परंतु, वस्तुस्थिती अशी आहे की, त्याच्या कितीतरी पटीने जास्त वाढ झाली आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3818....

श्री. धनंजय मुंडे ....

शासनाने यापूर्वीही सन 2007-08 मध्ये रेडिरेकनरच्या बाबतीत पुनर्विचार करून त्यास स्थगिती दिली होती. आताची परिस्थिती देखील तशीच आहे. शासनाने आताच रेडिरेकनरमध्ये 14 टक्के वाढ केली आहे. शासन त्याबाबतीत पुनर्विचार करून रेडिरेकनरचे दर रद्द करेल किंवा कमी करेल का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, रेडिरेकनरचे दर ठरविण्यासाठी नगररचना विभागाचे नगररचनाकार अधिकारी असतात, महसूल विभागाचे मूल्यांकन अधिकारी असतात. तांत्रिक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून ही प्रक्रिया केली जाते. सह संचालक, नगररचना यांचा देखील त्यामध्ये समावेश असतो. मूल्यांकन, मोजणी, खरेदी या संदर्भातील निर्णय तांत्रिक अधिकाऱ्यांच्या सहमतीने घेतले जातात. शासनाची वर्षानुवर्षे चाललेली ही परंपरा आहे. तांत्रिक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून याचे मूल्यांकन होऊ शकेल. मी पुन्हा सांगतो की, पूर्वीची पध्दत याही वर्षी अवलंबिण्यात आली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहात या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली आहे. माननीय सभापती यांच्याकडून निर्देश देण्यात आले आहेत की, लोकप्रतिनिधींना देखील बैठकींना बोलविण्यात यावे. रेडिरेकनरचे दर ठरविताना अधिकारी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करतात. ठराविक ठिकाणी वजन दिल्यानंतर रेडिरेकनरचा दर कमी करतात आणि नको त्या ठिकाणी दर वाढवतात. त्यामुळे लोकप्रतिनिधींना टाळण्याचे काम होते. माझा प्रश्न असा आहे की, रेडिरेकनरचे दर व्यवस्थित लावले नाहीत अशी लोकप्रतिनिधींनी तक्रार केल्यानंतर शासन त्या संदर्भात गंभीरपणे विचार करून लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देईल का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मिलिंद म्हैसकर समितीच्या शिफारशींमध्ये लोकप्रतिनिधींच्या समवेत चर्चा करावी असा क्लॉज आहे. विभागाचे म्हणणे आहे की, सर्व जिल्ह्यामध्ये बैठका घेऊन त्यामध्ये लोकप्रतिनिधींना बोलाविण्यात आले होते. काही ठिकाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) C.4

MSK/ AKN/ ST/ पूर्वी श्री. बोर्डे 12:20

ता.प्र.क्र.3818....

श्री. एकनाथराव खडसे ....

आचारसंहिता लागल्यामुळे लोकप्रतिनिधींना बैठकांना येता आले नाही. लोकप्रतिनिधींच्या समवेत बैठक घ्यावी असे अपेक्षित आहे. बैठकीत आपल्या विधानसभा क्षेत्रातील वस्तुस्थिती निदर्शनास आणून द्यायची आहे. बैठकीत करण्यात आलेल्या सूचनांचा मूल्यांकन समितीने विचार करायचा आहे. मतदारसंघामध्ये काही तक्रारी असतील तर त्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी बैठकीत मांडाव्यात. समितीने त्या तक्रारींच्या संदर्भात गंभीरतेने विचार करून प्रसिध्दीच्या आत दुरुस्ती करावी अशी शिफारस मिलिंद म्हैसकर समितीने केली आहे. रेडिरेकनरचे दर जाहीर केल्यावर ते बदलविण्याची तरतूद कायद्यात नाही. बदल करायचा असेल तर तो अभिनिर्णयानंतर बदलविता येतो. परंतु यासाठी वेगळी प्रक्रिया पार पाडावी लागते. लोकप्रतिनिधींच्या तक्रारी असतील तर त्यांचा विचार पुढील वर्षाच्या मूल्यांकनाच्या वेळी केला जातो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

लक्षवेधी सूचनेसंबंधी अधिक माहिती पटलावर ठेवण्यासंबंधी

उप सभापती : माननीय ऊर्जा मंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने अधिक माहिती दुसऱ्या दिवशी पटलावर ठेवण्याबाबत आश्वासन दिले होते.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, 10 तारखेला दाभोळ वीज प्रकल्पाच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना चर्चेला आली असताना मी त्या संबंधी एक प्रश्न विचारला होता. माननीय मंत्र्यांनी त्या संदर्भातील अधिकची माहिती दुसऱ्या दिवशी तातडीने पटलावर ठेवण्याचे आश्वासन दिले होते. अद्याप ती माहिती आम्हाला मिळालेली नाही. माननीय मंत्र्यांनी अधिकची माहिती पटलावर ठेवावी अशी माझी विनंती आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, होय.

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

(पुढे सुरू ....

राज्यात वाढलेले वजचे दर कमी करण्याबाबत

(४) * ४१२७ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने हिवाळी अधिवेशनाच्या सुरूवातीस वीजदरातील सबसिडी कमान पुढे ३ महिने म्हणजे माहे, जानेवारी, २०१५ अखेरपर्यंत सुरु ठेवू, असे जाहीर आश्वासन दिले असतानाही प्रत्यक्षात केवळ माहे नोव्हेंबर, २०१४ या एकाच महिन्यात अनुदान दिले गेले परंतु पुढील दोन महिन्यांबाबत अद्यापही कोणताही निर्णय झाला नसल्याने वीज ग्राहकांना माहे डसेंबर, २०१४ ची देयके जानेवारीमध्ये वाढीव दराने आल्यामुळे ग्राहकांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे माहे, जानेवारी, २०१४ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील वाढलेले वीजदर कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, वलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) अंशतः खरे आहे.
(२) वीज कायदा २००३ नुसार सर्व वर्गवारीच्या वीज ग्राहकांचे वीज दर ठरवण्याचे अधिकार वीज नियामक आयोगास असून आयोगाने जानेवारी २०१५ अन्वये निर्धारित केलेल्या दराने वीज देयकांची आकारणी करण्यात येत आहे. राज्यातील औद्योगिक ग्राहकांची नोव्हेंबर २०१४ च्या वीज वापराची बिले एका महिन्यांपुरती सवलतीच्या दरात देण्यात आली. तसेच कृषी ग्रांहकांची वीज दरातील सवलत पुढे चालू ठेवण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4127.....

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने असा प्रश्न विचारण्यात आला आहे की, "शासनाने हिवाळी अधिवेशनाच्या सुरुवातीस वीज दरातील सबसिडी किमान पुढे 3 महिने म्हणजे माहे जानेवारी, 2015 अखेरपर्यंत सुरु ठेवू, असे जाहीर आश्वासन दिले असतानाही प्रत्यक्षात केवळ माहे नोव्हेंबर, 2014 या एकाच महिन्यात अनुदान दिले गेले आहे....." या प्रश्नाला शासनाने "अंशतः खरे आहे," असे उत्तर दिलेले आहे.

सभापती महोदय, दिनांक 3 फेब्रुवारी 2015 रोजी वीज ग्राहक आणि औद्योगिक संघटनांची एक राज्यस्तरीय व्यापक परिषद मुंबई येथे घेण्यात आली होती. राज्यातील विजेचे दर वाढलेले आहेत आणि ते शेजारच्या गुजरात राज्यापेक्षा जास्त आहेत, हे दर स्थिर ठेवावेत, अशी मागणी या परिषदेत करण्यात आली होती. या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

सभापती महोदय, वीज देयकांचे वितरण व वीज देयकांची वसुली करणे यासाठी शासनाने आऊटसोर्सिंग केले असून नागपूर विभागासाठी स्पॅन्को या कंपनीची नेमणूक केली आहे. पूर्वी एमएसईबीकडून हे काम होत असताना 100 रुपये येणारे देयक आता 1000 ते 1500 रुपयांवर गेले आहे. त्याचप्रमाणे मीटरची गती देखील वाढलेली आहे, अशा तक्रारी नागपूर मधील त्रस्त उपभोक्त्यांनी केल्या असून अनेक वेळा मोर्चे देखील काढण्यात आले आहेत व त्यामध्ये तोडफोडीच्या घटना देखील घडलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर स्पॅन्को कंपनीचे कार्यालय बंद पाडण्यात आले आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण प्रश्न एवढा डेव्हलप करता की, त्यामध्ये प्रश्न आणि उत्तरही हरवून जाते.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, वीज दर वाढविण्याची शासनाने घेतलेली भूमिका बदलून घरगुती किंवा औद्योगिक वापरकर्त्यांना योग्य दर आकारणी करण्याची व्यवस्था शासनातर्फे केली जाणार आहे का ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सन 2013-2014 मध्ये 20 टक्के दरवाढ झाली होती. ही दरवाढ दिनांक 1 एप्रिल, 2014 पासून सुरु झाली होती.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4127.....

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

ही दरवाढ जनतेला सोसावी लागणार होती. त्यामुळे राज्याच्या तिजोरीतून प्रतिमाह 721 कोटी रुपये सबसिडी सर्व वीज वितरण कंपन्यांना आपण देत होतो. ही सबसिडी निवडणुकीच्या काळात ऑगस्ट महिन्यापर्यंत सुरु होती. त्यानंतर नवीन शासन आल्यानंतर याबाबत पुन्हा अभ्यास करण्यात आला. शासनाच्या बजेटमधून हा निधी द्यावा लागत होता. त्यानंतर राज्यात जी परिस्थिती तयार झाली त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी लागत होती. काही संघटनांनी वीज मंत्री म्हणून माझ्याकडे व राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांकडे या संदर्भात निवेदने दिली होती. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले होते की, 20 टक्के दरवाढ नवीन शासन आल्यानंतर झाली आहे. मात्र, ही दरवाढ नवीन शासन आल्यानंतर झाली नसून ती सन 2013-2014 मध्येच झाली आहे. त्यानंतर शासनाने पुन्हा 20 टक्के दरवाढीवर एक महिन्यासाठी सबसिडी दिली. तीन महिन्यांची कृषी पंपांची देयके माफ करण्यात आली. मागील काळात झालेली ही दरवाढ आता दिनांक 31 मार्च, 2015 पर्यंत लागू राहणार आहे. आता आपण नवीन टेरिफ पिटिशन घेऊन एमईआरसीकडे गेलो आहोत. वीज वितरण कंपनी आणि अन्य सर्व कंपन्यांचा एकूण खर्च विचारात घेता 8 टक्के दरवाढ प्रस्तावित केली आहे व त्याची सुनावणी होणार आहे. सुनावणीच्या तारखाही माझ्याकडे आल्या आहेत. सध्या आपण 8 टक्के दरवाढ प्रस्तावित केली आहे. राज्याच्या कंपन्यांचा पुन्हा एकदा अभ्यास करीत आहोत. ही दरवाढ मागील काळातच झाली होती. आता आपण नवीन प्रस्ताव पाठविला आहे.

सभापती महोदय, स्पॅन्को कंपनीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. ही बाब खरी आहे की, नागपूर विभागात दररोज मोर्चे काढले जात आहेत व तोडफोडही होत आहे. 1 लाख् 50 हजार नवीन मीटर बसविण्यात आले असून हे मीटर जोरात धावतात, अशा प्रकारच्या 1000 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींच्या आधारावर शासन म्हणून मी स्वत: हस्तक्षेप केला आहे. त्यावेळी शासन कुणाचेही असले तरी स्पेन्को कंपनीने करार केला आहे. शासनाने हस्तक्षेप करावा, अशी परिस्थिती आज निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनामार्फत एक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4127.....

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

सदस्य समिती नेमून कंपनीकडून करारानुसार काम होत आहे किंवा नाही, करारानुसार वीज सेवा पुरविण्यात येत आहे किंवा नाही, याबाबत एक महिन्याच्या आत चौकशी करुन अहवाल आल्यानंतर आपण कंपनीला अंतिम निर्देश देऊ. स्पॅन्कोचा कारभार पारदर्शक असेल, कायदेशीर असेल, करारानुसार असेल तर आपल्याला काहीही करता येणार नाही. परंतु, काही लॅक्युना असतील, चुकीच्या पध्दतीने काम होत असेल तर शासन निश्चितपणे निदेश देईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना मागील सरकारने दरमहा 800 कोटी रुपयांची सबसिडी दिल्याचे मान्य केले आहे. एमईआरसीने दर वाढविले होते. त्या विरोधात आज सरकारमध्ये असलेल्यांनी विरोधी पक्षात असताना आंदोलनाची भूमिका घेतली होती. राज्यातील उद्योग शेजारच्या राज्यात जातात, शेजारच्या राज्यांचे विजेचे दर कमी आहेत, राज्यातील उद्योग टिकावेत म्हणून सवलत मिळाली पाहिजे, अशी त्यांची आग्रही भूमिका होती. हे सरकार पुन्हा एकदा मागील सरकारच्या भूमिकेप्रमाणे दरमहा अनुदान देऊन उद्योगांना वीज सवलत देणार आहे का ?

सभापती महोदय, गुजरातच्या मुख्यमंत्री महोदया मुंबईमध्ये आल्या आणि त्यांनी सर्व उद्योग गुजरातमध्ये यावेत, असा आग्रह धरला होता. याचे कारण महाराष्ट्रातील वीज दर उद्योगांना परवडत नाही. दरवाढ करण्याबाबत गुजरात सरकारचा आपल्या राज्य सरकारवर दबाव आहे का ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, असा कोणताही दबाव राज्य सरकारवर नाही. उद्योगांना स्वस्त दराने वीज देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, शासन त्यांच्या पाठीशी आहे व त्याकरिता शासन योग्य त्या उपाययोजना करणार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्याच्या दृष्टीकोनातून हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जनता या प्रश्नाकडे लक्ष ठेऊन आहे. वीज दराबाबत जनतेला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

न्याय मिळणार आहे किंवा नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मंत्री महोदयांनी असे सांगितले

ता.प्र.क्र.4127.....

श्री.माणिकराव ठाकरे.....

आहे की, मागील शासनाने 700 कोटी रुपयांची सबसिडी देऊन लघुउद्योग, घरगुती जोडण्या यांच्याकरिता झालेली 20 टक्के दरवाढ कमी केली होती. आपल्या येथील उद्योगांसाठी असलेले विजेचे दर जवळच्या राज्यांपेक्षा अगोदरच जास्त होते. यामध्ये कुठे तरी दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून 20 टक्के दर कमी केले आणि 700 कोटी रुपयांची सबसिडी राज्यातील जनतेला आपण दिली. नवीन सरकार आल्यानंतर पुन्हा 20 टक्के दरवाढ करण्यात आली आणि आता तर 8 टक्के दर वाढविण्याचा प्रस्ताव राज्य वीज नियामक आयोगाकडे पाठविण्यात आला आहे. म्हणजे एकूण 28 टक्के दरवाढ होणार आहे. ही दरवाढ लघुउद्योग, घरगुती ग्राहक, मोठे उद्योग यांना होणार आहे. यामुळे राज्यात उद्योग वाढू शकणार नाहीत. जवळच्या छत्तीसगड राज्यातील दर आणि नागपूर परिसरातील दर यामध्ये मोठी तफावत आहे. नवीन उद्योग विदर्भात आणण्याचा प्रयत्न होत आहे. मंत्री महोदय विदर्भातील आहेत. दरवाढीमुळे औद्योगिक क्षेत्रावर अन्याय होत आहे. माझा प्रश्न असा आहे की, शासन 20 टक्के दरवाढ कमी करणार आहे का आणि वीज नियामक आयोगाकडे प्रस्तावित करण्यात आलेली 8 टक्के दरवाढ होऊ देणार नाही, अशा प्रकारचा निर्णय राज्य शासन घेणार आहे का ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मागील शासनाने सबसिडी दिली होती. त्यातील शेतकऱ्यांची सबसिडी अजूनही सुरु आहे. शेतकऱ्यांचे मागील 3 महिन्यांचे वीज देयक माफ केले आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4127...

श्री.चंद्रशेखर बावनकुळे...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. एमईआरसीकडे विजेच्या दराबाबत याचिका दाखल करण्यात आली असून सुनावणी सुरु आहे. सुनावणीच्या वेळी राज्यातील सर्व जनता व टेरिफ मध्ये येणारे सर्व ग्राहक या सुनावणीत भाग घेऊ शकतात. विजेच्या दरासंदर्भात एमईआरसीकडे सुनावणी सुरु असल्यामुळे राज्य सरकारला त्याबाबत आता कोणतेही निदेश देता येणार नाहीत. एमईआरसीकडील सुनावणी होऊन अंतिम आदेश आल्यावर शासनाला त्यात हस्तक्षेप करता येईल.

श्री.सुनील तटकरे : माननीय मंत्री महोयांच्या उत्तराला माझी हरकत आहे. आघाडी सरकारकारच्या काळात विद्युत नियामक आयोगाने विजेचे दर वाढविले होते. शेती व उद्योगांना विजेच्या दरात सवलत देण्यासाठी 800 कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकारने त्यावेळी केली होती. ही सवलत राज्य सरकार आता पुढे सुरु ठेवणार आहे काय ? शेती पंपासाठी राज्य सरकारकडून क्रास सबसिडी देण्यात येत होती. सरकार आता नवीन सबसिडी किती रकमेची देणार आहे. विद्युत नियामक आयोगाकडे राज्य सरकारकडून आठ टक्के वीज दरवाढीचा नवीन प्रस्ताव पाठविला आहे. 20 टक्के दरवाढ मागील वर्षी लागू करण्यात आली आहे, आता आठ टक्के दरवाढीचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, अशा प्रकारे एकूण 28 टक्के दरवाढीचा प्रस्ताव आहे. 20 टक्के दरवाढीचे अनुदान शासनाने रद्द केल्यामुळे 20 टक्के दरवाढ लागू झाली आहे. विद्युत नियामक आयोगाकडे महावितरण कंपनी थेट प्रस्ताव पाठवित नसून सरकारची मान्यता घेऊन प्रस्ताव पाठविण्यात येतात. आठ टक्के दरवाढ केली जाणार आहे, हे सरकारला माहीत आहे काय ? माहिती असेल तर ही दरवाढ करु नये असे सरकारने महावितरण कंपनीला का सांगितले नाही ?

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी जो प्रश्न विचारला होता, त्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले नाही. माननीय श्री.तटकरे यांच्या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे, परंतु मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मला दिले पाहिजे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर मी दिलेले आहे. मी मघाशी सांगितले आहे की, एमईआरसीकडे टेरिफ पिटीशन सुरु आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4127...

श्री.चंद्रशेखर बावनकुळे...

एमईआरसी हे एक प्रकारचे न्यायालय आहे, त्यामुळे त्यासंदर्भात मी काही भाष्य करणे योग्य होणार नाही. एमईआरसीकडील सुनावणी पूर्ण झाल्यानंतर जो निर्णय होईल त्यासंदर्भात शासनाकडून अंतिम आदेश देताना इंटरपिटीशन करण्याचा अधिकार शासनाला वापरता येईल. 20 टक्के विजेचे दर सन 2013-2014 मध्ये कंपन्यांकडून वाढविण्यात आले होते, त्या माध्यमातून शासनाकडून विजेच्या दराबाबत याचिका करण्यात आली होती. 20 टक्के दरवाढ आघाडी शासनाने प्रस्तावित केली होती. हा त्या शासनाचा प्रताप आहे. त्यानंतर राज्य सरकारने सबसिडी दिली होती. याबाबत मला असे सांगायचे आहे की, एमईआरसीकडे सुनावणी सुरु आहे. वीज दरवाढीच्या संदर्भात एमईआरसीचा अंतिम निर्णय आल्यानंतर आवश्यकता भासली तर शासन त्यामध्ये हस्तक्षेप करील.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आघाडी शासनाने विजेचे दर कमी केले होते. आता कोळसा व इंधनाचे दर कमी झाले आहेत, कोळसा व इंधन मोठ्या प्रमाणात वीज कंपन्या खरेदी करतात. आघाडी सरकारने 20 टक्के विजेचे दर वाढविले होते असे मंत्री महोदय सांगत आहेत, आघाडी सरकारने विजेच्या दरात सबसिडी दिली होती. आता इंधनाचे व कोळशाचे दर कमी झाल्यामुळे सरकार विजेचे दर कमी करणार किंवा नाही, असा माझा प्रश्न आहे. शासनाच्या मान्यतेशिवाय आठ टक्के विजेचे दर वाढविण्याचा प्रस्ताव कसा काय पाठविण्यात आला आहे ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, कोळशाची खरेदी सुरु आहे, इंधनाचे दर उतरले आहेत याचा इम्पॅक्ट त्याच वर्षी दिसून येत नाही. कोणत्याही साहित्याचे, इंधनाचे किंवा कोळशाचे दर कमी झाले तर त्याचा इम्पॅक्ट पुढील वर्षी दिसून येतो. मी वारंवार सांगितले आहे की, रेग्युलेटरीकडे कंपनीने डायरेक्ट पिटिशन केले आहे. सरकारकडे सदर पिटिशन आलेले नाही. रेग्युलेटरीला पिटिशन दाखल करुन घेण्याचा अधिकार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या प्रश्नाला न्याय मिळत नाही, त्यामुळे हा प्रश्न आपण राखून ठेवावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सभापती : माननीय मंत्री महोदय उत्तर देत असताना आपण कृपया त्यांना डिस्टर्ब करु नये. मला देखील या प्रश्नाचे उत्तर समजून घ्यावयाचे आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी असे सांगू इच्छितो की, वीज वितरण कंपन्यांनी टेरिफ पिटिशन एमईआरसीकडे केले नाही ते सरकारकडे येत नाही. रेग्युलेटरी कायद्याप्रमाणे डायरेक्ट वीज कंपन्या एमईआरसीकडे पिटिशन सादर करतात.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. मी जबाबदारीने सांगतो आहे,...(गोंधळ)...

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आपण कृपया खाली बसावे, आपल्या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांकडून समाधानकारक येत नसेल तर आपण फार तर त्यावर नापंसती व्यक्त करावी, प्रश्न राखून ठेवावे असे आपण सूचित केले आहे. प्रश्न राखून ठेवण्याची आवश्यकता नाही. यानंतर आता सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी प्रश्न विचारावा. ....(गोंधळ)....

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, 20 टक्के दरवाढ युती सरकारने केलेली आहे. त्यामुळे विजेच्या दरवाढीचा फटका राज्यातील जनतेला बसत आहे. या देशात सर्वात जास्त विजेचे दर महाराष्ट्र राज्यात आहेत. सबसिडी रद्द केल्यामुळे दर वाढले आहेत. छत्तीसगड राज्यात विजेचे दर प्रति युनिट 4 रुपये 20 पैसे आहेत. मध्य प्रदेशात विजेचे दर प्रति युनिट 4 रुपये 70 पैसे आहेत. आंध्र प्रदेशात विजेचे दर प्रति युनिट 5 रुपये 50 पैसे आहेत. तेलंगणा व गुजरात राज्यात विजेचे दर प्रति युनिट 5 रुपये 25 पैसे आहेत. महाराष्ट्र राज्यात विजेचे दर प्रति युनिट 9 रुपये 50 पैसे आहेत. सरकारला माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, विदर्भातील स्टील कंपन्या वीज दरवाढीमुळे शेजारच्या राज्यात जात आहेत. नागपूरचे वीज मंत्री असल्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला भरपूर अपेक्षा आहेत. भारतीय जनता पार्टीचे श्री. रमेश मंत्री यांच्या घरी बैठक झाली. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, येथील सर्व कंपन्या मध्य प्रदेश व गुजरात राज्यात जात आहेत. आघाडी सरकारने विजेच्या दरात जी सबसिडी दिली होती ती सबसिडी हे शासन देणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4127...

श्री.प्रकाश गजभिये...

आहे काय, अशी सबसिडी देण्यात येणार नसेल तर त्याऐवजी विजेचे दर कमी करण्यात येतील काय, याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असा आरोप लावला आहे की, युती शासनाने विजेचे दर वाढविले आहेत, हा आरोप खरा नाही. सन 2013-2014 मध्ये आघाडी शासनाने सादर केलेल्या पिटिशनवर एमईआरसीने 1 एप्रिल, 2014 पासून 20 टक्के विजेची दरवाढ केलेली आहे. 20 टक्के दरवाढ आघाडी शासनाच्या काळात झालेली आहे. विदर्भातील स्टील कंपन्यांना अनुदान व क्रॉस सबसिडी देऊन वीज दर कमी करण्याचा प्रस्ताव आहे. सभापती महोदय, मी वारंवार सांगितले आहे की, विजेचे दर ठरविण्याचे अधिकार एमईआरसीला आहेत.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4127.....

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

एमईआरसीकडे पिटीशनची सुनावणी सुरु आहे. अंतिम सुनावणी झाल्यानंतर जे टेरिफ येतील त्या प्रमाणे आपण अंतिम निर्णय घेण्याचा विचार करु.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, शेतकऱ्यांना 20 टक्के सबसिडी मिळाली पाहिजे. शासनाकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्यामुळे आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मागील जे 20 टक्के अनुदानित दर होते ते अनुदान कमी केल्याचे मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, विद्युत अधिनियम, 2004 च्या कलम 65 अन्वये अनुदानित वीज दर लागू करण्याचे अधिकार शासनास आहेत. त्यानुसार याबाबत शासनाने निर्णय घ्यावा. शासनाने या संदर्भात चालढकल करु नये. तसेच, मिहानमध्ये एसई-2 ला 4 रुपये 50 पैसे प्रती युनिट दराने वीज पुरवठा करण्यात येत आहे आणि इतर ठिकाणी मात्र जास्त दराने वीज पुरवठा करण्यात येत आहे, हे कशासाठी ? शासन समान दराने वीज पुरवठा करणार आहे काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी जो सभात्याग केला तो राजकीय आहे. सन 2013-14 मध्ये तत्कालीन शासनाने दर वाढविले होते. आमच्या शासनाने हे दर वाढविलेले नाहीत. शेतकऱ्यांना सबसिडीच्या दरात वीज पुरवठा करण्यात येत आहे. त्यामध्ये राज्य शासनाने कोणतीही कपात केलेली नाही. ती सबसिडीची रक्कम राज्य शासन भरत आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, विद्युत कायदा, 2004 च्या कलम 65 नुसार शासनाला काही आदेश देण्याचे अधिकार आहेत. मी सांगू इच्छितो की, एमईआरसीकडे पिटीशनची सुनावणी सुरु आहे. अंतिम सुनावणी झाल्यानंतर जे टेरिफ येतील त्यानंतर मंत्रिमंडळासमोर चर्चा करुन सर्व राज्याचा एकंदरीत विचार करुन आपण त्या माध्यमातून काही तरी अंतिम आदेश देऊ, एवढेच मी सभागृहाला आश्वासित करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

खामगांव (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना तत्काळ कनेक्शन देणेबाबत

(५) * ४०६१ श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव, जिल्हा बुलढाणा येथील शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षापासून नवीन कृषी पंपाचे कनेक्शन मिळण्याबाबत अर्ज व पैसे भरुन सुध्दा अद्यापपर्यंत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, खामगांव यांनी नवीन जोडण्या दिल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत जोडण्या न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना कृषि पंपाची जोडणी तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे
(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे अंशतः खरे आहे. खामगांव विभाग अंतर्गत पैशाचा भरणा करुन प्रलंबित असलेल्या कृषी पंपाना जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याची प्रक्रिया सुरु आहे. सन २०१२-१३ मध्ये २३१३, २०१३-१४ मध्ये २३५७ व २०१४-१५ मध्ये जानेवारी २०१५ अखेर ९३७ कृषी पंपाना विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे.
(२) कृषी पंपाचे कनेक्शन उपलब्ध करुन देण्याकरिता महावितरणकडून इन्फ्रा-२ योजने अंतर्गत कामे करण्यात येणार आहेत. याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून सर्वेक्षणाचे काम सुध्दा सुरु झालेले आहे.
(३) शेतक-यांना कृषी पंप जोडणी तत्काळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने एका एजन्सीची नेमणूक केली असून संबंधितांकडे पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी पहिला लेखी प्रश्न विचारला होता की, "खामगाव, जिल्हा बुलढाणा येथील शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षापासून नवीन कृषी पंपाचे कनेक्शन मिळण्याबाबत अर्ज व पैसे भरुन सुद्धा अद्यापपर्यंत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, खामगाव यांनी नवीन जोडण्या दिल्या नाहीत, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, "हे अंशतः खरे आहे" आणि पुढे असे म्हटले आहे की, "सन 2012-13 मध्ये 2313, 2013-14 मध्ये 2357 व 2014-15 मध्ये जानेवारी, 2015 अखेर 937 कृषी पंपांना विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे." माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सन 2012-13, 2013-14 व 2014-15 या तीन वर्षात किती शेतकऱ्यांनी विद्युत विभागाकडे वीज कनेक्शनसाठी पैसे भरले, त्यापैकी किती शेतकरी विद्युत कनेक्शनपासून वंचित आहेत ? अद्याप किती विद्युत कनेक्शन देणे बाकी आहे ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4061.....

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मागील 4 वर्षात राज्यात 1 लाख 63 हजार विद्युत कनेक्शन पेड पेंडिंग आहेत. आपण मागील 4 वर्षात शेतकऱ्यांकडून विद्युत कनेक्शनसाठी पैसे भरुन घेतले. परंतु आपण 1 लाख 63 हजार लोकांना विद्युत कनेक्शन देऊ शकलो नाही. बुलढाणा जिल्ह्याचा विचार केला तर 5,028 विद्युत कनेक्शन पेड पेंडिंग आहेत. आपण मागील 4 वर्षात शेतकऱ्यांकडून विद्युत कनेक्शनसाठी पैसे भरुन घेतले. परंतु, आपण त्यांना कनेक्शन देऊ शकलो नाही. आपण फक्त 937 कृषी पंपांना विद्युत पुरवठा दिलेला आहे आणि त्या ठिकाणी 4,091 विद्युत कनेक्शन पेड पेंडिंग आहेत. आता इन्फ्रा-2 योजनेचे काम सुरु आहे आणि बुलढाणा जिल्ह्यासाठी स्थानिक पातळीवर मुख्य अभियंता यांच्या स्तरावर 8 कोटी रुपये देऊन पेड पेंडिंग लवकरात लवकर पूर्ण करण्याची योजना तयार करण्यात आलेली आहे. हे काम लवकरच पूर्ण होईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, तारांकित प्रश्नातील अ.क्र.2 च्या लेखी उत्तरात असे नमूद केलेले आहे की, "कृषी पंपाचे कनेक्शन उपलब्ध करुन देण्याकरिता महावितरणकडून इन्फ्रा-2 योजने अंतर्गत कामे करण्यात येणार आहेत. याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून सर्वेक्षणाचे काम सुद्धा सुरु झालेले आहे." परवा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी कृषी पंपाची मागणी केल्यानंतर त्यांना तातडीने कृषी पंपासाठी वीज उपलब्ध करुन देण्यात येईल. मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात असे म्हटलेले आहे की, इन्फ्रा-2 योजनेचे काम पूर्ण झाल्याशिवाय आम्हाला वीज उपलब्ध करुन देता येणार नाही. मग परवा मुख्यमंत्री महोदयांनी जी घोषणा केली ती खरी आहे काय ? कृषी पंपांना वीज देण्यासाठी इन्फ्रा-2 योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ? तिसऱ्या क्रमांकाच्या लेखी उत्तरात असे नमूद केलेले आहे की, "शेतकऱ्यांना कृषी पंप जोडणी तत्काळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने एका एजन्सीची नेमणूक केली असून संबंधितांकडे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4061.....

श्री.सुनील तटकरे.....

पाठपुरावा सुरु आहे." पाठपुरावा सुरु आहे म्हणजे काय ? तुम्ही एजन्सीची नेमणूक केली असेल आणि शेतकऱ्यांनी तीन वर्षापासून पैसे भरुन देखील त्यांना विद्युत पुरवठा दिला गेला नसेल तर आपण संबंधित एजन्सीवर किंवा काम न करणाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी पायाभूत सुविधा पूर्ण झाल्यानंतर आपण तातडीने वीज कनेक्शन देऊ, असे सांगितलेले आहे. आपण रेकॉर्ड बघावे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेब ऊर्जा मंत्री होते. त्यांना इन्फ्रा-2 योजनेची पूर्ण माहिती आहे. हे काम पूर्ण होण्यासाठी 2 वर्षाचा कालावधी लागणार आहे. आपण दिनांक 16.09.2014 रोजी या कामाची वर्क ऑर्डर दिलेली आहे आणि दिनांक 06.09.2016 पर्यंत याची वर्क ऑर्डरची मुदत आहे. दिनांक 06.09.2016 रोजी हे काम पूर्ण होणार आहे. या प्रकल्पाच्या पायाभूत सुविधांचे काम मासिक माईल स्टोनमध्ये पूर्ण करुन दिनांक 06.09.2016 पर्यंत अंतिम होणार आहे. यामध्ये वेगवेगळे प्रकल्प आहेत. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील काम 06.09.2016 पर्यंत पूर्ण होईल आणि यातून जे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप होईल त्यातून संपूर्ण कृषी पंपांच्या जोडण्या पूर्ण होतील. आपण ॲडिशनल 8 कोटी रुपयांचा सपोर्ट दिलेला आहे. स्थानिक पातळीवर काही ठिकाणी एक-दोन विजेचे पोल लागतात, एक-दोन किंवा तीन-चार विजेच्या पोलमुळे काही विजेचे कनेक्शन थांबलेले आहेत. यासाठी वाट बघण्याची आवश्यकता नाही. आपण तेवढे विजेचे कनेक्शन देणार आहोत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी खामगाव येथील कृषी पंपांच्या संदर्भात स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. सन 2012-13, 2013-14 व 2014-15 मधील 5 हजार कनेक्शन्स देणे बाकी आहेत. सन 2012-13 पासून ज्या शेतकऱ्यांनी पैसे भरले त्यांना आता पैसे भरुन तीन वर्षे झालेली आहेत आणि आता तुम्ही आणखी पुढे दोन वर्षे सांगत आहात. मग आपण शेतकऱ्यांना 5 वर्षे विद्युत कनेक्शन देणार नाही काय ? माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4061.....

श्री.पांडुरंग फुंडकर.....

इन्फ्रा-2 योजने अंतर्गत निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असेल तर तीन वर्षाच्या काळातील जे पेंडिंग कनेक्शन्स आहेत ते कालबद्ध कार्यक्रम आखून किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, 4,091 विद्युत कनेक्शन पेड पेंडिंग आहेत. हे कनेक्शन्स वर्षभरात पूर्ण होण्यासाठी 8 कोटी रुपयांचा सपोर्ट दिलेला आहे. मी इन्फ्रा-2 योजने बाबत माहिती दिली. इन्फ्रा-2 योजनेचा कॉन्ट्रॅक्ट दिनांक 06.09.2016 रोजी संपणार आहे. त्यामुळे त्याला माईलस्टोनमध्ये आणून, लवकरात लवकर पूर्ण करून पेड पेंडिंग पूर्ण करण्याचा शासनाचा विचार आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील 5 लाख कृषी पंपांचा बॅकलॉग आहे. सन 2011-12 पासून आता पर्यंत म्हणजे मागील 4 वर्षातील लोड सन 2015-16 मध्ये येत आहे. त्यामुळे मागील 4 वर्षातील लोड एकाच वर्षात पूर्ण करता येणार नाही. परंतु, मी सन्माननीय सदस्यांना आश्वासन देतो की, लवकरात लवकर खामगाव येथे 8 कोटी रुपयांचा सपोर्ट आणि आणखी काही सपोर्ट लागला तर तो देऊन पेड पेंडिंग पूर्ण करण्यात येतील.

ॲड.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, सन 2012 ते 2014-15 पर्यंत बुलढाणा जिल्ह्यात फक्त 937 कृषी पंपांना विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे आणि जवळपास 4 हजारांपेक्षा अधिक विद्युत कनेक्शन्स देणे बाकी आहेत, असे मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात सांगितले. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, हे एका जिल्ह्यातील चित्र आहे. महाराष्ट्रात असे किती कनेक्शन्स आहेत ? राज्यातील सर्व जिल्ह्यातील मागणी किती आहे ? मग त्यामुळे बेकायदेशीर विद्युत जोडणी, आकडे टाकून वीज पुरवठा घेणे हे प्रकार वाढतात आणि यामुळे विद्युत मंडळाचे देखील नुकसान होते. आपण याबाबत काही दक्षता घेणार आहात काय ? विद्युत जोडणी देण्याबाबत एका जिल्ह्यातील प्रमाण एवढे आहे तर सर्व जिल्ह्यातील प्रमाण किती असेल आणि त्या संदर्भात शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, 1 लाख 63 हजार विद्युत कनेक्शन पेड पेंडिंग आहेत. माझ्याकडे विभाग निहाय आकडेवारी आहे. ती माहिती मी सन्माननीय सदस्यांना देऊ शकतो.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4061.....

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

सभापती महोदय, नवीन शासन सत्तेवर आलेले आहे. इन्फ्रा-2 ही योजना पूर्वीच्या शासनाने आणली होती. ती योजना सुरु केली आहे. केंद्र सरकारचा दिनदयाळ उपाध्याय कार्यक्रम येत आहे. लवकरात लवकर हे पेड पेंडिंग पूर्ण करण्याची योजना आहे.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

उप सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या तीन सूचना प्राप्त झालेल्या आहेत. हे विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नाहीत. तथापि, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मी या सूचनेसंबंधी माननीय सदस्यांना थोडक्यात आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी विधानपरिषद नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. अहमदनगर जिल्हयातील राहुरी तालुक्यातील वांबोरी गावामध्ये शुक्रवार, दिनांक 13 मार्च, 2015 रोजी पुरोगामी महाराष्ट्राला काळिमा फासणारी घटना घडली आहे. दुर्दैवाने अशा प्रकारची घटना राज्याच्या गृह राज्यमंत्र्यांच्या जिल्हयात घडली आहे. वांबोरी गावातील गरीब कुटुंबातील मुलाचे त्याच गावातील एका मुलीशी प्रेम जुळले. दोघेही प्रेमाच्या संबंधातून गाव सोडून पळून गेले. पुन्हा त्या प्रेमी युगुलाला वांबोरी गावामध्ये बोलावण्यात आले. मुलाच्या आणि मुलीच्या वडिलांच्या संमतीने ते दोघे गावात परत आले. सकाळी 9 ते 9.30 च्या दरम्यान 15 ते 20 जणांच्या जमावाने त्या मुलाच्या घरी जाऊन आमच्या मुलीला का पळवून नेले, आमच्या मुलीवर का प्रेम केले अशी विचारणा करुन त्या मुलाला नग्न करुन मारहाण केली. जमावाने त्याच्या वडिलांना सुध्दा नग्न करण्याचा प्रयत्न केला. मुलाच्या आईची साडी ओढून त्या महिलेला नग्न करण्याचा प्रयत्न झाला. इतकेच नव्हे तर मुलाच्या गरोदर बहिणीला सुध्दा या जमावाने मारहाण केली. त्या मुलाच्या आईने व गरोदर बहिणीने या जमावाच्या तावडीतून आपली सुटका करुन घेतली. हा मुलगा मात्र त्यांच्या तावडीत सापडला. सकाळी 9 ते 9.30 च्या दरम्यान या मुलाच्या गळ्यात चपलांचा हार घालून नग्न अवस्थेत त्याची वांबोरी गावात धिंड काढण्यात आली. ही घटना पोलिसांना दुपारी 1.30 वाजता कळली. त्यानंतर लगेच राज्याचे मंत्री घटना स्थळी भेट देण्यासाठी गेले. अनेक राजकीय पक्षांचे नेते त्या ठिकाणी गेले.

सभापती महोदय, अशा घटनेतील सर्व आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंध कायद्याखाली म्हणजे मोक्का कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची गरज आहे. तरच पुरोगामी महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची घटना यापुढे घडणार नाही. आपण या प्रस्तावासंबंधी माझे म्हणणे मांडण्याची संधी मला दिली. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून स्थगन प्रस्तावाची सूचना चर्चेला घेण्यात यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) G.3

SGB/ AKN/ ST/ 13:00

उप सभापती : ठीक आहे. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे म्हणणे ऐकून घेतले आहे. आजच्या कामकाज पत्रिकेत नियम 260 अन्वये कायदा व सुव्यवस्थेसंबंधीचा प्रस्ताव दर्शविण्यात आला आहे. त्या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी हा विषय उपस्थित करता येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मागील आठवड्यात विरोधी पक्षाकडून देण्यात आलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा अपूर्ण असून माननीय सदस्य ऑन लेग आहेत. असे असताना आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये हा प्रस्ताव दुसऱ्या क्रमांकावर दर्शविण्यात आला असून सत्तारूढ पक्षाकडून देण्यात आलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव प्रथम क्रमांकावर दर्शविण्यात आला आहे. अगोदर विरोधी पक्षाचा प्रस्ताव चर्चेला घेण्यात यावा व त्या प्रस्तावावरील चर्चा पूर्ण झाल्यानंतर सत्तारूढ पक्षाचा प्रस्ताव चर्चेला घेण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

उप सभापती : सभागृहाच्या अनुमतीने हा विषय घेता येईल. आता माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी म.वि.प.नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. राज्यातील हजारो विनाअनुदानित शाळामधील शिक्षक आंदोलन करीत आहेत. परंतु त्या शाळांना अनुदानासाठी मान्यता दिली आहे त्या शाळांना सुध्दा सरकारने अद्याप अनुदान दिलेले नाही. त्यामुळे त्या शाळांमधील शिक्षकांना वेतन मिळत नाही. अशा 2500 मराठी व 400 उर्दू शाळा आहेत. त्या शाळांमधील शिक्षक वेतनास पात्र असून, अनुदानाची मंजुरी असतानाही त्यांना वेतन मिळत नाही ही स्थिती आहे. 2009 मध्ये शासनाने कायम विनाअनुदानित मधील "कायम" शब्द वगळला. तसे या सभागृहात आश्वासन दिले गेले. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरु होऊन चार वर्षे उलटली आहेत, तरी देखील त्याची अंमलबजावणी झालेली नाही. 3157 शिक्षक वेतन मिळण्यास पात्र आहेत. तरी सुध्दा त्याना शासन वेतन देत नाही. इतर शिक्षकांची संख्या प्रचंड आहे. राज्यातील शिक्षण विनाअनुदानावर सोडून जो शिक्षण हक्क कायदा संसदेने व विधिमंडळाने मंजूर केला त्या कायद्याचे उल्लंघन करायची स्थिती सरकारने निर्माण केली आहे. यापेक्षा अन्य कोणतीही गंभीर परिस्थिती असू शकत नाही. या प्रश्नावर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सरकारने नीट उत्तर दिले पाहिजे, त्या दृष्टीने आजचे सर्व कामकाज बाजूला सारून हा प्रस्ताव चर्चेला घेण्यात यावा अशी मी विनंती करतो.

..4..

17-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) G.4

SGB/ AKN/ ST/ 13:00

उप सभापती : अन्य मार्गाने हा प्रश्न आपल्याला उपस्थित करता येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी नियम 93 ची सूचना दिलेली आहे. त्या सूचनेवरील निवेदन अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहाला सादर झाले पाहिजे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनावर चर्चा होत असताना केवळ एका प्रश्नातून न्याय मिळणार नाही. त्याकरिता आपण पुरेसा वेळ द्यावा आणि नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने याच आठवड्यात सभागृहाला सादर व्हावीत अशी आपल्याला विनंती करतो.

उप सभापती : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या अन्य विषयावरील सूचनेबद्दल थोडक्यात म्हणणे मांडावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मागील आठवड्यात पुन्हा महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांमध्ये गारपीट आणि अवकाळी पाऊस झाला. मी या विषयाच्या अनुषंगाने नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सभापती महोदय, मराठवाडा, विदर्भ, खानदेश व उत्तर महाराष्ट्रातील 16 जिल्हयांमध्ये मागील आठ दिवसात गारपीट आणि अवकाळी पावसामुळे 75 हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रातील शेती पिकाचे नुकसान झाले आहे.

नंतर एच.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, यामध्ये द्राक्ष फळबागा, गहू,हरभरा इत्यादी पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. वीज पडल्यामुळे मागील आठ दिवसांमध्ये अनेकजण मृत्युमुखी पडले आहेत. वारंवार येत असलेल्या या संकटामुळे सर्व शेतकरी हवालदिल झालेले आहेत. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याऐवजी सरकारकडून चालढकल केली जात आहे. शेतकऱ्यांना मदत मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी काही ठिकाणी रस्ता रोको आंदोलन केले. पंचनामे होत नाही म्हणून रेल रोको आंदोलन देखील झाले. आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मनात शासनाविरूद्ध संताप आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, सर्व कामकाज बाजूला ठेवून यावर चर्चा करावी व गारपीट आणि अवकाळी पावसामुळेग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिली आहे तिचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. हवामान खात्याचे अंदाज आतापर्यंत चुकलेले आहेत. यंदाच्या वर्षी मात्र पहिल्यांदाच त्यांचे अंदाज 100 टक्के खरे ठरलेले आहेत. अजूनही तीन दिवस पाऊस पडणार आहे असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यास माननीय महसूल मंत्र्यांनी खाली बसूनच होकार देखील दिला आहे. शासन शेतकऱ्यांना किती नुकसान भरपाई देऊ शकते याचा आम्हाला देखील अंदाज आहे. प्राथमिक गरजा भागविण्यासाठी काय करणे आवश्यक आहे त्यासंबंधी शासकीय पातळीवर चर्चा होत नाही. परवा मी नाशिकला गेलो होतो. तेथे मोठ्या प्रमाणावर गारपीट होत आहे. तेथे चालणे तर सोडा पण जीवन जगणे देखील कठीण होऊन बसले आहे. नाशिक व मराठवाडा हा सर्वात जास्त गारपीटग्रस्त भाग झाला आहे. यासंबंधी शासनाने प्राथमिक उपाययोजना करणे आवश्यक आहे. या विषयावर आताच काही चर्चा होणार नाही हे आम्हाला देखील माहिती आहे. या विषयावर माननीय महसूल मंत्र्यांनी आता दोन मिनिटांसाठी प्रकाश टाकला तर बरे होईल.

उप सभापती : हा विषय गंभीर असून अत्यंत महत्त्वाचा आहे. यावर निश्चितपणे आपल्याला काहीना काही करता येईल. या विषयासंबंधी मी आपल्याशी विचारविनिमय करून योग्य दिवशी वेळ देण्याचा नक्कीच प्रयत्न करणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: मुंबई मेट्रो लाईन-3 मार्गिकेमुळे बाधित होणारे क्षेत्र

मु.शी.: मुंबई मेट्रो लाईन-3 मार्गिकेमुळे बाधित होणारे क्षेत्र यासंबंधी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे निवदेन

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियम289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी आता आपले म्हणणे मांडावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, रविवार, दिनांक 15 मार्च 2015 रोजी मोनो रेल फेल गेली. त्यामुळे प्रवासी अडकले. त्याकडे मी सभागृहामार्फत शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. मोनो रेल सुरू झाल्यानंतर अशा प्रकारच्या तांत्रिक अडचणी येत आहेत. रविवारच्या घटनेतून आपत्कालीन व्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. पॉवर फेल झाल्यामुळे समांतर गाडी सोडून रेस्क्यू ऑपरेशन करता येत नव्हते. प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी फायरब्रिगेडला एका तासाने कळविण्यात आले. तद्नंतर फायरब्रिगेड आली. गर्दीच्या दिवशी अशी घटना घडली असती तर विपरीत काहीही घडू शकले असते. त्यामुळे यापुढे दक्षता घेणे गरजेचे आहे. मोनो रेलेच्या मार्गावर बऱ्याच ठिकाणी रोड एक्सेस नाही. अशा ठिकाणी रेस्क्यू ऑपरेशन करणे कठीण जाणार आहे. त्यामुळे अशा ठिकाणी रेस्क्यू ऑपरेशन करण्यासाठी एमएमआरडीए आणि मोनो रेल कंपनीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. तेव्हा या विषयावर चर्चा करणे गरजेचे आहे.

उप सभापती : ठीक आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2014-2015 चे प्रकाशन सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2014-2015 चे प्रकाशन सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

.....

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : माझ्याकडे आज व दिनांक 16 मार्च 2015 रोजी प्राप्त झालेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचने संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : प्रथम मी आज प्राप्त झालेल्या सूचनांचे वाचन करतो. सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी "नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी "सन 2013-14, 2014-15 मधील ई.बी.सी.च्या रकमेचे वाटप न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.आनंद ठाकूर यांनी "पालघर जिल्ह्यातील जव्हार व डहाणू तालुक्यात धान्याचा व रॉकेलचा होत असलेला काळाबाजार व कोटा वाढवून देण्यात शासनाकडून होत असलेली हेळसांड यासंबंधी आदिवासी कुटुंबांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या योजनांवर शुद्धीकरण यंत्रणा बसविण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी "पालघर या आदिवासी बहुल जिल्ह्यातील आठ तालुक्यांमध्ये रिक्त असलेल्या शिक्षकांच्या पदांवर आदिवासी उमेदवारांची भरती करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "ठाणे जिल्ह्यातील शहापूर व मुरबाड या ग्रामपंचायतींचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "राज्यातील अनुदानास पात्र ठरविलेल्या खाजगी शाळांमधील शिक्षकांना वेतनश्रेणी मंजूर करूनही मराठी माध्यमाच्या 2500 शाळा, उर्दू माध्यमाच्या 400 शाळेतील हजारो शिक्षक वेतनाविना वंचित असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "महाराष्ट्र राज्य तासिका/मानधन शिक्षक, स्त्री अधीक्षिका वर्ग-4 कर्मचारी संघटना,नंदूरबार यांच्यावतीने नाशिक आदिवासी विकास आयुक्त कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी सुरू असलेले उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव....

माननीय सभापतींच्या अनुमतीने आता मी सोमवार दिनांक 16 मार्च 2015 रोजीच्या म.वि.प.नियम 93 अन्वयेच्या सूचनांचे वाचन करतो.

सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी "यवतमाळ जिल्हा परिषदेच्या नोकर भरती परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटण्याची घडलेली घटना व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या लॅपटॉपमध्ये उत्तरपत्रिका सापडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी "भोकरदन, जि.जालना येथे शासकीय तंत्र प्रशाला सुरू करून तेथे शिक्षकांच्या नेमणुका न झाल्याने विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "भातसा प्रकल्पग्रस्तांची आर्थिक स्थिती हलाखीची होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....

...8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनासंबंधी

उप सभापती : आता नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने घेण्यात येतील. माझ्याकडे दोन निवेदने प्राप्त झाली आहेत. पहिले निवेदन सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांचे आहे. तथापि, माननीय मंत्री आता सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ते जेव्हा सभागृहात उपस्थित होतील तेव्हा मी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना संधी देईन.

श्री.अमरसिंह पंडित : ठीक आहे.

उप सभापती : आता मी दुसरे निवेदन घेत आहे. तत्पूर्वी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, निवेदनावर सन्माननीय सदस्यांना फक्त एकच प्रश्न विचारता येईल.

यानंतर श्री.जुन्नरे .....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : पुणे येथे हजार व पाचशे रुपयांचे दोन बनावट मुद्रांक उघडकीस येणे याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पुणे शहरात शासन मान्य मुद्रांक विक्रेत्याकडे नावातील दुरुस्ती करण्याकरिता एक संशयास्पद इसम आला असता त्याची चौकशी करताच तो इसम पळून गेला. चौकशी सुरु असताना संशयास्पद व्यक्ती पोलिसांसमोर पळून गेली असून या इसमाला पकडण्यात पोलिसांना अपयश आलेले आहे. औरंगाबाद जिल्हयातील कोषागारात दि. 12/2/2015 रोजी 1000 रुपये व त्यावरील 1,58,000 रुपयांचे 443 मुद्रांकांच्या संदर्भात कारवाई करण्यात आलेली नाही. या राज्यामध्ये गेल्या काही वर्षापूर्वी तेलगीच्या रुपाने मुद्रांक शुल्काचा मोठा घोटाळा झालेला आहे. हा विषय मी आणि माननीय मंत्री श्री.बापट लोक लेखा समितीमध्ये काढल्यामुळे हा विषय राज्यभर गाजला होता. त्यामुळे आपल्या राज्यात पुन्हा एकदा तेलगी सारखे प्रकरण होणार आहे की, काय अशी भीती आम्हाला वाटत आहे. हे जे मुद्रांक सापडलेले आहेत ते तेलगीच्या संदर्भातील आहेत की, काय याबाबत राज्यशासनाला माहिती आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पुणे शहरामध्ये 500 व 1000 रुपयांचे दोन मुद्रांक आढळून आले असून त्या मुद्रांकामध्ये काही तफावत आढळून आली होती. यासंदर्भात शंका आल्यामुळे पोलिसांना तातडीने सूचना देऊन पोलीस स्टेशनमध्ये यासंदर्भात गुन्हा देखील दाखल करण्यात आला असून यासंदर्भात पोलिसांकडून तपास सुरु आहे.

सभापती महोदय, अशा स्वरुपाचे मुद्रांक शुल्क बाजारात उपलब्ध आहेत काय याबाबत खात्री करण्यात येत असून पुन्हा तेलगी सारखे प्रकरण होऊ नये यासाठी मुद्रांक शुल्काची छपाई नाशिक येथील छपाईच्या कारखान्यातून बंद करण्यात आलेली आहे. आता मुद्रांक लिहिणे, देणे यापेक्षा मुद्रांकाचा व्यवहार ऑनलाईनच्या मार्फत मोठया प्रमाणात होऊ लागले आहेत. ग्रास प्रणालीच्या माध्यमातून 92 टक्के व्यवहार होत असल्यामुळे मुद्रांक शुल्क घेणे, लिहिणे हे प्रकार आता हळू हळू बंद होऊ लागले आहे. मुद्रांक शुल्कात घोटाळा होऊ नये यासाठी ग्रास प्रणाली अधिक विकसित करुन या प्रणालीच्या माध्यमातून मुद्रांक शुल्काची खरेदी व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे. जे दोन मुद्रांक शुल्क आढळून आलेले आहेत त्यांचा पोलिसांनी लवकरात लवकर तपास करावा यासाठी पोलीस विभागाला सूचना देण्यात आलेल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

विशेष उल्लेखाच्या सूचना

पृ.शी./मु. शी. : वांद्रे परिसरात रेल्वे प्रवाशांच्या अपघाताच्या संख्येत वाढ होणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडते.

"मुंबई रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी मार्गदर्शक तत्वे व सूचना देण्यात येत असणे, तरी वांद्रे परिसरातील रेल्वे प्रवाशांच्या अपघाताची संख्या 116 इतकी झालेली वाढ, त्यांचे जीव दगावण्याचे प्रकार घडलेले असणे, याबाबत प्रवाशांचा निष्काळजीपणाच अपघाताचे कारण असल्याचे वास्तव वांद्रे रेल्वे पोलिसांच्या नोंदवहीतील आकडेवारी वरुन सिध्द होणे, यामध्ये 30 पुरुष व तीन महिला अशा एकूण 33 मृतांची नोंद बेवारस अशी असणे, ही वाढ दिवसेंदिवस होत असल्याने नागरिकांचे जीव मोठया प्रमाणात जाणे, याबाबत राज्य शासनाने रेल्वे अधिकाऱ्यांबरोबर समन्वय साधून अपघात टाळण्यासंबंधी उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. :महिला आयोगाच्या अध्यक्षांची तसेच आयोगावरील सदस्यांची नियुक्ती गेल्या सहा महिन्यांपासून न होणे याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"राज्यातील साडेचार कोटी महिलांच्या हक्क व संरक्षणासाठी स्थापन झालेल्या महिला आयोगाकडे शासनाचे दुर्लक्ष झाले असून गेल्या सहा महिन्यापासून महिला आयोगाचे अध्यक्ष व आयोगावरील सदस्यांची नियुक्ती अद्याप करण्यात आलेली नाही. महिला आयोगाच्या कार्यालयाकडे दररोज साधारणत: ई मेलद्वारे 25 ते 30 तक्रारी येतात. जानेवारी, 2014 ते जुलै, 2014 या कालावधीत आयोगाकडे 2004 तक्रारी आल्या होत्या. त्यापैकी 918 तक्रारींची फक्त सुनावणी होऊ शकली. आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षा यांनी ऑगस्ट, 2014 रोजी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त आहे. महिलांना त्वरित न्याय मिळावा व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची शासन दरबारी नोंद होऊन अन्याय निवारण्याचे काम त्वरित व्हावे हा उद्देश आयोगाच्या निर्मिती मागे होता हे विचारात घेता याप्रकरणी शासनाने त्वरित लक्ष घालून महिला आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची त्वरित नियुक्ती करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या परिसरातील पोलीस वसाहतीच्या समस्यांबाबत श्री. जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"अलिबाग(जि.रायगड) येथील जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या परिसरात पाच इमारती आहेत. त्यातील तीन इमारतींमध्ये प्रत्येकी 24 खोल्या असून या खोल्यांमध्ये 90 कुटुंबीय राहात आहेत.

ही इमारत 1989 साली बांधण्यात आली असून या इमारतीला आज 25 वर्षे पूर्ण झाली आहेत. या रौप्य महोत्सवी इमारतींच्या डागडुजीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेले नाही.

पोलिसांकडून खोलीचे भाडे घेतले जाते, तरीही पाचही इमारती दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत. इमारतींना भगदाड पडू लागले असून त्यांच्या खोल्यांची अवस्थाही बिकट झाली आहे.

ड्रेनेज पाईपलाईन फुटल्याने त्याठिकाणी दुर्गंधी पसरु लागली असल्यामुळे पोलीस व त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. इमारतीच्या बाजूला मोठमोठे गवत, पालापाचोळा पडलेला असतानाही त्याकडेही संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष असल्याचे दिसून आले आहे.

पोलीस प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभागाने याचे गांभीर्य ओळखून या वसाहतीची तत्काळ दुरुस्ती करावी. सबब शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : बीड जिल्हा परिषदेच्या अनेक प्राथमिक शाळा भाडे तत्वावरील खाजगी इमारतींमध्ये भरविण्यात येणे परंतु संबंधित इमारत मालकांना इमारत भाडे न मिळाल्याने इमारत मालकांनी इमारतीस टाळा ठोकण्याचा दिलेला इशारा याबाबत श्री. अमरसिंह पंडित,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"बीड जिल्हा परिषदेच्या अनेक प्राथमिक शाळा भाडे तत्वावरील खाजगी इमारतीमध्ये भरविण्यात येणे, सन 2011-12 पासून इमारत मालकाचे भाडे अदा करण्यात न येणे, अनेक इमारत मालकांनी शळोला कुलूप ठोण्याचा इशारा देणे, अनेक ठिकाणी शिक्षकांना शाळेत येण्यास इमारत मालकांनी मज्जाव करणे, सुमारे 1 कोटी रुपयांचे भाडे थकीत असणे, जिल्हा परिषदेकडून इमारत अनुदानाची रक्कम मिळणे, याबाबत शिक्षण संचालक, पुणे यांचेकडे सतत पाठपुरावा करण्यात येणे, परंतु अद्याप संबंधित इमारत मालकांना इमारत भाडे न मिळणे, यामुळे ऐन परीक्षेच्या कालावधीत शाळांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण होणे, खाजगी इमारत मालकांचे इमारत भाडे अदा करण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : मुंबई येथे जकात नाक्यावर नवीन वाहन खरेदीच्या पावत्या बनावट असल्याचे परिवहन विभागाच्या निदर्शनास येणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडते.

"मुंबई येथे नवीन गाडया खेरेदी करताना जकात नाक्यावर नव्या गाडयांची जकात भरुन त्या पावत्या वाहन नोंदणीसाठी जोडणे आवश्यक असणे, आता परिवहन विभागाने वाहन नोंदणीसाठी जकात पावती जोडण्याची पध्दत बंद करणे, परंतु सदर जकात पावत्या ह्या बनावट स्वरुपाच्या सादर करणे, ही बाब परिवहन विभागात उघडकीस आल्यानंतर जकात विभागाकडे पाठपुरावा करुन त्याबाबत माहिती मागवणे, त्यातच प्रादेशिक परिवहन विभागाने त्यांचेकडील 43 पावत्यांची तपासणी केली असता त्यापैकी 10 जकात पावत्या बोगस असल्याचे दिसून येणे, परंतु जकात विभाग परिवहन विभागाला अंधारात ठेवून गौडबंगाल करीत असणे, परंतु असे असताना जकात विभागावर अद्यापही कारवाई न होणे, त्यामुळे शासनाने यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

...8....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : जिल्हा प्रशासनाकडून इ.4 थी व इ.7 वी च्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती देण्यामध्ये जाणीवपूर्वक दिरंगाई करणे याबाबत श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"सभापती महोदय, दरवर्षी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून इ.4 थी व इ.7 वी मधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी स्पर्धा परीक्षा घेतली जाते. सदर शिष्यवृत्ती परीक्षा येत्या 22 मार्च, 2015 रोजी होणार आहे. सदर परीक्षा ही सन 2014-2015 ची आहे.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते .....

या परीक्षेमध्ये इयत्ता चौथीतील 14 हजार विद्यार्थी आणि इयत्ता सातवीतील 16 हजारापेक्षा जास्त विद्यार्थी "गुणवत्ताधारक विद्यार्थी" म्हणून शासनाकडून घोषित केले जातात. त्यांना पुढील तीन वर्षासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. सन 2013-14 मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले तसेच जे गुणवत्ता यादीमध्ये आले त्यांना अद्याप शिष्यवृत्ती मिळालेली नाही. अशी परिस्थिती अनेक जिल्ह्यांमध्ये आहे. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती त्यांच्या बँकेच्या खात्यावर जमा होते. परंतु संबंधित विभागाने अनेक विद्यार्थ्यांचे अजून बँकेत खाते उघडलेले नाही. विद्यार्थ्यांना तातडीने शिष्यवृत्ती मिळावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने पावले उचलावीत.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांना अतिशय अल्प शिष्यवृत्ती देण्यात येते. मागील अनेक वर्षापासून या शिष्यवृत्तीमध्ये वाढ झालेली नाही. गोरगरिबांची मुले परंतु ती गुणवत्ताधारक असल्यामुळे शिष्यवृत्तीमध्ये दुपटीने वाढ करण्याची आवश्यकता आहे, याचा शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी./मु. शी. :दूध भेसळ रोखण्यात शासनास आलेल अपयश या बाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"आरोग्यासाठी पोषक असलेल्या दुधात मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याबद्दल थेट सुप्रीम कोर्टाने चिंता वाहिली असतानाच मुंबईसह ठाणे, पुणे, रायगड आणि रत्नागिरी या पाच जिल्ह्यांमध्ये तब्बल 46 ग्राहकांच्या दुधात भेसळ असल्याचे दिनांक 16 मार्च, 2015 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, "शुद्ध दूध आपला अधिकार" या मोहिमेतंर्गत मुंबई ग्राहक पंचायतीने सहा महिन्यात पाच जिल्ह्यातील सुमारे 650 नमुन्यांची प्रमाणित पद्धतीने तपासणी केलेली असणे, त्यात खुल्या बाजारातील सुट्या दुधाबरोबरच राज्यातील नामांकित दूध उत्पादकांच्या दुधाचेही नमुने असणे. तपासाअंती काही नामंकित ब्रँडच्या दुधाचा स्निग्धांश व इतर धनपदार्थ अपेक्षित मानकापेक्षा कमी आढळलेले असणे, दूध भेसळीमुळे जनतेचे आरोग्य धोक्यात येणे,दूध भेसळ रोखण्यास शासनास आलेले अपयश, परिणामी जनमानसात पसरलेला असंतोष व चिडीची भावना, राज्य शासनाने राज्यात होत असलेली दूध भेसळ रोखण्यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत आपली भूमिका स्पष्ट करुन कार्यवाही करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : नागपूर जिल्हा परिषद प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कर्जाच्या हप्त्यांची कपात करून ती रक्कम नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत न भरणे या बाबत श्री.नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"नागपूर जिल्हा परिषद प्रशासनाने कर्मचाऱ्यांची दिशाभूल करून त्यांच्या वेतनातून ओडी कर्जाचे हप्ते कपात करूनही सदर रक्कम नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत न भरणे, त्यामुळे कर्मचारी बॅंकेचे थकबाकीदार ठरणे, त्यांच्यावर पेनल्टीसह व्याजाचा बोजा वाढणे, मात्र जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांकडून गेल्या सहा महिन्यांपासून कपात केलेले कोट्यवधी कर्जाचे हप्ते बँकेत न भरल्यामुळे कर्मचारी अडचणीत येणे, याबाबत तेथील उप मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, त्यांच्या कामावर होत असलेला विपरीत परिणाम, याबाबत मी शासनाचे विशेष उल्लेखाद्वारे लक्ष वेधत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या भातसा धरणातील पाण्यासाठी मुंबई महानगरपालिका प्रतिवर्षी पाणी बिलापोटी वसूल करीत असलेल्या रकमेच्या केवळ एक टक्का रकमेचा विनियोग केवळ प्रकल्पग्रस्त आणि शहापूर तालुक्यासाठी खर्च करणे याबाबत श्री.जगन्नाथ शिंदे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"संपूर्ण मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या शहापूर तालुक्यातील भातसा धरणाच्या पाण्यासाठी मुंबई महानगरपालिका मुंबईकरांकडून प्रतिवर्षी तब्बल रुपये 4720.33 लाख इतके पाणी बिल वसूल करत असणे, शहापूर तालुक्यातील या भातसा धरणासाठी ज्यांनी आपल्या काळ्या कसदार जमिनी दिल्या त्यांच्या जमिनीवर केवळ "प्रकल्पग्रस्त" ही बिरुदावली लावून त्यांना वाऱ्यावर सोडून दिलेले असणे, त्यामुळे या प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची झालेली असणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांकडून सरकारच्या विरोधात तीव्र असंतोष व्यक्त होत असणे, मुंबई महानगरपालिका प्रतिवर्षी पाणी बिलापोटी वसूल करीत असलेल्या रकमेच्या केवळ एक टक्का रक्कम ठाणे जिल्हा परिषदेकडे रॉयल्टी म्हणून वळती करून दिली जात असणे, या रकमेचा विनियोग केवळ प्रकल्पग्रस्त आणि शहापूर तालुक्यासाठीच करण्याची गरज असताना तिचा विनियोग नक्की कोणासाठी व कशाप्रकारे केला जातो हा मोठा संशोधनाचा विषय असणे, मागील 45 वर्षापासून ही प्रकल्पग्रस्त मंडळी शासकीय नोकऱ्या व पुनर्वसनासाठी शासन दरबारी पायऱ्या झिजवत असताना त्यांच्या पदरी उपेक्षाच आलेली असणे, सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व्हावे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देणे या बाबत श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"मौजे ढाणकी, ता.उमरखेड, जि.यवतमाळ येथे अस्तित्वात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीला 60 वर्षे पूर्ण झाल्यामुळे त्या इमारतीसाठी रुपये 4 कोटी 71 लाख 75 हजार इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण भागातील आदिवासी बहुल भागात आहे. सदर आदिवासी समाज हा सहस्त्रकुंड अभयारण्यात वसलेला आहे तसेच घनदाट जंगलानी वेढलेल्या भागात वसलेला आहे. तेथील अनेक तांड्यावस्त्यांमध्ये साथीचे रोग होतात आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणा कमी पडते. तालुक्याला जाणारा रस्ता चांगला नसल्यामुळे ग्रामीण रुग्णालयात वेळेवर पोहोचता येत नाही, त्यामुळे अनेकवेळा रुग्ण दगावतात. तेव्हा रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत म्हणून ढाणकी येथे असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्यात यावा, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : चंद्रपूर जिल्ह्यातील भटक्या व विमुक्त जाती समाजातील लोकांना शासकीय योजनांचा लाभ न मिळणे या बाबत श्री.मितेश भांगडिया,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"चंद्रपूर जिल्ह्यात भटके विमुक्त समाजाची बरीच मोठी लोकसंख्या आहे. हा समाज गावागावात जाऊन लोकांचे मनोरंजन वा विविध कामे करुन आपला उदरनिर्वाह करीत असतो. गेल्या काही वर्षात या समाजाचे लोक गावागावांमध्ये स्थायी स्वरुपात निवास करीत आहेत.बहिरुपी, बेलदार, नागयोगी, गोसाई, सरोदी, वडार, पारधी, गारपगारी, पाथपंथी, डवरी अशा अनेक जातींचा समावेश भटक्या विमुक्त जातीमध्ये होतो. अस्थायी निवासामुळे या समाजातील लोकांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेण्याकरिता अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झालेली आहे. फिरस्तीमुळे रहिवासी दाखला, जन्म दाखला, जातीचे प्रमाणपत्र, व्हॅलिडीटी करिता आजोबांची जन्म तारीख अशा अनेक समस्या त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेताना येतात. या समाजाच्या सर्वांगीण विकासाकरिता शासकीय विशेष योजना प्रस्तावित करण्याची आत्यंतिक आवश्यकता आहे. या योजनांकरिता लागणारी कागदपत्रेही आत्यंतिक सुलभरितीने त्यांना उपलब्ध करुन देता आली पहिजेत. या सर्वांचा साकल्याने विचार होण्याची आत्यंतिक गरज आहे, परंतु याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही, याबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. "

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी./मु.शी. : परिवहन कार्यालयाचा कारभार ऑनलाईन करून एजंट मुक्त करण्याचा निर्णय घेतल्यामुळे अधिकारीवर्ग जाणीवपूर्वक कामे रखडवत असणे याबाबत श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"राज्याच्या परिवहन आयुक्तांनी नुकतेच एक परिपत्रक काढून परिवहन कार्यालयाचा कारभार ऑनलाईन करून एजंट मुक्त करण्याचा निर्णय घेण्यात येणे. मात्र या निर्णयापूर्वी ताडदेव येथील परिवहन कार्यालयातून दिवसाला 163 परवाने मिळत असताना आता दिवसाला केवळ 19 भाग्यवंतांना परवाने देण्यात आल्याचे उघडकीस येणे, तसेच एजंट हटाव मोहिमेमुळे परिवहन कार्यालयात एकही एजंट येत नसणे. मात्र परवान्याच्या कामासाठी मिळणारी चिरीमिरी बंद झाल्यामुळे अधिकारी जाणीवपूर्वक कामे रखडवत असल्याचे दिसून येणे. तीच परिस्थिती राज्यातील इतर परिवहन कार्यालयात असल्याची शक्यता, याबाबत सदर कामात विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून वीज बिलाची वसुली करण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत श्री.दीपकराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"राज्यातील 80 हजार फिडरवरील वसुलीकरिता बाहेरून वसुली एजंट नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, ही योजना अंमलात आणल्यास वसुली एजंट म्हणून नियुक्त करण्यात येणारे एजंट हे गुंडगिरी स्वरूपाचे असण्याची व्यक्त होत असलेली शंका व हे एजंट बळजबरीने सर्वसामान्य वीज ग्राहकांकडून पठाणाप्रमाणे वसुली करण्याची व्यक्त होत असलेली भीती, राज्यातील वीज बिले ग्राहक स्वेच्छेने भरत असतात, महावितरण कंपनी त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून वीज बिलाची रक्कम वसूल न करता बिलाची वसुली करण्यासाठी खाजगी व्यक्तींची नेमणूक करणार असल्याने नागरिकांत पसरलेले चिंतेचे व भीतीचे वातावरण, महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडूनच वीज बिलाची वसुली करण्याबाबत होत असलेली मागणी, मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : पालघर जिल्ह्यात विविध बंदरातून मोठ्या प्रमाणात सक्शन पंपाद्वारे रेती उपसा करण्यात येणे, याबाबत श्री.आनंद ठाकूर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"पालघर जिल्ह्यातील कोपर, खानिवडे, चांदीप, उसगाव या बंदरातून मोठ्या प्रमाणात सक्शन पंपाद्वारे रेती उपसा करण्यात येणे, त्याची अवैध वाहतूक शिरसाड मार्गे मुंबई व ठाण्याकडे तर पारोळ फाट्यावरून भिवंडी, कल्याणकडे करण्यात येणे, कोपर व खानिवडे ही बंदरे मोठी असल्याने रोज शेकडो गाड्या या बंदरातून अवैध विनापरवाना वाहतूक करीत असून, शिरसाड नाक्यावर महसूल व पोलीस विभागाचे कर्मचारी 24 तास कर्तव्यावर असतानाही याच कर्मचाऱ्यांच्या पाठिंब्यामुळे हा धंदा सुरु असून, शासनाचा लाखो रुपयांचा बुडत असलेला महसूल, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, मुंबई-अहमदाबाद मार्गावर मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या अवैध रेती वाहतुकीला तत्काळ आळा घालण्याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कारवाई, सदर विषय सार्वजनिक महत्त्वाचा असल्याने विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास शिफारस करीत आहे."

महोदय, मागच्या अधिवेशनात सुध्दा मी हा मुद्दा उपस्थित केला होता. परंतु त्याचे उत्तर आलेले नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : नागपूर शहरात रिलायन्स व इंडस कंपनीकडून केबल डक्ट टाकण्याच्या कामात विलंब होत असल्याने त्या भागात अपघाताचे प्रमाण वाढणे, याबाबत श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

"नागपूर शहरात केबल डक्ट टाकण्यासाठी रिलायन्स व इंडस कंपनी यांना परवानगी देण्यात आली आहे. तथापि, सदर कामे विलंबाने होत असल्याने नागपूर शहर विद्रूप झाले असून अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे, अंबाझरी मार्गावर रिलायन्स कंपनीकडून खड्डा खोदण्यात आला, याच खड्डयात कु.पिंकी सोळंकी या दोन वर्षीय मुलीचा मृत्यू होणे, आतापर्यंत तीन जणांचे झालेले मृत्यू, संपूर्ण शहर खड्डयाने युक्त शहर झालेले आहे. या गंभीर घटनेमुळे जनतेमध्ये भीतीचे व असंतोषाचे वातावरण पसरणे, या बाबत नागपूर शहराचे विद्रुपीकरण वाढू नये व अपघात होऊ नयेत म्हणून केबल टाकण्याची कामे तातडीने करून त्वरित खड्डे बुजविण्याची कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना तातडीने आदेश द्यावेत, अशी शिफरस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, कन्नड माध्यम शाळेच्या तुकड्या व त्यातील शिक्षकांच्या पदांना अनुदान पात्र म्हणून घोषित करुनही त्यांना वेतन अदा न करणे, याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच-ा मांडतो.

""राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, कन्नड माध्यम शाळेच्या 3247 वर्ग तुकड्या व त्यामधील 4798 शिक्षक पदांना सन 2012 पासून अनुदान पात्र म्हणून घोषित करण्यात येणे, तथापि, या सर्व खाजगी शिक्षकांना मान्यता देऊनही आतापर्यंत वेतन अदा करण्यात न येणे, परिणामी त्यांच्या कुटुंबीयांवर आलेली उपासमारीची पाळी, तसेच या बाबत महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना, ठाणे या संघटनेच्या प्रतिनिधींनी माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, माननीय शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांना दिनांक 3 मार्च, 2015 रोजी वा त्या सुमारास निवेदन सादर करण्यात येणे, तथापि, अद्याप कार्यवाही न झाल्याने बेमुदत उपोषणास बसण्याचा शिक्षक संघटनेने शासनास इशारा देणे, सबब, मान्यता दिलेल्या सर्व शिक्षकांचे वेतन अदा करण्यात यावे, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : बीड जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या दैनंदिन कारभाराबाबत अनेक तक्रारी असणे, याबाबत सर्वश्री अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या निवेदनाच्या अनुषंगाने माझे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या संदर्भातील चौकशीची कार्यवाही केव्हा पूर्ण होईल, तसेच ही संपूर्ण चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधितांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सभागृहात दिलेली माहिती खरी मानून त्या विषयीची ताबडतोब चौकशी आणि तद्नंतर कारवाई करण्याचे सरकारचे धोरण आहे. सन्माननीय सदस्यांनी माहिती दिल्यानंतर मी ताबडतोब या विषयी चौकशीचे आदेश दिले आहेत. या गोष्टीला 7-8 दिवस झाले आहेत. पुढील 20-25 दिवसांत या संदर्भातील कार्यवाही पूर्ण होईल. अनेक वेळा चौकशी करीत असताना संबंधित अधिकाऱ्यांना सक्तीच्या सुटीवर पाठविले किंवा त्यांच्यावर अन्य कारवाई केली आणि संबंधित अधिकारी/कर्मचारी जर मॅटमध्ये गेले तर निकाल हा त्यांच्या बाजूने लागतो. कारण चौकशीपूर्वीच संबंधितांवर पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन ठेवून कारवाई केल्याचे सांगितले जाते. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करावयाची असेल आणि न्यायपूर्वक पुढे जावयाचे असेल तर ती नियमानुसार करावी लागेल. या प्रकरणाची चौकशी उच्च आणि नि:पक्ष अधिकाऱ्यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. चौकशीमध्ये जे दोषी आढळून येतील त्यांना पाठीशी घालण्यात येणार नाही. विशेषत: शालेय शिक्षण विभाग हा विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा विभाग आहे. शालेय शिक्षण विभागाकडे पैसा कमी पडला म्हणून त्या भागातील विधिमंडळ सदस्यांनी दिलेला निधी काही काळ अडवून ठेवला जात असेल तर ते मोठे पाप आहे. राज्य सरकारचा निधी अपुरा पडतो म्हणून विधिमंडळ सदस्य त्यामध्ये आपला निधी कॉन्ट्रीब्युट करीत असतील आणि शासकीय अधिकारी त्यात अडथळा निर्माण करीत असतील तर त्या अधिकाऱ्यांची अजिबात गय केली जाणार नाही. त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी पुढील महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल आणि जबाबदार अधिकाऱ्यावर नक्की कडक कारवाई करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभागृहापुढील कामकाजाबाबत

उप सभापती : मी सभागृहाला विचारु इच्छितो की, आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करावयाची की, मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित करावयाची ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आता मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी. तद्नंतर पुरवणी मागण्यांवर चर्चा सलगपणे सुरु करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मध्यंतर घ्यावयाचा असेल तर आवर्जून घ्या. परंतु आज ज्या मागण्या चर्चेला दर्शविलेल्या आहेत त्या विभागाच्या मंत्र्यांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबत विधिमंडळ सचिवालयाच्या अधिकाऱ्यांकडून निरोप पाठवावा. मी सुध्दा संबंधित मंत्र्यांना त्या बाबत निरोप देतो.

महोदय, दुसरी बाब अशी की, माझ्या विभागासाठी राज्यमंत्री नाहीत. शिवाय खालच्या सभागृहात सुध्दा पुरवणी मागण्यांवर चर्चा आहे. त्यामुळे मला विधानसभा सभागृहात बसण्याची अनुमती द्यावी. त्यानंतर मी पुन्हा येथे येईन.

उप सभापती : ठीक आहे. माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी सांगितल्यानुसार विधिमंडळ सचिवालयाच्या अधिकाऱ्यांनी आज ज्या मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या चर्चेला दाखविण्यात आलेल्या आहेत त्या विभागाच्या मंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबत अवगत करावे.

सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी दुपारी 2.30 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(दुपारी 1.49 ते 2.30 वाजेपर्यंत मध्यंतर)

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. प्रकाश बिनसाळे)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आता पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरू होत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरू करण्यापूर्वी मला एक बाब मांडावयाची आहे. पुरवणी मागण्यांवर जास्त चर्चा होत नाही अशी आमच्याकडून नेहमी तक्रार होत असते. काल मी स्वतः माननीय सभापतींना या संदर्भात भेटलो होतो. काल ठरले होते की, विभागांच्या खर्चाच्या पुरवणी मागण्यांवर जास्त चर्चा करायची. आता कामकाजपत्रिकेवरील अगोदरचे कामकाज पूर्ण झाले आहे. पुरवणी मागण्यांवरील चर्चेनंतर सभागृहाचे कामकाज संपवायचे आहे. माझी विनंती आहे की, आपण सन्माननीय सदस्यांना शक्य होईल तेवढे बोलू द्यावे. पुरवणी मागण्यांवरील चर्चा दोन दिवस असते. परंतु, अविश्वास प्रस्तावावरील चर्चेमुळे पुरवणी मागण्यांवरील चर्चेचा एक दिवस वाया गेलेला आहे. त्यामुळे पुरवणी मागण्यांवरील चर्चेचा हा पहिलाच दिवस आहे. गटनेत्यांच्या अविश्वास प्रस्तावाच्या संदर्भातील बैठकीत ठरले होते की, मंगळवारचा पूर्ण दिवस पुरवणी मागण्यांवर चर्चा करायची. मी मघाशीही या संदर्भात आपणास सांगितले होते. त्यामुळे त्याप्रमाणे कामकाज व्हावे अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : आज पुरवणी मागण्यांवरच चर्चा करण्यात येईल.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरू करण्यापूर्वी माझी आपणास एक विनंती आहे. आम्ही मध्यंतरापूर्वी माननीय सभापतींना विनंती केली होती आणि माननीय मंत्री श्री. विनोद तावडे यांनी देखील सांगितले होते की, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी संबंधित सर्व माननीय मंत्र्यांनी उपस्थित राहण्याच्या दृष्टीने सचिवांना तशा सूचना दिल्या होत्या. पुरवणी मागण्यांसारख्या गंभीर बाबीवर चर्चा होत आहे आणि तरी संबंधित विभागांचे माननीय मंत्री उपस्थित नाहीत. मुख्यमंत्री, महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, वित्त व नियोजन, वने, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, सहकार, पणन, ग्रामविकास आणि जलसंधारण, आदिवासी विकास, महिला व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

बालविकास, अन्न व नागरी पुरवठा, जलसंपदा, उद्योग, ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा या विभागांचे माननीय मंत्री उपस्थित नाहीत.

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांच्या इतकेच माननीय राज्यमंत्री देखील सक्षम आहेत. आम्ही नोंद घेत आहोत. आपण आजिबात चिंता करण्याची गरज नाही. आपण तसे काही मानत असाल तर ते चुकीचे आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांना अधिकार नाहीत.

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, आम्हाला नोंद करण्याचे अधिकार नाहीत असे म्हणत असाल तर ते चुकीचे आहे.

तालिका सभापती : मी सांगू इच्छितो की, कामकाजपत्रिकेवर ज्या विभागांच्या पुरवणी मागण्या दाखविण्यात आलेल्या आहेत, त्या विभागांचे माननीय मंत्री विधानसभा सभागृहात असतील तर संबंधित माननीय राज्यमंत्र्यांनी या सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी संगितले आहे की, माननीय राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. ही बाब अतिशय गंभीर आहे. पुरवणी मागण्यांवरील उत्तरे माननीय मंत्र्यांनी द्यायची आहेत.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण खात्री करावी. कामकाजपत्रिकेवर ज्या विभागांच्या पुरवणी मागण्या दाखविण्यात आल्या आहेत, त्या विभागांचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. गृह खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. परंतु गृह खात्याचे दोन माननीय राज्यमंत्री असताना त्यापैकी एकही माननीय राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. नगरविकास व महसूल खात्याचे माननीय राज्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री. भाई गिरकर : महोदय, विधानसभा सभागृहातही पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरू आहे.

तालिका सभापती : माननीय संसदीय राज्यमंत्र्यांनी या संदर्भात संबंधित मंत्री महोदयांना निरोप द्यावा. मी सूचना करीत आहे की, ज्या खात्याचे माननीय मंत्री विधानसभा सभागृहात असतील, त्या खात्याच्या माननीय राज्यमंत्र्यांनी तातडीने सभागृहात उपस्थित रहावे. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.35 ते 3.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)

पृ.शी./मु.शी.: सन 2014-2015 च्या पूरक मागण्यांवर चर्चा

तालिका सभापती : आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. पुरवणी मागण्या आणि त्या खालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रस्तुत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगावा. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहेच. सदर चर्चा व मंत्र्यांचे उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

शीर्षक : विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरवणी मागण्या.

तालिका सभापती : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

1 मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- बी-1, बी-10, एफ-2, एफ-3, जे-1

2 महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- बी-2, सी-2, सी-5, सी-6, डी-3, डी-8, डी-9

3 वित्त आणि नियोजन, वने मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- सी-7, जी-1, जी-3, जी-9, ओ-1

4 शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- ई-2, एस-1, डब्ल्यू-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-7, झेडएफ-2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती.....

5 सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- एच-6, एच-8, व्ही-2

6 ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- एल-1, एल-5, एक्स-3

7 आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- टी-5, टी-6

8 अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- एम-2

9 जलसंपदा मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- आय-1, आय-5

10 उद्योग मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- के-3

11 ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- के-11

12 पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- वाय-6

13 सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- आर-1

14 सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक :- एन-3

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सरकारने, या अधिवेशनात मांडलेल्या पुरवणी मागण्या मी वाचत होतो. सन्माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी विरोधी पक्षाचे सदस्य असताना मागील 15 वर्षात पुरवणी मागण्यांवर जेवढी भाषणे केली आहेत, त्यामधील बरीचशी भाषणे मी वाचलेली आहेत. प्रत्येक वेळी पुरवणी मागण्यांवर ते पोटतिडीकीने बोलत असत. आता वित्त मंत्री झाल्यानंतर त्यांनी 3536 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत. यापैकी महसूल,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

मदतकार्ये व पुनर्वसन विभागाला दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी 2180 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महसूल व वन विभाग, बाब क्रमांक 7, पृष्ठ क्रमांक 8 अन्वये महसूल व वन विभागाकडून 4800 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. हिवाळी अधिवेशनात 7 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करीत असताना 2000 कोटी रुपये त्यावेळी प्राप्त झाले आणि आता 2180 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, एकूण 4800 कोटी रुपयांच्या मागणीपैकी 4000 कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकारकडून झालेली आहे.

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभागृहातील कामकाजाच्या चित्रीकरणाबाबत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. सभागृहात सन्माननीय संसदीय कार्य मंत्री उपस्थित आहेत. सध्या सभागृहातील कामकाजाचे चित्रीकरण सुरु आहे. परंतु, ते प्रत्यक्षात दाखविण्यात येणार आहे किंवा नाही, हे कळण्यास मार्ग नाही. काल आपण प्रायोगिक तत्त्वावर प्रश्नोत्तराच्या तासाचे चित्रीकरण करण्याचे ठरविले होते. आज सर्व दिवसभर, सर्व कामकाजाचे चित्रीकरण करण्यासाठी सभागृहाची अधिकृत परवानगी घेऊन चित्रीकरण करण्यात येत आहे का ? या संदर्भात शासनाला काही निवेदन करावयाचे आहे का ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, कालच मी सभागृहात सांगितले की, आपण सभागृहाच्या दिवसभराच्या कामकाजाचे चित्रीकरण करणार आहोत. कालपासून आपण हे चित्रीकरण सुरु केले असून काल प्रायोगिक तत्त्वावर प्रश्नोत्तराच्या तासाचे चित्रीकरण करण्यात आले होते. दोन्ही सभागृहातील कॅमेऱ्यांचा सेटअप लक्षात घेऊन आज पासून सर्व कामकाज लाईव्ह करावे, असे आपण सांगितलेले आहे. यासाठी सभापती महोदयांनी परवानगी दिली आहे. मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय गट नेते आणि अन्य सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे, सर्व चर्चेचे चित्रीकरण आपण महाराष्ट्राला दाखवित आहोत व त्यासाठी चित्रीकरण करीत आहोत. या बाबतचा पूर्ण अधिकार आपण सभापती महोदयांकडे ठेवला आहे. सभागृहातील एखादे कामकाज दाखवू नये, असे ज्यावेळी सभापती महोदयांना वाटेल तेव्हा तेवढ्यापुरते चित्रीकरण दाखविण्याचे थांबविण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार सभापती महोदयांना दिलेला आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी वारंवार सांगितले आहे की, सभागृहातील कोणते कामकाज दाखवावे व कोणते दाखवू नये अशा प्रकारच्या रिमोट कंट्रोलचे बटण माननीय सभापतींकडे आहे. चॅनलवर सभागृहाची माहिती दिसायला सुरु झाल्यानंतर लोक जी माहिती पाहणार आहे, त्या दरम्यान काही भाग दाखवायचा नसेल तर तेवढा वेळ त्या चॅनलवर काहीही येणार नाही काय ? तेवढा वेळ जाहिराती चालू राहतील काय व एवढ्या जाहिराती देखील कशा काय मिळतील. त्या चॅनलवर दुसरी माहिती टाकणार असाल तर त्याला कोणी काही लिंक जोडू शकते. त्यामुळे याबाबत स्पष्टता होणे आवश्यक आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय सभापती व अध्यक्ष यांच्याकडे एक बटण राहणार आहे. सभागृहाचे कामकाज सुरु असेल तेव्हा ती प्रोसेस सुरु असते. जेव्हा माननीय सभापतींना वाटेल की, सदर कामकाज दाखविण्यात येऊ नये, तेव्हा माननीय सभापती बटण दाबतील व कंट्रोल रूममधून ते चित्रिकरण दाखविणे बंद केले जाईल. परंतु माननीय सभापतींनी बटण दाबल्यावर चित्रीकरण दाखविण्याची प्रक्रिया सुरु होईल. दरम्यानच्या काळात काहीच राहणार नाही. बाहेर चॅनलवाल्यांना जो इन्पूट देण्यात आला तो त्यावेळी किंवा त्यांना पाहिजे तेव्हा ते चित्रीकरण दाखवू शकतात. यामध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार चॅनलला देण्यात आलेला नाही. माननीय सभापती किंवा माननीय अध्यक्ष ज्या चित्रीकरणास मान्यता देतात तेवढेच चित्रीकरण बाहेर जाणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्री म्हणतात ती गोष्ट एका मर्यादेपर्यंत बरोबर आहे. पाहिजे तेव्हा बटण दाबावे व पाहिजे तेव्हा बटण दाबू नये असे होता कामा नये. या परिसराचा सर्व अधिकार माननीय सभापती यांच्याकडे आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे बरोबर बोलत नाहीत, पार्लमेंटरी शब्द वापरीत नाहीत, अनपार्लमेंटरी शब्द वापरीत आहेत म्हणून ते बटण दाबावे असा त्यांना अधिकार दिलेला नाही. चित्रीकरण चालू करण्यासाठी किंवा बंद करण्यासाठी माननीय सभापती जेव्हा बटण दाबतील तेव्हा त्यांनी सभागृहाला जाणीव करून दिली पाहिजे. या ठिकाणी सभागृहाच्या वतीने माननीय सभापती काम करीत असतात. जे अनुभव आले ते वाईट होते म्हणून त्याबाबत मी चर्चा करीत नाही किंवा त्याची पुनरावृत्ती करीत नाही. सभागृहाला काही अधिकार आहेत, एखादे वाक्य किंवा एखादी चर्चा बरोबर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील..

नाही, असे वाटले तर माननीय सभापतींनी सभागृहाला जाणीव करून दिली पाहिजे की, ही चर्चा बरोबर होत नाही. तेव्हा आम्ही सभागृहात ठरवू की, सभापती बोलतात ते बरोबर आहे किंवा नाही अशी यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. माझा मुद्दा वेगळा होता. ज्याप्रमाणे लोकसभेचे कामकाज दाखविण्यासाठी लोकसभेचे स्वत:चे चॅनल आहे. त्याप्रमाणे विधानसभेचे माजी अध्यक्ष माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी जाहीर केले होते की, लोकसभेप्रमाणे स्वत:चे चॅनेल असेल, त्या चॅनलवरून महाराष्ट्रात सभागृहाचे कामकाज बघावयास मिळेल. याबाबत काय प्रगती झाली आहे किंवा तो निर्णय आपण बदलला आहे काय ? यासंदर्भातील माहिती सभागृहाला कळली पाहिजे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी घेतलेला निर्णय बदललेला नाही. लोकसभेत ज्या प्रमाणे कामकाज दाखविले जाते त्या संदर्भातील प्रस्ताव आपणाकडे आलेला आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर पार्लमेंटचे तज्ज्ञ आपणाकडे येणार आहेत, ते आल्यानंतर हा सेटअप कसा करावा हे ते सांगणार आहेत. ज्या निम सरकारी कंपनीने पार्लमेंटचे काम केले होते त्याच कंपनीला हे काम दिले आहे. फक्त निधीला मान्यता देण्याचे काम सरकार करणार आहे. पार्लमेंटच्या धर्तीवर आपल्या सभागृहाचे चित्रीकरणाचे काम करण्यात येणार आहे. तेथे जे नियम व माननीय सभापतींना अधिकार आहेत तेच नियम व अधिकार येथील माननीय सभापती राहणार आहेत. माननीय सभापती व अध्यक्षांनी मी बटण चालू करतो व बंद करतो असे सांगणे हे कितपत योग्य आहे, यासाठी मी सर्व गटनेत्यांची एक बैठक घेतो. कारण सभागृहातील एखादे वाक्य काढून टाकण्याचा अधिकार माननीय सभापतींना असतो व ते सांगतात की, हे वाक्य मी रेकॉर्डवर ठेवणार नाही. जे येथे लिखित आहे, तोच अधिकार चित्रीकरणाबाबत माननीय सभापती व अध्यक्षांना आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, दोन्ही सभागृहातील गट नेत्यांची बैठक घेण्यात यावी व कोणत्या चॅनलवर दाखविणार आहे याची माहिती देखील दिली पाहिजे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, पुढील दोन तीन दिवसांत मी दोन्ही सदनाच्या गट नेत्यांची बैठक बोलविणार आहे. ज्या चॅनलला आपण इन्पूट देणार आहोत व त्या चॅनलने हे किती वेळ दाखवावे हा त्या चॅनलचा अधिकार आहे. जो पर्यंत आपला स्वत:चे चॅनल तयार होणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) N-3

VVK/ ST/ प्रथम श्री.रोझेकर... 14:50

श्री.गिरीष बापट..

तोपर्यंत सर्व चॅनलला हे चित्रीकरण देण्यात येणार आहे. आपला स्वतःचे चॅनल तयार झाल्यावर सभागृहाचे कामकाज जितका वेळ चालेल ते सर्व कामकाज त्या चॅनलवरून दाखविण्यात येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, संसदेचे राज्यसभा व लोकसभा असे दोन चॅनल आहेत, एकच चॅनेल तयार केला तर ते फक्त विधानसभेचे कामकाज दाखवतील व विधानपरिषदेचे कामकाज दाखविले जाणार नाही.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, लोकसभेसारखे येथे देखील दोन्ही सभागृहाचे कामकाज रिलिज करण्यात येणार आहे. कोणत्या सभागृहाचे कामकाज बघावे यासाठी चॅनल क्रमांक वेगळे राहणार आहेत, लोकसभेला देखील लोकसभा व राज्यसभा असे दोन चॅनल आहेत. कोणाला राज्यसभेचे कामकाज बघायचे असेल तर तो राज्यभेचा चॅनल सुरु करु शकेल. लोकसभेप्रमाणे आपल्या सभागृहाचे कामकाज करण्यात येणार आहे. ही सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुढील अधिवेशनापर्यंत वेळ लागेल असे मला वाटते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: सन 2014-2015 च्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

(चर्चा पुढे सुरु..

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्य सरकारकडे आलेल्या 800 कोटी रुपयांच्या मागण्यांच्या बाबतीत मला महसूल मंत्र्यांकडून उत्तराची अपेक्षा आहे. 4800 कोटी रुपयांची मागणी आलेली असताना फक्त 4000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली असून पुढील 800 कोटी रुपयांचे काय करणार आहात याचे उत्तर मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे. मागच्या आठवड्यात 21 फेब्रुवारी, 1 मार्च व 8 मार्च रोजी झालेली गारपीट, अवकाळी पाऊस यासंदर्भात चर्चा घडवून आणली होती. या चर्चेच्या उत्तरात संबंधित शेतकऱ्यांना मदत मिळेल असे सांगण्यात आले होते. मागील आठ दिवसांपासून संपूर्ण महाराष्ट्रात सलग गारपीट व अवकाळी पाऊस पडत आहे. त्याबाबत शासनाचे काय धोरण आहे, दुष्काळ, गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतकरी त्रस्त झाला असून त्यांना सरकार मदत करणार आहे काय ? माझी सरकारला विनंती आहे की, अशा परिस्थितीत सरकारला कर्ज काढावे लागले तरी चालेल पण आपण शेतकऱ्यांना वाढीव मदत करावी.

सभापती महोदय, राज्य सरकारकडे निधीची अडचण आहे, राज्य सरकारने केंद्र सरकारकडे दुष्काळ व गारपिटीच्या मदतीचा प्रस्ताव पाठविला आहे. केंद्र सरकारकडून एक पैसा देखील राज्य सरकारला मदतीच्या रुपाने मिळालेला नाही. काल मी मदत व पुनर्वसन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. इतर चार राज्यांना केंद्र शासनाने मदत केली आहे. आपल्या राज्यांने मदतीसाठी दोन वेळा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविले होते. केंद्र शासनाकडून इतर राज्याच्या महत्वाच्या अधिकाऱ्यांनी व मंत्री महोदयांनी दिल्लीत जाऊन चार राज्यांना मदत मिळवून घेतली आहे. महाराष्ट्र राज्याने निवडणुकीच्या काळात आपणावर भरभरुन प्रेम केले, त्या महाराष्ट्राला केंद्र शासनाकडून काहीही मदत आजपर्यंत मिळालेली नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, व्होडाफोन या मल्टीनॅशनल कंपनीला 3200 कोटी रुपयांची करात सवलत दिली आहे. राज्यावर आपत्तीकालीन परिस्थिती आली असताना राज्याच्या अधिकाराप्रमाणे केंद्र सरकारकडे निधी मागितला तरह केंद्र सरकार निधी देत नाही. ही महाराष्ट्रातील जनतेची

...5..

श्री.धनंजय मुंडे...

चेष्टा आहे. निवडणुकीच्या काळातील बोलणे वेगळे होते व आताचे बोलणे वेगळे आहे. महाराष्ट्रातील जनतेची मोठी फसवणूक राज्य व केंद्र सरकार करीत आहे. याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे.

सभापती महोदय, पंतप्रधान महोदयांनी कोणत्या देशाला किती मदत करावी हा त्यांचा अधिकार आहे. त्या अधिकारावर माझ्या सारख्याने या सभागृहात बोलणे उचित नाही. आज तळमळीने यासाठी बोलावे लागते की, गावाकडील पारावर बसलेला आमचा शेतकरी दुष्काळात होरपळत आहे, गारपिटीमुळे हवालदिल झालेला आहे, अशा वेळी आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी मॉरिशस या देशाला 32 अब्ज कोटी रुपयांची मदत दिल्याची बातमी दूरदर्शवर आम्ही ऐकतो.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

माननीय श्री.बापट साहेब मग आम्ही काय घोडे मारले, असा प्रश्न निर्माण होतो. तुम्ही जरी शेतकरी नसला तरी आम्ही शेतकरी आहोत. (...अडथळा...) सभापती महोदय, काय कारण आहे की, राज्य सरकार अशा भयंकर दुष्काळ, गारपीट आणि अवकाळी पावसामुळे जे नुकसान झाले, ती नुकसान भरपाई देण्यासाठी केंद्र शासनाकडून मदत घेऊ शकले नाही ? राज्य शासनाने याबाबत खुलासा करण्याची आवश्यकता आहे. दुष्काळाच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणात याबाबत कोणताही खुलासा करण्यात आला नाही. मदत कधी मिळेल, याबाबत कोणतेही खात्रीशीर उत्तर मिळाले नाही. म्हणून कमीत कमी या पुरवणी मागण्यावरील चर्चेला उत्तर देताना माननीय महसूल, मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी खुलासा केला पाहिजे की, आम्ही राज्यातील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्र शासनाकडून अमुक कालावधीत एवढी मदत घेऊ. ज्यावेळी या संदर्भात सभागृहात चर्चा झाली त्यावेळी मी आमच्या काळात आम्ही केंद्र शासनाकडून किती मदत आणली, हे सांगितले. ते रेकॉर्डवर देखील आहे. मग आपल्याला केंद्र शासनाकडून मदत मिळण्यासाठी काय अडचण आहे ? मागील 4-5 दिवसात नाशिक आणि ज्या ज्या भागात गारपीट झाली त्या भागातील द्राक्ष बागायतदारांचे अडीच हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले. राज्यातून जी द्राक्षांची निर्यात होणार आहे, त्याचा विचार केला तर जवळपास 4 हजार कोटी रुपयांच्या निर्यातीला फटका बसणार आहे. हे शेतकऱ्यांचे जेवढे नुकसान आहे, तेवढे राज्य सरकारचे देखील नुकसान आहे. सर्वच गोष्टी राज्य सरकारने कराव्यात, असे आम्ही म्हणत नाही. परंतु अशा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी राज्य सरकारची जेवढी जबाबदारी आहे तेवढी केंद्र शासनाची देखील जबाबदारी आहे. केंद्र शासन जबाबदारी उचलणार आहे की नाही, हे मला या निमित्ताने विचारावयाचे आहे.

सभापती महोदय, मला आणखी एक विषय कळलेला नाही. तो म्हणजे शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेले कर्ज फेडण्यासाठी आपण जी तरतूद केली त्याबाबत हिवाळी अधिवेशनात देखील घोषणा करण्यात आली. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात देखील याबाबत उल्लेख आहे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

त्या दिवशी मुख्यमंत्री महोदयांनी या संदर्भात सभागृहात निवेदन देखील केले. मी जबाबदारीपूर्वक सांगतो की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्ज मुक्तीच्या घोषणेबाबत उल्लेख आला आणि त्यानंतर 2 दिवसांनी किंवा दुसऱ्या दिवशी जी मंत्रिमंडळाची बैठक झाली त्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. हे खरे आहे की, सन 2013-14 मध्ये सावकारांना जी लायसेन्स मिळालेली आहेत त्या लायसेन्समधील क्लॉज 3 मध्ये असे नमूद केलेले आहे की, या सावकारांना शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करता येणार नाही. मग अशा अनधिकृत दिलेल्या कर्जाची परतफेड शासन अधिकृतरित्या कशी करणार आहे ? जर माझ्याकडे सावकारीचे लायसन्स आहे आणि माझ्या लायसन्समध्ये स्पष्टपणे लिहिलेले आहे की, तुम्हाला या लायसन्सच्या आधारे शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करता येणार नाही. मग मी जर कर्ज पुरवठा केला असेल, मी दिलेल्या अनधिकृत कर्जाची परतफेड शासन करणार असेल तर ते कर्ज आपण अधिकृतरित्या कसे फेडणार आहात ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय विरोधी पक्षनेते अतिशय अभ्यासू, वाचन, मनन, चिंतन करून बोलतात, असा माझा अनुभव आहे. आपण मंत्रिमंडळाचा निर्णय बघावा. राज्यात अधिकृत आणि अनधिकृत असे दोन प्रकारचे सावकार आहेत. अधिकृत सावकारांनी शेतकऱ्यांना शेतीसाठी दिलेले कर्ज जवळपास 171 कोटी रुपये आहे. शेतकऱ्यांनी बाकीच्या कामासाठी कर्ज घेतले असेल किंवा अनधिकृत सावकारांनी इतर कोणाला कर्ज दिले असेल तर ते कर्ज सरकार फेडणार नाही, असा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या निवेदनात याबाबत स्पष्ट उल्लेख केलेला आहे. दुष्काळ, आत्महत्या, अवेळी पडणारा पाऊस, गारपीट या पार्श्वभूमीवर आपण शेतकऱ्यांना मदत करण्यास निघालो असताना त्यांना चारही बाजूने मदत व्हायला पाहिजे, ती मदत टप्प्याटप्प्याने मिळेल. आता पर्यंत सर्वच मदत कोणी दिली नव्हती. आम्ही प्रत्येक वेळी मदत देत आहोत आणि ती कर्तव्याच्या भावनेतून देत आहोत. मला असे वाटते की, मंत्रिमंडळाचा जो निर्णय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट.....

आहे, त्या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांचे जे निवेदन आहे ते अत्यंत सुस्पष्ट आहे. जनतेमध्ये याबाबत निष्कारण गैरसमज होऊ नये. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याबाबत माहिती घेऊन त्यांना आपल्या भाषणात काही सुधारणा करता आली तर ती त्यांनी करावी, एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो विषय उपस्थित केला तो विषय मंत्री महोदय मंत्रिमंडळात असताना त्यांच्या का लक्षात आला नाही, हे मला कळत नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी स्पष्टपणे सांगितले की, ज्या सावकारांना शेतकऱ्यांना कर्जच देता येत नाही, अशा सावकारांनी जे कर्ज दिले असेल त्या संदर्भात तुम्ही त्या शेतकऱ्यांना कशा पद्धतीने सूट देणार आहात ? परवा माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सावकारांच्या माध्यमातून दोन पद्धतीचे कर्ज दिले गेले हे सांगितले. ज्या सावकारांना शेतकऱ्यांना कर्ज देता येते आणि ज्या सावकारांना शेतकऱ्यांना कर्ज देता येत नाही, असे दोन प्रकार त्यांनी सभागृहात सांगितले होते. त्यामुळे आपण जे सांगत आहात ते वेगळे सांगत आहात. माननीय मदत व पुनर्वसन मंत्री वेगळेच सांगत होते. माननीय विरोधी पक्षनेते स्पष्टपणे सांगत आहे की, शेतकऱ्यांनी अशा सावकारांकडून कर्ज घेतले असेल तर त्या शेतकऱ्यांचे कर्ज कसे माफ होणार आहे ? तुम्ही कोणत्या आधारे त्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार आहात, हे आपण सांगावे. या व्यतिरिक्त खाजगी लोकांकडून जे कर्ज घेतले आहे, ज्यांच्याकडे परवाना नाही अशा सावकारांकडून जे कर्ज घेतले आहे, त्या संदर्भात काय करणार ? म्हणजे माननीय मदत व पुनर्वसन मंत्री आणि माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी दिलेले उत्तर वेगळे आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, या संदर्भात उत्तराच्या भाषणात खुलासा करण्यात येईल. विरोधी पक्षनेत्यांचे भाषण सुरु असताना त्यांना डिस्टर्ब करणे बरोबर नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले भाषण कन्टिन्यू करावे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझ्या बाबतीत सांगितले. एखाद्या वेळी चुकीच्या पद्धतीने अभ्यास होऊ शकतो. परंतु राज्य शासनाने, प्रशासनाने मला माहितीच्या अधिकारात जी माहिती दिलेली आहे, ती असत्य आहे काय ? ती माहिती असत्य असेल तर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

शासनाने याबाबतीत दखल घेतली पाहिजे. मला माहितीच्या अधिकारात जी माहिती मिळालेली आहे ती मी दोन मिनिटात सभागृहाला देऊ इच्छितो. त्यामध्ये सावकारांच्या लायसन्सच्या बाबतीत आणि सावकारांना कर्ज कसे देता येत नाही, याबाबत देखील माहिती आहे. तसेच, सावकारांना लायसन्स देण्याबाबत आरबीआयचे जे निकष आहेत, आरबीआयने जी नियमावली केलेली आहे ती नियमावली देखील मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती महोदय, फेब्रुवारी महिन्यातील तारीख मला आता आठवत नाही. परंतु, माहितीच्या अधिकारात मला त्या तारखेपर्यंतची माहिती प्रशासनाने दिलेली आहे. त्या तारखेपर्यंत अशा पद्धतीची कोणतीही अंमलबजावणी राज्य शासनाकडून झालेली नाही. मी माहितीच्या अधिकारात माहिती मागविलेली आहे. ती माहिती माझ्याकडे आहे. एकदा निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी तुम्ही हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेला आहे. जो निर्णय झाला तो चुकीचा झाला. परंतु, तो चुकीचा निर्णय बरोबर करण्यासाठी तुम्ही यादी मागविली. मी जबाबदारीने सांगतो की, 20 फेब्रुवारी पर्यंत एकाही शेतकऱ्याचे नाव राज्य सरकारकडे आलेले नव्हते. ज्या शेतकऱ्यांनी सावकारांकडून कर्ज घेतले अशा एकाही शेतकऱ्याचे नाव राज्य सरकारकडे आलेले नव्हते आणि अशा पद्धतीने आपण या ठिकाणी माहिती देत आहात ? माझी तळमळ एवढ्यासाठीच आहे की, शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेले कर्ज फेडले पाहिजे या पावित्र्यात शासन असेल तर शासनाने ते कर्ज फेडावे. परंतु, ते चुकीच्या पद्धतीने होत असेल तर त्याचे अवलोकन करून देणे ही आमची जबाबदारी आहे आणि ती जबाबदारी आम्ही पार पाडत आहोत.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्र.8 वरील बाब क्र.7 संदर्भात मी बोलत आहे. जी 4,800 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे त्यापेक्षा अधिक मदत राज्य शासनाने करणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

मागील 21 फेब्रुवारी पासून कालपर्यंत या राज्यात ज्या ज्या ठिकाणी अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना सरकारने तत्काळ पंचनामे करून भरीव आर्थिक मदत करावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 6, पृष्ठ क्रमांक 8, महसूल व वन विभागाने आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी 9.13 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर केली आहे. माहे ऑक्टोबर, 2014 ते फेब्रुवारी, 2015 या कालखंडात महाराष्ट्रात 1039 शेतक-यांनी दुर्दैवी आत्महत्या केलेली आहे. अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्याच्या काळात विदर्भात आणखी 12 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे. यापैकी अद्यापपर्यंत 5026 शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी 1 लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. निम्म्या शेतकऱ्यांचे वारसदार सानुग्रह अनुदानापासून वंचित आहेत. दिनांक 10 मार्च, 2015 रोजी मला माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेल्या माहितीनुसार 276 दुर्दैवी आत्महत्यांबाबत शासनाकडून साधी चौकशी सुध्दा झालेली नाही. या संदर्भात महसूल व वन विभागाच्या दिनांक 28 एप्रिल, 2014 च्या शासन निर्णयानुसार अशी जी आत्महत्येची प्रकरणे आहेत ती 48 तासाच्या आत जिल्हास्तरीय समितीसमोर ठेवून निर्णय घेण्याचे स्वयंस्पष्ट निर्देश राज्य सरकारने या शासन निर्णयाद्वारे दिले आहेत. असे असतानाही 277 प्रकरणे प्रलंबित आहेत ही बाब चिंताजनक नाही का? शासनाने म्हटले की, 48 तासाच्या आत जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घ्यावी आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत. मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, जिल्हाधिकारी महिना दीड महिना बैठक घेत नाहीत. एकगठ्ठा प्रकरणे येण्याची वाट पाहिली जाते. एकगठ्ठयाने शेतकरी आत्महत्या करतील, त्यानंतर ती प्रकरणे निकाली काढण्याचे काम जिल्हाधिकाऱ्यांकडून होते.

सभापती महोदय, या व्यतिरिक्त 119 प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत. माहितीच्या अधिकाराखाली मला प्राप्त झालेली माहिती मी पटलावर ठेवतो, आपल्याकडे सादर करतो. ही 119 प्रकरणे तलाठ्यांच्या चुकीमुळे, पोलिसांच्या पंचनाम्यामुळे किंवा वारसदारांकडून वा कुटुंबाकडून चुकीची माहिती देण्यात आल्यामुळे अपात्र ठरविली गेली असतील आणि अशा प्रकरणामध्ये खरोखरच शेतकऱ्याने आत्महत्या केली असेल तर त्यांच्या वारसदारांना मदत देण्यात यावी अशी मी शासनाला विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, नगरविकास विभाग बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 21. नगरविकास विभागाचे माननीय राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत, त्यांच्याकडून उपस्थित करण्यात येणाऱ्या मुद्याची नोंद घेतली जाईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. प्रथा परंपरेनुसार माननीय राज्यमंत्री पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित राहतात. तशी आम्ही अपेक्षा व्यक्त केली तर ती गैर ठरु नये.

सभापती महोदय, 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार नगरपंचायतींना सहाय्यक अनुदान देण्याबाबत 245 कोटी रुपयांची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. राज्यातील एक किंवा दोन नगरपालिका वगळता सर्व नगरपालिका आर्थिकदृष्ट्या कमकुवत बनलेल्या आहेत. अशा स्थितीत नगरपालिकांना अधिक अर्थसहाय्य देण्याऐवजी राज्य शासनाने योजना आखून त्या योजनेच्या कामाकरिता एजन्सी निश्चित केली आणि त्या योजनेच्या आधारे नगरपालिकांमध्ये एजन्सीला काम द्यायचे आणि एजन्सीने केलेल्या कामाची देयके नगरपालिकेने द्यायची असा निर्णय घेतला. त्या निर्णयानुसार जर त्या नगरपालिकांनी एजन्सीची देयके अदा केली नाहीत तर वित्त विभागाच्या माध्यमातून नगरपालिकांना जी आर्थिक मदत मिळते त्या आर्थिक मदतीतून त्या देयकाची रक्कम कपात करुन घेतली जाईल. शासन स्तरावर नगरपालिका आणि नगरपंचायतींना जकातीच्या शिवाय दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. केवळ शासनाच्या अनुदानावर नगरपालिकांचा दैनंदिन कारभार अवलंबून आहे. राज्यातील बहुसंख्य नगरपालिका सरकारी अनुदानाच्या रक्कमेतून आपल्या कर्मचाऱ्यांना वेतन देऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाच्या अधिकृत वेबसाईटवर शासन निर्णय अपलोड केले जात नाहीत. 232 नगरपालिका आणि महापालिकांमध्ये इआरपी प्रणालीच्या संगणकीकरणाचे काम 5 वर्षे विना निविदा सुरु आहे. या संदर्भात विभागाचा क्र.इगस/213/प्र.क्र.110/2//नवि 33, दिनांक 21 जानेवारी, 2015 हा शासन निर्णय नगरविकास शासनाच्या वेबसाईटवर का अपलोड झालेला नाही? एबीएम कंपनीला बेकायदेशीरपणे काम करण्यासाठी ही लपवालपवी सुरु आहे. शासनाचा प्रत्येक शासन निर्णय वेबसाईटवर अपलोड झाला पाहिजे. तो अपलोड न करण्यामागे एकच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कारण आहे ते म्हणजे एबीएम कंपनीला बेकायदेशीरपणे काम दिले आहे हे उघड होऊ नये. हे मी जबाबदारीने सांगत आहे. शासन निर्णय लपवून कंपनीचा आर्थिक फायदा करून देण्यात

....3...

श्री.धनंजय मुंडे.....

आला. एबीएम कंपनीने जे काम केले आहे त्याची रक्कम नगरपरिषदांनी द्यावी असा निर्णय झाला आहे. जर एबीएम कंपनीला नगरपरिषदांनी रक्कम दिली नाही तर अनुदानाच्या निधीतून ती रक्कम कपात करून एबीएम कंपनीचे पैसे दिले जातील असे ठरले आहे. एबीएम नॉलेज बेअर लिमिटेड या कंपनीला राज्यातील 232 नगरपालिकांकडून इआरपी प्रणालीनुसार संगणकीकरणाच्या कामाचा मोबदला म्हणून जबदरस्तीने आर्थिक मोबदला देण्याची सक्ती नगरपालिकांवर केली जाते. नगरपालिकांनी या कंपनीची रक्कम अदा केली नाही तर परस्पर त्यांच्या देय अनुदानातून कपात केली जाणार आहे.

नंतर क्यू.1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

असे या कंपनीने काय केले आहे की ज्यामुळे राज्य सरकार या कंपनीवर मेहरबान झाले आहे? आज सर्व विषय बाजूला ठेवून या कंपनीला मदत करण्याची भूमिका नगरविकास विभाग करीत आहे. या कंपनी बरोबर राज्य सरकारने नेमके कोणते करार केले आहेत, कामकाजाच्या अटी व शर्ती काय आहेत, कंपनीला काम देताना माहिती तंत्रज्ञान विभागाचा अभिप्राय घेण्यात आला आहे काय, असल्यास, त्यांचे अभिप्राय काय होते, त्याची कंपनीने पूर्तता केली आहे काय याची माहिती देखील या निमित्ताने शासनाने देणे आवश्यक आहे. सदर कपंनीने रेड हॉक ऑपरेटींग सिस्टीमचा वापर केला नाही. या सिस्टीमचा वापर करणे आवश्यक असते. सदर सिस्टीम सॉफ्टवेअरद्वारे चालविणे आवश्यक असताना ती सर्व्हरद्वारेच चालविली जात आहे. कंपनीचे कर्मचारी नसताना देखील कंपनीच्या कर्मचाऱ्यांपोटीचा मोबदला नगरपालिकेतर्फे देण्यात येत आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे. हे मी आपल्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देत असून त्यासंबंधातील माहिती मंत्री महोदयांच्या उत्तरातून मिळणे आवश्यक आहे. मी पुरवणी मागण्यांवर एवढेच बोलणार आहे. विरोधी पक्षातील सर्वच सन्माननीय सदस्य पुरवणी मागण्यांवर बोलणार आहेत. त्या सर्वांनाच आपण संधी द्यावी अशी विनंती करतो आणि येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी सन 2014-2015 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभी आहे. सदर पुरवणी मागण्या या नवीन बाबीसाठी आणलेल्या आहेत की, पूर्वीच्या कामाकरिता निधी देण्यासाठी आणलेल्या आहेत, असा प्रश्न आज माझ्या समोर उभा राहिलेला आहे.

सन 2012 मध्ये आदिवासी जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधण्यात आली. आता आपण सन 2015 मध्ये आहोत. ती घरे आपण कर्मचाऱ्यांना रहायला देखील दिली. पण नक्षलग्रस्त भागाचा निधी अद्याप दिलेला नाही. याचे कारण आम्हाला कधीच कळलेले नाही. गेल्या तीन वर्षापासूनचे 40 कोटी रुपये शासनाने देणे आहे. मागणी पत्रानुसार 2416 गृहनिर्माण भांडवली खर्च 01 शासकीय निवासी इमारती 106 एकत्रित सर्वसाधारण निवास व्यवस्था पूरक मागणी असून सुद्धा घरे बांधायला लावली आहेत. पण त्यासाठी एकही पैसा दिलेला नाही. त्यामुळे आम्ही या सरकारला विनंती करतो की, नवीन बजेटमध्ये लोकांची देणी देण्यासाठी आपण तरतूद करावी. एटापल्ली, भामरागड येथे 100 टक्के नक्षलवादी आहेत. आज तेथे लोकांना राहणे कठीण झाले आहे. तेथे कर्मचाऱ्यांना राहायला सोयीची जागा नव्हती म्हणून त्यांना राहण्यासाठी जागा बांधलेली आहे. मूलचेरा हा संपूर्ण बेल्ट नक्षलवादी आहे. कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी सन 2012 मध्ये निवासस्थाने बांधण्यात आली. आज आपण 2015 मध्ये आहोत. त्यांचे 40 कोटी रुपये अद्याप पर्यंत आपण दिलेले नाहीत म्हणून कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचे पैसे शासनाने द्यावेत अशा प्रकारची मी विनंती करते. जुनी जेवढी देणी असतील ती आपण देऊन टाकावीत. आपल्या सरकारची ही पहिलीच पुरवणी मागणी आहे. यंदाचा अर्थसंकल्प हा जुनी देणी देण्यावरच राहील असे मला वाटते आहे.

यानंतर मी पान क्र.30 वरील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.23 वर बोलणार आहे. चंद्रपूर येथे 100 खाटांचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गेल्या चार-पाच वर्षापासून बांधण्याचे प्रस्तावित आहे. आता आपले शासन आल्यानंतर यासाठी काही तरी तरतूद करण्यात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस...

आली आहे. महिला स्त्रणालयासाठी न्याय दिल्याबद्दल मी शासनाचे आभार मानते. विरोधकांनी विरोध हा केलाच पाहिजे. त्यांनी विरोध केल्या शिवाय, त्यांचे विषय मांडल्या शिवाय आम्हाला आमच्या चुका दिसून येत नाहीत. आपण विरोध केल्यामुळे नेमके काय चालले आहे हे देखील आपल्याकडून कळते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व योजना आता बंद झालेल्या आहेत. दारिद्र्य रेषेखालील लोकांना धान्य मिळणार नाही. एपीएलच्या लोकांना धान्य मिळणार नाही. अशाप्रकारे आज सगळीकडे बोंब उठविण्यात आलेली आहे. आज आम्हाला लोक विचारतात की, खरेच आमचे धान्य बंद होणार आहे काय ?

आता मी पान क्र.53 वरील अन्न, नागरी व पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या बाब क्र.35 वर बोलणार आहे. विद्यमान सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत 1.77 कोटी दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचा बोजा सुद्धा महाराष्ट्र शासनाने उचललेला आहे म्हणून मी शासनाच्यावतीने जनतेला सांगू इच्छिते की, आपणाला हे सगळे मिळणार आहे. खोट्या अपप्रचाराला आपण बळी पडू नका असे म्हणण्याची वेळ आज आलेली आहे.

यानंतर पान क्र.57 वरील बाब क्र.36 वर मी बोलणार आहे. स्वयंसेवी संस्थांना आश्रमशाळा व मूलोद्योगोत्तर आश्रमशाळा चालविण्यासाठी सहायक अनुदाने देण्यासाठी अतिरिक्त तरतूद करणे, वसतिगृहे अधीक्षकांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यात आल्यामुळे दिनांक 1 जानेवारी 1996 ते 31 मार्च 2015 या कालावधीतील वेतनाच्या थकबाकीचे माननीय उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार प्रदान करण्याकरिता स्त्रये 13,16,88,000 एवढा निधी देण्याचे ठरविण्यात आले आहे. 1996 पासून ते 2015 पर्यंत किती अधीक्षक सेवानिवृत्त झाले असतील, किती जिवंत असतील ते सांगता येणार नाही. आता आपण नवीन पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून त्यांना निधी देत आहात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस...

यानंतर मी बाब क्र.37 वर बोलणार आहे. ज्येष्ठ नागरिकांना आपण महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या भाड्यामध्ये सवलत देणार आहात. ही आपण नवीनच सवलत देत आहात. आपण ज्येष्ठ नागरिकांना किती टक्के सवलत देणार आहात या एकाच बाबीचा मला आपणाकडून खुलासा अपेक्षित आहे. ज्येष्ठ नागरिकांना सवलत देण्यात येणार आहे असे आम्ही गेल्या कित्येक वर्षापासून ऐकत होतो. या गोष्टीची वाट ज्येष्ठ नागरिक पाहात होते. त्यांना आज खऱ्या अर्थाने न्याय मिळालेला आहे.

यानंतर मी पान क्र.70 वरील वैद्यकीय शिक्षण व औधषीद्रव्ये विभागाच्या बाब क्र.41 वर बोलणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील सामान्य रूग्णालयात स्कॅनिंग मशीन नसल्याची मागणी आम्ही गेल्या कित्येक वर्षापासून विधिमंडळामध्ये करीत होतो. जे मशीन आहे ते जुने असून नादुरूस्त आहे. एक्सरे मशीन देखील नादुरूस्त आहे. आम्हाला प्रत्येक वेळी टेंडर काढले असून लवकर मशीन उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगण्यात येते. परंतु, सदर मशीन अद्यापपर्यंत कुठे अडकले आहे व कुठले टेंडर पास होण्यास वेळ लागत होता हे आम्हाला माहीत नव्हते. आता पुरवठा व सामग्री याकरिता अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. माझी शासनाला विनंती आहे की, चंद्रपूर हा मागासलेला जिल्हा आहे. हा औद्योगिक जिल्हा आहे. गडचिरोली आणि चंद्रपूर या दोन्ही जिल्ह्यातील रूग्ण येथे नेहमी येत असतात. औद्योगिक क्षेत्रात अपघात देखील मोठ्या प्रमाणात होतात. त्यामुळे या मशिन्सची अतिशय आवश्यकता आहे. तेव्हा स्कॅनिंग, सोनोग्राफी व एक्सरे मशिन्स ताबडतोब देण्यात याव्यात, तसेच वैद्यकीय अधिकारी, तंत्रज्ञ, नर्सेस यांच्या रिक्त जागा देखील तातडीने भराव्यात. जेणे करून आम्हाला जनतेला न्याय देता येईल.

यानंतर मी पान क्र.71 वरील बाब क्र.42 वर बोलणार आहे. शिष्यवृत्तीचे जुने प्रलंबित देयक देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. आपल्याकडे अजून किती वर्षांची अशा प्रकारची प्रलंबित देयके आहेत त्याची माहिती द्यावी. आपण रूपये 45,22,68,000 इतकी अतिरिक्त तरतूद शिष्यवृत्तीसाठी केलेली आहे. पुरवणी मागण्यांचे पुस्तक वाचत असताना प्रत्येक वेळी माझ्या असे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस...

लक्षात आले की, प्रत्येक पानावर जुने प्रलंबित देयक देण्यासाठीच तरतूद करण्यात आलेली आहे. शासन जुनी देयकांची देणी देत आहे. तेव्हा माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, येणाऱ्या नवीन बजेटमध्ये लोकांची देणी देण्यासाठी निधी खर्च व्हावा. प्रलंबित देयके आपण टप्प्याटप्प्याने दिली तरी चालतील. अशी किती देयके असतील ते मला माहीत नाही. माझ्या एक लक्षात आले की, आपण चार हजार कोटी रुपये शेतकऱ्यांचे देणे होतो. हे देणे अतिवृष्टीचे होते. आता पाऊस आणि गारपीट थांबायला तयार नाही. आता देखील पाऊस आणि गारपीट झालेली आहे. तसेच येत्या काही दिवसांमध्ये पाऊस आणि गारपीट होणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. आपल्याला गारपीटग्रस्त शेतकऱ्यांसाठी पैसे द्यायचे आहेत. मी या विधिमंडळामध्ये गेल्या 25 वर्षांपासून काम करीत आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस .....

सभापती महोदय, माझ्या आयुष्यात शेतकऱ्यांना हेक्टरी अडीच हजार रुपयाच्यावर मदत मिळाली असे मी तरी माझ्या आयुष्यात कधी पाहिले नाही. या अगोदर शेतकऱ्यांना नेहमी हेक्टरी दीड हजार, दोन हजार रुपयांच्यावर मदत दिली जात नव्हती. परंतु आमच्या शासनाने शेतकऱ्यांना साडेचार हजार रुपये हेक्टरी देण्याचे कबूल केलेले असल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करते. आम्ही नुकसानभरपाईची मागणी जुलै महिन्यात केली तरी ते पैसे डिसेंबर महिन्यापर्यंत शेतकऱ्यांना मिळत नव्हते. परंतु आम्ही नुकसानभरपाईची मागणी डिसेंबर महिन्यात केली असता शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसानभरपाईची रक्कम जमा केली व हे पहिलेच उदाहरण आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फडणवीस यांनी शेतकऱ्यांना अगोदर कमी मदत मिळत असल्याची माहिती दिलेली आहे. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, या पूर्वीही शासनाने शेतकऱ्यांना तुम्ही जेवढी मदत दिली आहे त्यापेक्षा जास्त प्रमाणात मदत दिली होती हे या सदनातील सदस्यांना माहितीच आहे. युती शासनाच्या वेळी शेतकऱ्यांना हेक्टरी अडीच हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता व त्या संदर्भात जीआर देखील काढण्यात आला होता परंतु ती मदत सुध्दा युती शासनाने शेतकऱ्यांना दिली नव्हती. आमच्या शासनाने प्रत्येक वेळेला हेक्टरी साडेचार हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम दिलेली आहे. अवकाळी पाऊस आणि गारपिटीच्या संदर्भात 10 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम लागेल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी आजच प्रेस कॉन्फरन्समध्ये सांगितले आहे. आजच्या परिस्थितीसारखी परिस्थिती यापूर्वी कधीही झाली नव्हती. सततचा अपुरा पाऊस, नापिकी,अवकाळी पाऊस, गारपीट पुन्हा अवकाळी पाऊस व अजून सुध्दा गारपीट सुरुच आहे. आताच्या क्षणाला 24 हजार गावे दुष्काळग्रस्त आहेत. अशी परिस्थिती आपल्या राज्यात या पूर्वी कधीही उद्‌भवली नव्हती त्यामुळे या वर्षी आपल्याला शेतकऱ्यांना अधिकचीच मदत करावीच लागणार आहे. यापूर्वीही या पेक्षा अधिकची मदत देण्यात आली होती एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, केवळ आमच्याच शासनाने पहिल्यांदा शेतकऱ्यांना हेक्टरी साडेचार हजार रुपयांची मदत केलेली आहे. मी जातिवंत आणि हाडाची शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्यांना किती पैसे मिळतात व शेतकऱ्यांना कशा प्रकारे न्याय दिला जात होता याची मला चांगली कल्पना आहे. सन्माननीय सदस्य श्री. ठाकरे साहेब जेव्हा विधानसभेत होते तेव्हा मी सुध्दा विधानसभेत होते. आपण दोघेही विदर्भातीलच आहोत. तुम्ही ज्यांच्यासाठी भांडत आहात त्यांच्यासाठीच मी देखील भांडत आहे. आपसामध्ये वाद घालण्यात काही अर्थ नाही असे मला वाटते. शासनाने पुन्हा शेतकऱ्यांना मदत देण्याचे मान्य केलेले आहे. माझे म्हणणे असे आहे की, शासनाने शेतकऱ्यांना मदत देण्याचे कबूल केले असतांना शेतकऱ्यांना तातडीने एक महिन्यात मदत उपलब्ध करून देण्यात आली तसेच 79 लाख शेतकऱ्यांच्या खात्यात शासनाची मदत जमा झाल्यामुळे शासनाचे खऱ्या अर्थाने अभिनंदन करावयास पाहिजे.

सभापती महोदय, याच सभागृहात आम्ही 8-8 हजार कोटी रुपयांच्या पूरक मागण्या पाहत आलो आहोत. एवढया मोठया पूरक मागण्यांमध्ये शेतकऱ्यांचा विचार झाल्याचे मी तरी पाहिले नाही. एवढया मोठया पूरक मागण्यांचे पैसे आपण इतर क्षेत्रासाठी वळविले होते. यावेळेस शेतकऱ्यांना 4 हजार कोटी रुपयांची मदत केली गेली यामध्ये कोणालाही वाईट वाटण्याचे कारण नाही. अगोदरच्या शासनाचे जे देणे बाकी होते ते देणं देण्यामध्येच हे 4 हजार कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाकरिता शासनाने मोठया प्रमाणात मदत करण्याची आवश्यकता आहे. मामा तलाव दुरुस्त करणे, छोटे छोटे बंधारे बांधणे, नाल्याला बांध घालून पाणी अडवून ते पाणी शेतकऱ्यांना देण्यासाठी हे शासन प्रयत्न करीत आहे. हे शासन शेतकऱ्याला मदत करीत असताना भविष्यात शेतकऱ्याला अशा परिस्थितीची जाणीव होऊ नये, शेतकरी स्वतःच्या पायावर उभा कसा राहील यासाठी शासन प्रयत्न करीत असल्यामुळे या पूरक मागण्यांना सभागृहाने एकमताने मान्यता द्यावी एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर (नामनियुक्त) :सभापती महोदय, पुरक मागण्यांवर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या बाब क्रमांक 39, पृष्ठ क्रमांक 65 वर मी सुरुवातीला विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, राज्यातील सरकारी हॉस्पिटलच्या संदर्भात सभागृहात सांगण्यात आले आहे की, जेवढया प्रमाणात सरकारी दवाखान्यांमध्ये मशीन्स आणि डॉक्टर्स पाहिजे तेवढया प्रमाणात ते उपलब्ध नाहीत. अनेक शहरांमध्ये स्वाइन फ्लूची साथ सुरु आहे. सोलापूर जिल्हयातील सरकारी हॉस्पिटलमध्ये मशीन्स आणि डॉक्टरांची 50 टक्के सुध्दा पूर्तता नाही, त्यामुळे यासंदर्भात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत महाकाय रोगाचा प्रादूर्भाव झाला तर मोठया प्रमाणात मनुष्यहानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यातील सर्व हॉस्पिटल्समध्ये मशिन्स आणि डॉक्टरांची सेवा योग्य प्रमाणात उपलब्ध करुन देण्यासाठी आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 57 वरील सामाजिक न्याय, विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्रमांक 36, च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या विभागामार्फत एनटी आणि इतर समाजाच्या संदर्भात आश्रमशाळा मोठया प्रमाणात चालवल्या जातात. 1990 पासून तसेच त्यानंतरच्याकाळातही काही आश्रमशाळा देण्यात आलेल्या आहेत. 20-20 वर्षापूर्वी ज्या आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या त्या पहिली ते सातवीपर्यंतच्या आहेत. काही आश्रमशाळांना वरच्या वर्गासाठी मान्यता देण्यात आली. परंतु जिल्हयातील बऱ्याच तालुक्यांमध्ये एकच आश्रमशाळा देण्यात आली असून आजतागायत त्या ठिकाणी पहिली ते सातवीचेच वर्ग आहेत. त्यामुळे या आश्रमशाळांना नैसर्गिक वाढीच्या न्यायाने न्याय देऊन त्याठिकाणी सातवीच्या पुढे वर्ग सुरु करावयास पाहिजे होते, तेथील शिक्षकांच्या संख्येमध्ये वाढ द्यावयास पाहिजे होती परंतु तसे झालेले नाही. सातवी पर्यंतच्या शाळा तालुक्यात असतील परंतु सातवीच्या पुढे तालुक्यात शाळा नसेल तर या ठिकाणच्या विद्यार्थ्यांनी पुढचे शिक्षण घ्यावयाचे नाही काय ? त्यामुळे शासनाने विचार करुन या आश्रमशाळांना नैसर्गिक वाढीने पुढचे वर्ग दिले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर.....

काही जिल्हयामध्ये तर 10-10 आश्रमशाळांना परवानग्या देण्यात आलेल्या आहेत तर काही तालुक्यांमध्ये सातवीच्या पुढे एकही वर्ग दिला जात नाही. त्यामुळे या धोरणात बदल करण्याची आवश्यकता आहे असे माझे मत आहे. त्यामुळे अशा वर्गांमध्ये बदल करुन नैसर्गिक वाढीने मान्यता द्यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सध्या मोठया प्रमाणात अवकाळी पाऊस, गारपीट होत आहे. या सभागृहात अवकाळी पाऊस आणि गारपिटीच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. असे असताना काल रात्री सोलापूरमध्ये मोठया प्रमाणात गारपीट झाली. गारपिटीच्या संदर्भात या सदनामध्ये आम्ही म्हणणे मांडले म्हणून आमच्या भागात गारपीट झाली की, काय असा प्रश्न आम्हाला पडू लागला आहे. परवा जेवढया आकाराच्य गारा पडल्या होत्या काल त्यापेक्षा मोठया आकाराच्या गारा आमच्या भागात पडल्या. गारपिटीमुळे आमच्या भागातील शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी आमच्या भागातील सर्व गावांची नुकसानीची आणेवारी ऑफिसमध्ये बसून काढली असून माझ्या भागातील सर्व गावांची आणेवारी 50 पैशापेक्षा जास्त दाखवली असल्यामुळे आमच्या भागातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळू शकणार नाही. मला तर असे वाटते की, पृथ्वीची निर्मिती झाल्यापासून आमच्या भागातील काही तालुके अवर्षण प्रवण आहेत की, काय असे वाटू लागले आहे. आमच्या सोलापूर जिल्हयातील 4 तालुके हे कायम दुष्काळी तालुके आहेत. कायम दुष्काळी तालुके असताना या तालुक्यांची आणेवारी 50 पैशापेक्षा जास्त कशी ? याबाबत आम्हाला कोडे पडले आहे. आपल्याकडे आतापर्यंत जी आणेवारी काढली जाते ती ब्रिटीश कालीन पध्दतीने काढली जाते. त्यामुळे आणेवारी ब्रिटीश कालीन पध्दतीने न काढता नव्या तंत्र शुध्द पध्दतीने काढण्याची आवश्यकता असून आणेवारी काढण्याच्या पध्दतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे अशी माझी मागणी आहे. खरी आणेवारी काढली जात नसल्यामुळे शासनापर्यंत खरी आणेवारी येत नाही व पर्यायाने ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असते त्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळत नाही. जिल्हाधिकारी वर्तमानपत्रातून आणेवारी जाहीर करुन आणेवारी जास्त असल्यामुळे शासनाची मदत देता येत नाही असे जाहीर करीत असतात परंतु महसूल विभाग प्रत्यक्षात पाहणी करीत नाही.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर.....

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 14, पष्ठ क्रमांक 17 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, संपूर्ण देशातील जनतेला आपण नोकऱ्या देऊ शकत नसल्यामुळे आपण उद्योग धंदे वाढवण्याकडे भर देत आहोत. उद्योगधंद्याला जास्तीत जास्त कुशल कामगार उपलब्ध होण्यासाठी केंद्र सरकार सुध्दा प्रयत्न करीत आहे व त्या प्रकारचे त्यांचे धोरणही आहे.

यानंतर श्री. भारवि.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर....

कुशल कामगार निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने नवीन विभाग सुरु केला आहे. परंतु महाराष्ट्रात याच्या नेमके उलट धोरण स्वीकारलेले आहे असे माझे मत आहे. शासनाने आयटीआय कॉलेजसाठी जाचक अटी घातलेल्या आहेत. या अटींमध्ये बदल करण्यात यावा असे विभागाला सांगितले, तर त्या अटी केंद्र सरकारच्या असल्यामुळे त्यामध्ये बदल करता येत नाही असे विभागाकडून सांगण्यात येते. आयटीआय कॉलेजसाठी इतक्या जाचक आणि किचकट अटी आहेत की जगात अशा प्रकारच्या अटी मी पाहिलेल्या नाहीत. आयआयटी कॉलेजमध्ये 50 लाख ते 1 कोटी रूपयांची गुंतवणूक करायची, त्यांना एक रूपयाही अनुदान द्यायचे नाही आणि कॉलेजमधून कुशल कामगार तयार करा असे सांगायचे, हे योग्य नाही. कुशल कामगार तयार करण्याचे शासनाचे धोरण आहे असे जाहीर करायचे आणि काम मात्र नेमके उलट करायचे. तेव्हा या अटींमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी निगेटीव्ह मार्कस सिस्टीम लागू केली आहे. म्हणजे पाच उत्तरे बरोबर लिहिली तर 50 मार्कस आणि त्याच्या पुढची पाच उत्तरे चुकीची लिहिली तर 50 मार्कस वजा करायचे म्हणजे त्यास शून्य मार्क. ही कोणती पद्धत आहे ? अशी पद्धत कोठेही नाही. याबाबत विचारणा केली असता माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री सांगतात की, "हा केंद्र सरकारचा नियम आहे." माझा प्रश्न आहे की, राज्यातील भावना केंद्र सरकारला कळविणे हे कोणाचे काम आहे ? आपण केंद्र सरकारला राज्यातील लोकांच्या भावना कळवून त्यामध्ये बदल घडवून आणला पाहिजे अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, शासनाने आयटीआय कॉलेजेसना थोडेफार अनुदान दिले पाहिजे. आयटीआय कॉलेजेस जाचक अटी आणि इन्स्पेक्शनमुळे हैराण झाले आहेत. आम्ही उगाच आयटीआय कॉलेज काढले असे त्यांना वाटू लागले आहे. राज्यातील सर्व खाजगी आयटीआय कॉलेज बंद करण्याचा त्यांनी सामूहिक निर्णय घेतला आहे. खाजगी आयटीआय कॉलेजेस बंद झाली तर शासनाकडे पर्यायी व्यवस्था आहे काय ? ज्या संस्था स्वंयस्फूर्तीने पुढे येऊन कॉलेजेस काढतात त्यांना आपण अनुदान देऊ नका, परंतु त्यांना त्रास होणार नाही याची तरी काळजी घ्यावी. त्या आपल्याच संस्था आहेत. आज आपणास कुशल कामगारांची गरज आहे. त्या प्रमाणात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रूपनवर....

वाढ करण्यासाठी आयटीआय कॉलेजेस मदत करीत आहेत. तेव्हा माझी विनंती आहे की, शासनाने या अटींबाबत जरूर विचार केला पाहिजे.

शालेय शिक्षण विभाग, पृष्ठ क्रमांक 17, बाब क्रमांक 14 - आजपर्यंत विद्यापीठातंर्गत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीची मर्यादा 15 हजार रूपये होती. ही 15 हजार रूपयांची शिष्यवृत्ती घोषित केल्याच्या घटनेला बरीच वर्षे झालेली आहेत. आज त्या 15 हजार रूपयांची किंमत दीड लाख रूपये झालेली आहे. तेव्हा त्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याची गरज आहे आणि ही नैसर्गिक वाढ आहे. आता 15 हजार रूपयांच्या आत कोणाचे उत्पन्न नाही. ज्या प्रमाणात महागाई वाढते त्या प्रमाणात ही वाढ झाली पाहिजे. या शिष्यवृत्तीची मर्यादा दीड लाख रूपयांपर्यंत वाढविण्याची आवश्यकता आहे अशी माझी विनंती आहे.

जलसंधारण विभाग- पृष्ठ क्रमांक 49, बाब क्रमांक 32 - शासकीय कारभार कसा चालतो ते आपल्या लक्षात आणून देतो. 20 वर्षापूर्वी कोट्यवधी रूपये खर्च करून देवधर धरण बांधण्यात आले. त्यामध्ये पाणी साठले. आपण अगोदर पाणी साठवू त्यानंतर कालवे काढू अशी त्यावेळची भूमिका होती. परंतु 20 वर्षानंतर देखील अजून त्या धरणाचे कालवे काढलेले नाहीत. देवधर धरणाचे पाणी दुसरेच वापरत आहेत. सन 1996-97 मध्ये हे धरण पूर्ण झाले त्यासाठी 27 हजार कोटी रूपये खर्च आला. कालवे काढण्यासाठी तरतूद नसल्यामुळे कालवे काढता येत नाहीत. त्यामुळे धरणातील पाण्याचा आम्हाला उपयोग करता येत नाही. आपण फक्त 8-10 किलोमीटरचा कॅनॉल काढला तर त्या भागातील शेतकऱ्यांना पाणी मिळेल. तेव्हा आपण कॅनॉलसाठी तरतूद करावी अशी माझी मागणी आहे.

उद्योग विभाग, पृष्ठ क्रमाक 45, बाब क्रमांक 30 - राज्यातील अनेक भागांतून एमआयडीसीसाठी मागणी होत आहे. आता शहरे वाढली तसेच बागायत क्षेत्र वाढल्यामुळे जमीन उपलब्ध नाही. जमीन नसल्यामुळे एमआयडीसी उभारता येत नाही अशी कारणे दिली जातात. माझ्या माळशिरस तालुक्यातून पुणे-पंढरपूर रोड जातो. त्या ठिकाणी दोन्ही रस्त्याच्या बाजूला तीन-चार साखर कारखाने आहेत. एक-दोन किलोमीटर आत गेल्यावर माळरान आहे. तालुक्याचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रूपनवर....

नावच माळ आहे. त्यामुळे आमच्याकडे खूप माळ आहे. आपण रस्त्यापासून तीन-चार किलोमीटर आत गेल्यावर आपणास सलग क्षेत्र उपलब्ध होणार नाही, पण एका बाजूला 500 एकर जमीन उपलब्ध होईल. त्याच्या समोरच्या बाजूला 500 एकर जमीन उपलब्ध होईल, आणखी पुढे गेल्यावर 500 एकर जमीन उपलब्ध होईल. मी उद्योग मंत्री महोदयांना प्रत्यक्ष भेटून त्यांना या सर्व गोष्टी सांगितलेल्या आहेत. ही वेगळया प्रकारची कन्सेप्ट आहे. एमआयडीसीसाठी सलग जागा न पाहता जशी जागा उपलब्ध होईल त्या ठिकाणी कारखाना उभा करायचा. मी जे ठिकाण सांगत आहे त्या ठिकाणी चार-पाच साखर कारखाने आहेत, दूध संघ आहे. तेथे एमआयडीसी झाली तर त्या उद्योगांना देखील सवलती मिळतील. आपण जमिनी ताब्यात घेण्यापेक्षा ज्यांच्या जमिनी आहेत त्यांना एमआयडीसीच्या सुविधा दिल्या आणि जेथे जमीन उपलब्ध होईल तेथे कारखाना उभा केला तर प्रदूषण कमी होईल, पर्यावरणावरील ताण कमी होईल आणि त्या तालुक्यामध्ये एमआयडीसी होईल. जमीन नाही म्हणून एमआयडीसी होत नाही या प्रश्नावर हा पर्याय होऊ शकतो. हा पर्याय महाराष्ट्रामध्ये पॅटर्न म्हणून चांगल्या प्रकारे वापरता येईल. त्या तालुक्याच्या मधून रेल्वे लाईन जात आहे आणि महामार्ग देखील आहे. अशा पद्धतीने विचार व्हावा असे आम्ही शासनाला सुचविले आहे. मंत्री महोदयांना तसे निवेदन देऊन त्यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांनी देखील सकारात्मक विचार दाखवून अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याचे मान्य केलेले आहे.

सभापती महोदय, आपण पंढरपूर यात्रेसाठी एक प्राधिकरण तयार केले आहे. त्या प्राधिकरणाचे बरेच प्रश्न आहेत. पंढरपूर प्राधिकरणाकडे मोठ्या प्रमाणात लक्ष देण्याची गरज आहे. त्यास निधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. प्राधिकरणाची पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे. प्राधिकारणामध्ये अधिकारी नाहीत. शासनाने प्राधिकरणाची घोषणा केली, त्यासाठी निधी दिला, पण त्याची रचना केली नाही तर त्यातून काही आऊटपूट निघणार नाही. प्राधिकरणामध्ये अधिकारी नसल्यामुळे जी कारवाई ताबडतोब व्हावयास पाहिजे ती झालेली नाही. तेव्हा पंढरपूर प्राधिकरणाची पूर्ण रचना करावी अशी विनंती करून माझे भाषण पूर्ण करतो.

---------- यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, बऱ्याच वर्षांपासून पुरवणी मागण्या आणि त्यांची संख्या बघितली की, आम्ही सभागृहात विषय मांडत होतो की, अर्थसंकल्प सादर करण्याचा कालावधी जवळ आलेला असताना कमीत कमी रकमेच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या तर चांगले होईल. पण या वेळी त्या दृष्टिकोनातून जाणीवूपर्वक तशा प्रकारचे नियोजन केल्यामुळे पुरवणी मागण्यांची संख्या कमी झाली आहे की अन्य कारणांमुळे कमी झाली आहे, यावर मांडणीच्या वेळी प्रकाश टाकला तर बरे होईल. महोदय, या पुरवणी मागण्यांपैकी बऱ्याच पुरवणी मागण्यांच्या बाबतीत योग्य पध्दतीने विनियोग होणे आवश्यक आहे.

महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक-1, पृष्ठ क्रमांक-3 च्या बाबतीत सांगू इच्छिते की, पोलिसांच्या गणवेशासाठी 23 कोटी 9 लाख 28 हजार रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. ही तरतूद योग्य आणि समर्थनीय आहे. पोलिसांना वेळेवर गणवेश मिळणे हे त्यांच्या प्रतिष्ठेच्या आणि स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून अजून जी काही पावले उचलण्याची गरज आहे ती जरूर उचलली पाहिजेत, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक-2 वर बोलत असताना सांगू इच्छिते की, कोल्हापूर आणि नांदेड या ठिकाणी प्रादेशिक न्याय सहायक प्रयोगशाळा यासाठी तरतूद करण्यात आली आहे. नागपूर येथील फॉरेन्सिक लॅबमधील अनेक चांगले उपक्रम करून, अन्य प्रयोगशाळा अजून कशाप्रकारे चांगल्या चालविता येतील या बाबतचा आराखडा राज्यस्तरीय अधिकारी, पोलीस महासंचालक यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. नागपूर येथून हा आराखडा येऊन सुध्दा वेगवेगळ्या नवीन प्रयोगशाळेमध्ये त्या उपक्रमांची अंमलबजावणी केली जात नाही. नवीन प्रयोगशाळांसाठी तरतूद करीत असताना नागपूर आणि अन्य ठिकाणच्या प्रयोगशाळांमध्ये जे जे चांगले प्रघात असतील त्यांची पुनरावृत्ती मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, असे मला सुचवावेसे वाटते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 3 च्या अनुषंगाने सांगताना खेद वाटतो. पूर्वी राज्य सरकारने या बाबतीत जेव्हा तरतूद केली तेव्हा त्यास अनेकांनी विरोध केला होता. धान्य वापरुन अल्कोहोल निर्मिती आणि त्यासाठी आसवनींना अर्थसहाय्य यासाठी भरघोस निधी देऊ केला आहे. डॉ.अभय बंग यांनी अनेकदा आपल्या भाषणात 'महाराष्ट्र' हे 'मद्यराष्ट्र' होते की काय यासाठी आवाज उठविला आहे, किंबहुना आपली भूमिका मांडली आहे. चंद्रपूर येथील महिलाच्या आंदोलनानंतर शासनाने एक भूमिका घेतली आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी धान्यापासून अल्कोहोल निर्मितीला प्रोत्साहन देऊ नये अशी भूमिका घेतली होती. परंतु पुन्हा मागील पानावरुन पुढे का सुरु आहे, हेच मला समजत नाही. धान्यापासून अल्कोहोल तयार करणारे सर्व प्रकल्प बंद करा असे मी म्हणणार नाही. परंतु नवीन प्रकल्पांसाठी तरतूद करण्याची वेळ का येते, हे बघितले पाहिजे. सरकारचा पैसा गोरगरिबांच्या विकास कामांसाठी वापरण्याऐवजी अल्कोहोल निर्मितीला चालना देण्यासाठी वापरला जात आहे. मला वाटते राज्य सरकारच्या माननीय मंत्र्यांनी या बाबतचा पुनर्विचार केला पाहिजे. या बाबतीत ताबडतोब पावले उचलली गेली नाही तरी पुढील काळात सरकारकडून देण्यात येणारे अर्थसहाय्य कमी कसे करता येईल यावर भर द्यावयास पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक-8 वरील महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक-7, च्या बाबतीत मला समाधान व्यक्त करावेसे वाटते. पीक नुकसानीच्या संदर्भात उचित स्वरुपाची भरघोस मदत जाहीर करण्यात आलेली आहे. गारपिटीच्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांकडून सातत्याने हाहाकार आणि अपेक्षा व्यक्त होत होती. काही वाहिन्या आणि वर्तमानपत्रांतून या संदर्भात दुर्दैवी आणि हृदयाला चरे पडतील अशा कहाण्या सादर करण्यात येत आहेत. एका वाहिनीवर राज्य सरकारबद्दल जे शब्द वापरण्यात आले ते ऐकल्यावर आम्हाला फार अस्वस्थ वाटते. त्या वाहिनीवर 'धृतराष्ट्र सरकार' असा शब्दप्रयोग वापरण्यात आला. अशा प्रकारची भयंकर टीका होत असताना आपण संवेदनशीलपणे सरकार चालवित आहोत असा सरकारचा दावा असतो. नुकसानीची भरपाई योग्य प्रकारे मिळण्यासाठी आणि ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांना मदत मिळावी, किंबहुना मदतीचे योग्य वाटप होण्यासाठी गाव पातळीवर शेतकऱ्यांचे स्व-मदत गट तयार करणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

गरजेचे आहे. सरकारकडून सांगितले जाते की, नुकसानीचे पैसे थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहेत. परंतु बँकांची मानसिकता बघितली तर पदरामध्ये खूप निराशा पडते, अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाचे राज्यमंत्री सन्माननीय श्री.संजय राठोड असून ते आमचे सहकारी आहेत. त्यांच्या अधिकाराच्या बाबतीत ते खूप जागरूक आहेत. माझी अपेक्षा अशी आहे की, शेतकऱ्यांच्या मदतीच्या बाबतीत सुध्दा त्यांनी अधिक जागरूक राहून शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत कशी मिळेल यासाठी प्रयत्न करावेत. मला वाटते हा विषय सन्माननीय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे यांच्याकडे येतो. शेवटी ते सुध्दा आमचेच सहकारी आहेत. असो. महोदय, शेतकऱ्यांना मदत करीत असताना त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले पाहिजे. शेतकऱ्यांना केवळ पैसे मिळणे पुरेसे नाही. पैशा बरोबरच आपल्या मदतीला जे लोक येऊ शकतात त्यांचे स्व-मदत गट केले पाहिजे. पुण्याच्या ॲग्रो इंडस्ट्री फाऊंडेशन, उरळी कांचन या संस्थेने शेतकऱ्यांच्या सहाय्यासाठी बरेच प्रयत्न केले आहेत. शेतकऱ्यांचे बचत गट तयार करून एकमेकांना कशी मदत करता येईल यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले आहेत. त्यामुळे या कामी त्या संस्थेची मदत घ्यावी, असे मला सुचवावेसे वाटते. माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांना सुध्दा आम्ही याबाबतची माहिती दिलेली आहे.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक-8 अंतर्गत नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना आणि जनावरांना मदत करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद समर्थनीय आहे, किंबहुना ती आवश्यक आहे. ही मदत योग्य पध्दतीने पोहोचली पाहिजे, अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्य व्यवसाय विभागाच्या बाब क्रमांक-12 वर मी बोलते. महोदय, पशुसंवर्धन विभाग हा विनोदाचा विभाग मानला जातो. मराठी नाटकात किंवा सिनेमामध्ये पशुचा डॉक्टर दाखविल्यास सर्वजण हसायला लागतात. बऱ्याच वेळा पशुचा डॉक्टर माणसावर उपचार करण्यासाठी आल्याचे दाखवितात. वास्तविक पाहता ज्या ठिकाणी पशुच्या डॉक्टरची गरज असते त्या ठिकाणी ते वेळेवर पोहोचले नाही तर शेतकऱ्यांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

किती अडचणीचे होते याची आपल्या सर्वांना चांगलीच जाणीव आहे. केंद्र सरकारकडून पशुसंवर्धन विभागांतर्गत मोठी बांधकामे करण्यासाठी निधी प्राप्त झाला आहे. त्या निधीचा योग्य पध्दतीने विनियोग करणे आवश्यक आहे. व्हेटर्नरी डॉक्टर्स असोसिएशन यांना ट्रेनिंग सेंटर आणि अन्य उपक्रम राबविण्यासाठी सरकारकडून पुणे येथे जमीन मिळाली आहे. त्या असोसिएशनचे निवेदन मी आपल्याकडे देते. या व्हेटर्नरी डॉक्टर्स असोसिएशनचा कशाप्रकारे फायदा करुन देता येईल त्याचा शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, पशुसंवर्धन विभागाच्या बाबतीत एक उल्लेख मला करावासा वाटतो. राज्य सरकारने नुकताच गोहत्या बंदीचा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय खरोखरच स्वागतार्ह आहे. ठिकठिकाणी गोशाळा तयार करण्यासाठी तसेच गोपालनासाठी अनुदान आणि त्यांची निगराणी कशी ठेवता येईल हे पाहिले पाहिजे. या बाबत सरकारने घोषणा केली आहे. परंतु त्याची अंमलबजावणी कशी करता येईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. या कामी त्या त्या संघटनांना आणि सर्व राजकीय पक्षांना सहभागी करुन घ्यावे. जेणेकरुन ज्यांना ज्यांना हे उपक्रम राबवायचे असतील त्यांचा यामध्ये सहभाग राहू शकेल.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक-57, बाब क्रमांक-36 वर मी बोलत आहे. वसतिगृह अधीक्षकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आल्यामुळे त्यांना दिनांक 1 जानेवारी, 1996 ते दिनांक 31 मार्च, 2015 या कालावधीतील थकबाकीची रक्कम 13 कोटी रुपये देण्यात येणार आहेत. मला प्रश्न पडतो की, सरकारने दिनांक 1 जानेवारी, 1996 मध्ये या वेतनश्रेणीत वाढ केली होती. त्या वादाच्या बाबतीत उच्च न्यायालयात संबंधित लोक आणि सरकार यांनी धाव घेतली. 1996 ते 2015 या जवळजवळ 19 वर्षांच्या कालावधीत सरकारचा किती पैसा, लोकांचे आयुष्य आणि थकबाकीची रक्कम याचे मूल्य कमी झाले आहे. पूर्वी 3 हजार रुपये थकबाकी मिळणार असेल तर आता त्याची किंमत आज 30 रुपये सुध्दा राहिली नाही अशी परिस्थिती आहे. सरकारचे अनेक दावे प्रलंबित आहेत. सरकार इतरांना सांगत असते की, लोक अदालत करा आणि त्यात खटल्यांची संख्या कमी करा. शासनाच्या विरुध्द जे दावे सुरु आहेत अशा दाव्यांप्रकरणी दोघांनाही एकत्रित करुन सेटलमेंट करण्याची एखादी मोहीम का हाती घेतली जात नाही ? जेणेकरुन, लोकांचा आणि सरकारचा वेळ वाचू शकेल. ..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या बाब क्रमांक-56, पृष्ठ क्रमांक-95 वर मी बोलते. यामध्ये अंगणवाडी केंद्रांसाठी 26 कोटी 75 लाख रुपयांचा निधी दिलेला आहे. ही चांगली गोष्ट आहे. गाव पातळीवर अंगणवाड्या चांगल्या आणि सुस्थितीत असावयास पाहिजेत. माननीय कै.गोपीनाथ मुंडे हे उप मुख्यमंत्री असताना त्यांनी लातूर आणि औरंगाबाद येथे भूकंपग्रस्त भागात आणि इतर भागात अंगणवाडी केंद्राचे महिला विकास केंद्र अशा प्रकारचे स्वरुप केले होते. अंगणवाडी केंद्रात महिला आणि माता यांच्यासाठी साक्षरता, वाचनालय, रेडीओवरील कार्यक्रम ऐकण्यासाठी प्रयत्न केले गेले होते. महिलांना माहिती देण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या योजना आपण करु शकतो काय याचाही सरकारने विचार केला पाहिजे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ....

शिवसेना पक्ष प्रमुख श्री. उद्धवजी ठाकरे यांनी इंद्रधनुष्य नावाची माहिती देणाऱ्या यंत्रणेच्या संदर्भात काही विचार केला आहे. सदर यंत्रणेचा उपयोग करून ती सरकारी अंगणवाडी केंद्रांतून महिलांना विविध योजनांची, आरोग्याची, कायद्याची माहिती देण्यासाठी वापरता येऊ शकेल का याबद्दल शासनाने जरूर विचार करावा, असे मला सांगावेसे वाटते. राज्यातील सर्व वाहिन्यांवरून कामकाजाचे प्रक्षेपण करणार असल्याच्या शासनाच्या निर्णयाचे मी स्वागत करते. परंतु, सह्याद्री वाहिनीचा प्रश्न बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित प्रश्न आहे, त्याबद्दल अजूनही स्पष्ट उत्तर मिळालेले नाही. सह्याद्री वाहिनी केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याशी संबधित आहे. पूर्वी त्या वाहिनीवरून बातम्यांच्या मधल्या वेळात विधानसभा व विधानपरिषद कामकाजाचे समालोचन केले जात असे. राज्यातील आमची ग्रामीण व शहरी भागातील जनता विधानसभा व विधानपरिषद यांमध्ये आज काय झाले ते सह्याद्री वाहिनीवर पाहत असे. विधानसभा व विधानपरिषद सभागृहांतील कामकाज ज्यांना रोज पाहता येत नाही ते लोक आतुरतेने बातम्या बघायचे.

सभापती महोदय, गेल्या 2 वर्षांपासून सह्याद्री वाहिनीला विधानमंडळाकडून बातम्या प्रक्षेपित करण्याच्या संदर्भात जो निधी पाहिजे होता तो मिळालेला नाही. आता दोघांच्या वादामध्ये शेवटी समालोचन संपले आहे. बातम्यांमध्ये फक्त हेडलाईन्स दाखविल्या जातात. गेल्या 2 वर्षांपासून सभागृहांतील कामकाजाचे समालोचन केले जात नाही. मी स्वत: माननीय केंद्रीय मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांच्याशी या संदर्भात बोलले आहे, त्यांना निवेदन दिले आहे. दूरदर्शनच्या अधिकाऱ्यांनी देखील या संदर्भात आम्ही लक्ष घालतो असे सांगितले आहे. मला या संदर्भात सह्याद्री वाहिनीकडून पत्र आले आहे की, राज्य सरकारचे विधानमंडळ निधी देत नसल्यामुळे आम्ही विधानसभा व विधानपरिषद यांचे समानलोचन दाखवू शकणार नाही. मला वाटते की, आपल्याला जनतेपर्यंत पोहचायचे आहे. आपण अशा वेळी वाहिन्यांवरून माहिती दाखविण्याच्या संदर्भात लक्ष दिले पाहिजे. विधानसभा व विघानपरिषद सभागृहांतील कामकाजाचे समालोचन अशाप्रकारे अधिकृत स्वरूपाची माहती सह्याद्री वाहिनीवरून पोहचते, रेडिओवरूनही पोहचते. आजही आपण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ....

पाहतो की, सह्याद्री वाहिनी व आकाशवाणी यांची व्याप्ती फार मोठी आहे. त्यामुळे माझी शासनाला, माननीय अर्थमंत्री यांना विनंती आहे. अर्थ विभागाने यामध्ये लक्ष घालून हे समालोचन सुरू होण्यासाठीची पावले उचलावीत. हा विधानमंडळाच्या संदर्भातील प्रश्न आहे. तत्कालीन माननीय सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांनी या संदर्भात लक्ष घालून पाठपुरावा केला होता. परंतु, त्यातून तोडगा निघाला नाही.

सभापती महोदय, आपण या प्रश्नाला लहान म्हटले तरी तो खूप मोठा प्रश्न आहे. आपण सर्वजण आमदार आहोत. एकेकाळी माननीय मंत्र्यांचे स्वीय सहायक म्हणून काम केलेल्या व्यक्ती सुध्दा आज आमदार आहेत. नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे आमदारांचे वेतन उशिरा झाले हे एकवेळ मी समजू शकते. सभापती महोदय, आमदारांच्या स्वीय सहायकांचे वेतन 3 महिन्यांपासून मिळालेले नाही. आम्हाला खूप लाजीरवाणे वाटत आहे. स्वीय सहायकांना वेतन मिळाले नसल्यामुळे त्यांच्याकडे अडचणी निर्माण झालेल्या आहेत. शासनाला या संदर्भात जाणीव असावी अशी माझी विनंती आहे. सामान्य परिस्थितीतून आलेले हे लोक आहेत. बाकी घोषणा करताना स्वीय सहायकांचे वेतन वेळेवर मिळाले पाहिजे याकडे लक्ष दिले पाहिजे. मी या संदर्भात खंत व्यक्त करते. विभागांच्या बाकीच्या सर्व मागण्या अतिशय महत्त्वाच्या आहेत. उद्याच्या मांडण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शासन राज्यातील जनतेला चांगल्या प्रकारचा दिलासा देईल अशी मी अपेक्षा व्यक्त करते. धन्यवाद ! जय भीम ! जय महाराष्ट्र !

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 3, बाब क्रमांक 1 वर बोलणार आहे. निवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना नोकरीत किती वर्षे ठेवायचे या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांना एक पत्र दिले आहे. मेरिटाईम बोर्ड येथे असलेले कॅ. जे.बी.रोयला हे नियमबाह्य रीतीने त्या ठिकाणी आज काम करीत आहेत. ते जवळपास 20 वर्षे एकाच जागेवर काम करीत आहेत. ते नेव्हीचे निवृत्त अधिकारी आहेत. आमच्या कोकणातील नेव्हीचे निवृत्त अधिकारी आले होते. मात्र त्यांना हजर करून घेतले नाही. एवढे त्या अधिकाऱ्यांचा प्रभाव आहे. जे अधिकारी येतील त्यांना बाहेर काढण्याचे काम ते करीत आहेत. ते त्यांच्याकडे सूत्रे ठेवतात. मी या संदर्भात बोलणार नव्हतो. मी 19 जानेवारीला स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो आणि या संदर्भात त्यांना पत्र दिले. कॅ. रोयला हे निवृत्त झाले आहेत. मात्र त्यांना पुन्हा 2 वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. वयाच्या 62 वर्षांनंतर 2 वर्षांसाठी पुन्हा मुदतवाढ देता येत नाही. परंतु, त्यांना खास बाब म्हणून मार्गदर्शक, सल्लागार म्हणून ठेवले आहे. तेथील सर्व फाईल्स त्यांच्याद्वारे हलतात. आज ते एमएमबीचा मालक झाल्यासारखे आहेत. सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे. आपण तेथे जाता. कायद्याने असे करता येत नाही. सभापती महोदय, कम्पाऊंडरला डॉक्टर केले आहे. समुद्रात चालणाऱ्या बोटी आणि त्या चालविणारे यांच्या संदर्भातील लायसन्स देण्याचा अधिकार असतो आणि त्यासाठी क्वॉलिफाईड मरिन टेक्निकल माणूस असला पाहिजे. परंतु, ते तसे नाहीत. त्या अधिकाऱ्यांचा प्रभाव एवढा आहे की आपल्याला असे म्हणावे लागेल की, एमबीबीएस डॉक्टरचे प्रमाणपत्र कम्पाऊंडर देत आहे. एमएमबीमध्ये अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, मेरिटाईम बोर्डचा विषय आहे. ही बंद खात्याची बाब नाही. परंतु, मी सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून या विषयावर बोलू शकतो. सामान्य प्रशासन विभागात या संदर्भातील फाईल येत असते म्हणून मी या विभागाच्या माध्यमातून बोलत आहे. कॅ. रोयला यांना नेव्हीचे अधिकारी म्हणून 2001 साली घेण्यात आले. कायद्याने पेन्शन त्यांच्या पगारातून वजा करायची असते. परंतु, तसे केले नाही. त्यामुळे त्या संदर्भात महालेखापालांनी आक्षेप घेतला आणि

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

आता 75 लाख रुपयांची वसुली काढली अहे. हे किती प्रभावशाली गृहस्थ आहेत ते पहा. माझी मागणी आहे की, सदर बाबत चौकशी झाली पाहिजे. आता प्रशासकीय अधिकारी म्हणून दिलेली मुदतवाढ सीईओंनी स्वतःच्या अधिकारात दिली आहे. माननीय मंत्री, सचिव यांची सही नाही. माझी मागणी आहे की, सर्वांची उच्च पातळीवर चौकशी झाली पाहिजे आणि संबंधितांचे ताबडतोब अधिकार काढले पाहिजेत. सल्लागाराला कायमस्वरूपी बसावे लागत नाही. सल्लागार म्हणजे एखाद्या फाईलच्या संदर्भात त्यांनी सल्ला द्यायचा. परंतु, प्रत्येक फाईलवर त्यांची सही होते, ते मालक झाले आहेत. उच्च पातळीवर या संदर्भातील चौकशी झाली पाहिजे, त्यांच्या पगाराची वसुली झाली पाहिजे आणि त्यांची सल्लागार म्हणून जी सेवा मिळत आहे ती ताबडतोब खंडित झाली पाहिजे. सभापती महोदय, त्यांचे नाव कॅ. जे.बी.रोयला आहे. (अडथळा) सदर बाबतीत माहिती घेण्याचा सभागृहाचा अधिकार आहे. सभागृह हे माझे अंतिम हत्यार आहे. मी सभागृहात लढत आहे. आपण बैठक घेतली, त्यावर माझा आक्षेप होता. आपण आमच्या चर्चेतील प्रश्नाच्या संदर्भात दालनात बैठक घेता. दालनातील चर्चेच्या वेळी बाकीच्यांना बोलवायचे नाही. मी बैठक थांबविलेली आहे. आम्ही प्रश्न राखून ठेवतो. आपण त्या विषयावर दालनात बैठकीसाठी बोलाविता आणि त्या बैठकीच्या वेळी सर्वांना बोलाविता. त्यामुळे आम्ही तेथे बोलू शकत नाही. आम्ही सुध्दा गुप्ततेची शपथ घेतली आहे. त्यामुळे मी बैठक थांबविली आहे. मी आपल्याकडे येऊन या संदर्भात सांगणार आहे.

सभापती महोदय, मी आता महसूल विभागाच्या पृष्ठ क्रमांक 3, बाब क्रमांक 3 वर बोलणार आहे. ब्रिटिश काळात गावठाणे झाली आहेत. 200 वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी गावठाणाचे नकाशे तयार केले आहेत. माझी मागणी आहे की, गावठाणाचा विस्तार झाला पाहिजे. नवीन गावठाण होणार की नाही ? शासनाकडून या संदर्भात नियोजन झाले पाहिजे.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

आज गरजेपोटी ग्रामीण भागातील रहिवासी घरे बांधतात. परंतु, ती घरे गावठाणातील नाहीत, गावठाण विस्तार झालेला नाही, या कारणास्तव या बांधकामांना बेकायदेशीर ठरविले जाते, त्यांच्याकडून दंडाची आकारणी केली जाते आणि नंतर ते नियमानुकूल करण्याचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून सध्या अस्तित्त्वात असलेल्या गावठाणाच्या हद्दीपासून 500 मीटरच्या आत असलेली सर्व बांधकामे अधिकृत करावीत आणि बांधकामे तोडण्याची कार्यवाही थांबवावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 9, पृष्ठ क्रमांक 9 च्या अनुषंगाने मला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, राज्य शासन जिल्हा नियोजन समित्यांना निधी देत असते. आता आपण 36 जिल्ह्यांना 2400 कोटी रुपयांचा निधी देत आहोत. हा निधी दिनांक 31 मार्च, 2015 पर्यंत खर्च केला पाहिजे. परंतु, मेख अशी आहे की, हा निधी प्रत्यक्षात खर्चच होत नाही. विविध निवडणुकांच्या आचारसंहिता असतात, नियोजन मंडळाची बैठक होत नाही, काही कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली नसते, संबंधित यंत्रणेचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळत नाही, विरोधी पक्षाची ग्रामपंचायत असेल तर ग्रामपंचायतीकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळत नाही, जिल्हा परिषदेला आमदार फंडाची अडचण येते, अशा अनेक अडथळ्यांमुळे हा निधी खर्च होत नाही व तो पुन्हा परत शासनाकडे पाठवावा लागतो. आजची परिस्थिती आपल्याला बघावयाची असेल तर मी आपल्याला आकडेवारी सादर करतो. महसूल विभाग निहाय सन 2015 मध्ये पुढील प्रमाणे निधी शिल्लक आहे. कोकण विभाग 473 कोटी रुपये, पश्चिम महाराष्ट्र 518 कोटी रुपये, नाशिक विभाग 392 कोटी रुपये, औरंगाबाद विभाग 450 कोटी रुपये, नागपूर 327 कोटी रुपये आणि अमरावती विभाग 331 कोटी रुपये, अशा प्रकारे निधी शिल्लक आहे. माझी अशी विनंती आहे की, जो निधी जिल्हा नियोजन समित्यांना दिलेला आहे, तो परत घेता कामा नये. तो निधी त्याच ठिकाणी ठेवला पाहिजे. जो निधी जिल्हाधिकारी किंवा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेला आहे, तो निधी परत घेण्याचे अधिकार शासनाला नाहीत. हा निधी विधिमंडळाने मंजूर केलेला असतो आणि तो नियोजन समित्यांसाठी मंजूर केलेला असतो. त्यामुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

तो जर शासनाला परत घ्यायचा असेल तर त्यासाठी देखील विधिमंडळाची मंजुरी घेणे गरजेचे आहे. उद्या आपण अर्थसंकल्प मांडणार आहात. 2400 कोटी रुपयांचा निधी जो जिल्ह्यांना दिलेला आहे, तो परत घ्यायचा असेल तर पुन्हा विधिमंडळाची मंजुरी घेण्याची आवश्यकता आहे. तशी ती शासनाने घेतली पाहिजे. याबाबत कायदेशीर तरतूद काय आहे, याचा खुलासा मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात करावा. जर कायद्याने अशा प्रकारे विधिमंडळाची मंजुरी घेण्याची आवश्यकता नसेल तर आम्ही आमचे शब्द मागे घेऊ. त्यासाठी मग आम्ही या विधिमंडळाच्या माध्यमातून कायद्यात दुरुस्ती करु शासन हे अंतिम नाही. विधिमंडळ हे अंतिम आहे आणि गरज लागली तर आम्ही तशा प्रकारचा कायदा या विधिमंडळात करु.

सभापती महोदय, जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन अधिकारी हे झारीतील शुक्राचार्य आहेत. ते मंत्र्यांना, आमदारांना देखील विचारीत नाहीत. वाटेल तसा निधी फिरवितात आणि मग त्यामध्ये भ्रष्टाचार होतो. राज्यमंत्री महोदयांना याबाबत खूप अभ्यास करावा लागेल. एक मोठी लॉबी या संदर्भात कार्यरत आहे. हे शासन आपण चालविले पाहिजे, अधिकाऱ्यांनी चालविता कामा नये. आपण निधीची तरतूद करतो आणि त्याची विल्हेवाट हे अधिकारी वाटेल तशी करतात, हे होता कामा नये. अर्थसंकल्पावरील चर्चेत देखील मी हा मुद्दा उपस्थित करणार आहे. याबाबत शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा. जेणेकरुन हा निधी त्याच ठिकाणी खर्च झाला पाहिजे. यामध्ये मोठा भ्रष्टाचार होतो. पालकमंत्री देखील हा पैसा वापरतात. परंतु, आताच तुम्हाला त्याबाबत सांगणे बरोबर होणार नाही. मंत्री महोदय स्वतःच्या अधिकारात निधीची फिरवाफिरव करतात. डीपीडीसीमध्ये ज्याचा आवाज मोठा, त्याला जास्त निधी मिळतो.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाची बाब क्रमांक 24, पृष्ठ क्रमांक 34 वर मी माझे विचार मांडणार आहे. काल जलसंपदा मंत्री महोदयांनी सुंदर उत्तर दिले. ज्या प्रकल्पांची कामे 50 टक्के, 70 टक्के पूर्ण झाली आहेत, ते प्रकल्प ताबडतोब पूर्ण करु असे त्यांनी सांगितले आहे. परंतु, राज्यात असेही काही प्रकल्प सुरु आहेत की, जे शेतीसाठी बांधलेले नाहीत. या प्रकल्पांच्या माध्यमातून नागरीकरणासाठी पाण्याची उपलब्धता करण्यात येणार आहे. उदाहरणच द्यावयाचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

झाले तर बाळगंगा प्रकल्पाचे देता येईल. या प्रकल्पाचे 90 टक्के काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पामधून मुंबईला पाणी हवे आहे. मुंबईसाठी काळू, शाहू, कोंडाणे हे प्रकल्प देखील तयार होत आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून मुंबईच्या पाण्याचा पुढील 50 वर्षाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. अशा प्रकारचे नियोजन आपण केले आहे. याला आमचा विरोध नाही. परंतु, तापी नदीचे पाणी गुजरातला नेण्याचा जो प्रयत्न सुरु आहे, त्याला आमचा विरोध आहे. हे पाणी मुंबईला आणण्याची गरज नाही, हे फसवेगिरीचे काम आहे. हे पाणी गुजरातला न्यायचे आहे. परंतु, मुंबईला पाणी हवे असताना आम्ही मुंबईच्या पाण्याला विरोध करीत आहोत, असे सांगितले जाते. तापी नदीचे पाणी त्याच ठिकाणी लिफ्ट करुन गोदावरीमध्ये सोडले पाहिजे आणि गोदावरीतून ते मराठवाड्यात नेले पाहिजे, असे आमचे म्हणणे आहे. पण, त्यावर चर्चा करण्यास कोणी तयार नाही.

सभापती महोदय, बाळगंगा प्रकल्पाचे काम 90 टक्के पूर्ण झाले असल्यामुळे पुढील काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. हे सिडकोचे धरण आहे. परंतु, या धरणाच्या बांधकामाच्या संदर्भात चौकशी सुरु करण्यात आली आहे. निश्चितपणे काही चुकीचे झाले असेल तर शासनाने चौकशी करावी. ही प्रकरणे आम्हीच बाहेर काढली होती. तो प्रश्न नाही. परंतु, आतापर्यंत जे काम झाले आहे ते लक्षात घेऊन उर्वरित काम पूर्ण करावे व त्या ठिकाणी पाणी साठविण्याचे काम तातडीने करावे, असे आमचे म्हणणे आहे. या प्रकल्पासाठी सिडकोने निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. काळू धरणाला एमएमआरडीएने निधी दिलेला आहे. या ठिकाणी होणारे नागरीकरण लक्षात घेऊन संबंधित स्थानिक प्राधिकरणे निधी देण्यास तयार आहेत. त्यामुळे या प्रकल्पांना शासनाने अग्रहक्क दिला पाहिजे आणि हे प्रकल्प लवकरात लवकर कसे पूर्ण होतील, याकडे लक्ष दिले पाहिजे. आपण चौकशा करीत बसलो तर 10 वर्षे निघून जातील आणि त्यामुळे या प्रकल्पांचे मोठे नुकसान होईल. केवळ 10 टक्के काम शिल्लक आहे. पण त्याचा खर्च 100 कोटी रुपयांच्या घरात जाईल. त्यामुळे हे प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत आणि त्या ठिकाणी पाणी अडवून ते कार्यान्वित झाले पाहिजेत, अशी आमची मागणी आहे. हे पाणी मुंबईला न्यायचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

असेल तरी आमची काही हरकत नाही. हेटवणेचे शिल्लक राहणारे पाणी आम्हाला शेतीसाठी हवे आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 4 च्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील अगल्याची वाडी आणि कमळपाडा या ठिकाणी 40 वर्ष लोक वाळीत आहेत, हा मुद्दा मी पुन्हा एकदा सदनात मांडणार आहे. गेल्या वेळी मी हा विषय उपस्थित केला होता. परंतु, गोंधळाच्या परिस्थितीमुळे मंत्री महोदयांना उत्तर देता आले नव्हते. परवा धीरज पिवळेकर या व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे. त्याने अटकपूर्व जामीन घेतला आहे. पण कोर्टाने त्याला गावात येण्यास बंदी केली आहे. त्याला रोज पोलीस स्टेशनमध्ये हजेरी द्यावी लागते. कमळपाडा आणि अगल्याची वाडी या ठिकाणी ज्या लोकांनी वाळीत टाकण्याचे काम केले आहे, त्यांच्या व्हिडिओ आणि ऑडिओ फिल्म्स आम्ही पोलीस स्टेशनला दिलेल्या आहेत. मंत्री महोदयांना आमची विनंती आहे की, या अधिवेशनाच्या पुढील आठवड्यात त्यांनी एक बैठक बोलवावी. विधानसभेतील संबंधित सन्माननीय सदस्यांना, आम्हाला, संबंधित पंचांना, ज्यांनी वाळीत टाकले आहे, त्या लोकांना सर्वांना बोलावून हा प्रश्न एकदा कायमचा मिटवावा.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, बाब क्रमांक 39, पान क्रमांक 65 वर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे सी.टी.स्कॅन मशीन बसविण्यात आली आहे. ज्या रुग्णालयात सी.टी.स्कॅन मशीन आहे, तेथे टेक्निशियन नाही. जेथे टेक्निशियन आहे, तेथे सी.टी.स्कॅन मशीन नाही. माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत यांच्याकडून मला वेगळी अपेक्षा आहे. यासाठी एक वेगळा कायदा करण्याची आवश्यकता आहे. ज्या रुग्णालयात सी.टी.स्कॅन मशीन आहे, तेथील टेक्निशियनला जोपर्यंत पर्यायी कर्मचारी उपलब्ध होत नाही तोपर्यंत त्या कर्मचाऱ्याची बदली करण्यात येऊ नये. माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत स्वतः या सभागृहात बोलत होते की, सावंतवाडी येथील रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन बंद आहे. ती मशीन का बंद ठेवली जाते ? स्थानिक लोकांना धंदा मिळाला पाहिजे म्हणून तेथील सी.टी.स्कॅन मशीन जाणूनबुजून बंद ठेवले जाते काय ? आता आपण त्या खात्याचे मंत्री महोदय आहात, सावंतवाडीचे लोकप्रतिनिधी देखील आहेत. सिव्हील हॉस्पिटलचे पेशंट खाजगी लोकांकडे पाठविण्याची प्रक्रिया सुरु आहे, हे दुष्ट चक्र आता थांबले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 21, पान क्रमांक 39, सहकार व पणन विभागांवर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, पेण अर्बन बँकेची चर्चा आपण अनेक वेळा केली आहे. माननीय मंत्री महोदयांनी देखील पेण अर्बन बँकेच्या ठेवीबाबत अनेक वेळा आमच्या सोबत चर्चा केली आहे. राज्य सरकार या बँकेतील ठेवीदारांना पैसे देणार आहे काय ? त्या बँकेला लायसन्स मिळणार आहे काय ? तेथील लोकांमध्ये असा संभ्रम निर्माण झाला आहे की, मंत्री महोदयांनी पेण अर्बन बॅकेला लायसन्स दिले आहे व सर्व ठेवीदारांचे पैसे शासन देणार आहे, अशी बातमी आम्ही वर्तमानपत्रात वाचली आहे, अशी वस्तुस्थिती आहे काय ? माझ्या माहितीप्रमाणे लायसन्स देण्याचा अधिकार आरबीआयचा आहे. या देशात फक्त गुजरात मधील एका बँकेला त्या बँकेचे मला नाव आठवत नाही. माननीय श्री.लालकृष्ण अडवाणी केंद्रीय मंत्री होते, तेव्हा त्यांनी खास बाब म्हणून स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा ही बँक पुनर्जीवित करुन त्या बँकेला 600 कोटी रुपयांची मदत दिली होती. पेण अर्बन बँकेला शासन 600 कोटी रुपये देणार आहे काय ? एक लाख रुपयांच्या आतील 90 टक्के ठेवीदार आहेत. 300 कोटी रुपयांचे डिपॉझिट द्यावयाचे आहे, त्यातील 90 टक्के ठेवीदार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

एक लाख रुपयांच्या आतील असल्यामुळे त्यांना विम्याचे पैसे मिळतील. याबाबत सरकार विनाकारण या लोकांचा खेळ करीत आहे. प्रत्यक्षात एक लाख रुपयांपर्यंत विमा मिळत असेल तर 280 कोटी रुपये तेथील ठेवीदारांना ताबडतोब देता येतील. बाकीचे पैसे इतर लोकांचे राहतील. तेथील मालमत्तेचे पैसे ठेवीदारांना दिले पाहिजेत. त्यातील एक मालमत्ता आयडीसी बँकेकडे गहाण आहे, त्या बँकेचा मी चेअरमन आहे. 100 कोटी पैकी मी 20 ते 30 कोटी रुपये देण्यास तयार आहे. ही बाब एवढी सोपी नाही. त्या मालमत्तेवर अतिक्रमण झाले आहे. ती मालमत्ता अनेक ठिकाणी मॉरगेज करण्यात आली आहे. पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना राज्य शासन खरोखर पैसा देणार आहे काय ? पैसा कायद्याने देता येणार नसेल तर त्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे हे मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे. जिल्हा बँकेच्या चार अकाऊंट पैकी एक अकाऊंट 23 कोटी रुपयांचे आहे. त्यात आमच्या जिल्हा बँकेची मालमत्ता आहे. आमच्या बँकेला नॉन बँकिंग व्यवहार करण्यास परवानगी दिली पाहिजे. शून्य एनपीए असणारी आमची बँक आहे. मंत्री महोदयांनी या संदर्भात बैठक घेऊन नॉन बँकिंग व्यवहार करण्याची परवानगी द्यावी अशी मी विनंती करतो. या बँकेची 99 टक्के रिकव्हरी आहे, पेण अर्बन बँकेचे प्रकरण मिटले पाहिजे, भोगावती बँकेचे प्रकरण आपण मिटविले आहे. ही तीन प्रकरणे आमच्या जिल्हा बँकेची होती. देशात एक क्रमांकाची असणारी बँक आमची जिल्हा बँक ठरु शकते. ही दोन तीन प्रकरणे मिटली पाहिजेत. कारण शून्य एनपीए असणारी आमची बँक आहे. आपल्या राज्याला भूषण वाटावे अशी आमची जिल्हा बँक आहे. त्या दृष्टीने मंत्री महोदयांनी निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 14, पान क्रमांक 17, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग याबाबत बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, माननीय मंत्री श्री.विनोद तावडे अत्यंत चांगल्या गतीने काम करीत आहेत. त्यांनी क्रीडा विभागाकडे जास्त लक्ष दिले पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे. कबड्डी, खो-खो या खेळांकडे देखील लक्ष देणे गरजेचे आहे. अहमदनगर येथील एक गरीब मुलगा वर्ल्डकप मध्ये खेळला आहे. या मुलाला एका वेळचे जेवण देखील मिळत नव्हते. अशा प्रकारच्या खेळांडूकडे लक्ष देऊन त्यांना शासनाने तयार केले पाहिजे. तालुक्याच्या ठिकाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

स्विमिंग पूल करण्यासाठी उद्याच्या बजेटमध्ये क्रीडा विभागासाठी निधीची तरतूद वाढवून घेण्यात यावी. आपला मंत्रिमंडळात दबाव आहे, आपले वजन आहे, त्याचा आपण फायदा करुन घ्यावा व क्रीडा विभागाबाबत एक वेगळे आणि चांगले काम आपण करावे, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, खेळाच्या दर्जावर देशाची उंची कळते. जागतिक पातळीवर संपूर्ण आलेख काढला जातो, त्यावेळी त्या देशात असलेल्या खेळाचे नैपुण्य, वैशिष्ट्य व किती खेळाडू तयार केले जातात यावर उंची ठरते. ऑलिम्पिक मध्ये चीन, रशिया, अमेरिका, जर्मनी हे देश पदक मिळविण्यात प्रथम असतात व आपल्या देशाला एक पदक मिळाले तर आपण मोठा गाजावाजा करतो. त्यासाठी खेळाडूंचे प्रबोधन केले पाहिजे. खेळांसाठी चांगले वातावरण निर्माण केले पाहिजे. निधीची तरतूद देखील केली पाहिजे. अशा पध्दतीचे काम मंत्री महोदयांनी करावे अशी विनंती करतो व मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2014-2015 च्या पुरवणी मागण्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, महत्वाच्या विषयाबाबत मला मंत्री महोदयांना काही सूचना करायच्या आहेत. पान क्रमांक 8, बाब क्रमांक 6, सामाजिक सुरक्षा व कल्याण यावर बोलत असताना मी असे सांगू इच्छिते की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना जी मदत करण्यात येते ती फार कमी आहे. शेतकऱ्याचे वृध्द आईवडील असतात, पत्नी असते, शेतीसाठी लागणाऱ्या सामुग्रीसाठी बी-बीयाणे खते आणि त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी तातडीची उपाययोजना करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नये म्हणून त्यांचे समुपदेशन करणे आवश्यक आहे. शेतकरी अत्यंत निराशेच्या मन:स्थितीत वावरतो, त्यावर कर्ज असते ते त्याला फेडायचे असते. अशा मन:स्थितीत तो अडकत असतो, त्यातून त्याला बाहेर काढणे आवश्यक आहे. त्यांचे समुपदेशन करण्यासाठी ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांच्या माध्यमातून उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्यांचे समुपदेशन होणे अत्यंत महत्वाचे आहे, असे मला वाटते.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.....

सभापती महोदय, महसूल व वन विभाग, पृष्ठ क्र.9, बाब क्र.9-वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे मृत झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते की, मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यांमध्ये आणि झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या लोकांवर बिबट्याने हल्ले केलेले आहेत आणि त्यामध्ये आता पर्यंत जवळपास 117 लोक मृत पावलेले आहेत. परंतु, अद्याप पर्यंत कोणत्याही मृतांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यांना ती नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पशुसंवर्धन विभाग, पृष्ठ क्र.13, बाब क्र.12-पशु वैद्यकीय दवाखान्यांचे बळकटीकरण करण्यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आपण गावागावांमध्ये बघतो की, वृद्ध जनावरे असतील तर त्या जनावरांसाठी जेवढी पशु वैद्यकीय दवाखाने असावयास पाहिजेत तेवढ्या प्रमाणात ती उपलब्ध नाहीत. म्हणून आपण यासाठी विशेष तरतूद करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, पृष्ठ क्र.14, बाब क्र.13-मासेमारीसाठी बंदरे व लहान जेट्टींचे बांधकाम करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते की, वरळी, वेसावे, मढ, उत्तन गोराई, केळवे अशा अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात मासेमारी होते. परंतु, मच्छीमारांना मासे सुकविण्यासाठी ओटे बांधण्याची परवानगी दिली जात नाही किंवा मच्छी सुकविण्याची देखील व्यवस्था केली जात नाही. म्हणून मच्छीमारांना कोल्ड स्टोअरेजची व्यवस्था उपलब्ध करुन देणे आणि त्यांना जाळे विणण्यासाठी जी सामग्री लागते त्यासाठी देखील तरतूद करणे आवश्यक आहे. यातून राज्य शासनाला खूप मोठ्या प्रमाणात महसूल मिळू शकतो. परंतु, मुंबई शहरातील कोळीवाड्यांकडे शासनाचे खूप मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत आहे. मला असे वाटते की, शासनाने मच्छीमारांना आवश्यक असणाऱ्या सुविधांसाठी तरतूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, पृष्ठ क्र.30, बाब क्र.23-शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे 100 खाटा असलेले महिला व बाल रुग्णालय बांधण्याकरिता लागणारा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.....

खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाप्रमाणे उर्वरित महाराष्ट्रात देखील महिलांसाठी रुग्णालय असणे खूप आवश्यक आहे. परवा कळवा येथे एका गरोदर महिलेला रात्री 2.00 ते 2.30 वाजता रुग्णालयातून बाहेर काढण्यात आले आणि फुटपाथवर त्या महिलेची डिलिव्हरी झाली. ग्रामीण भागात किंवा शहरी भागातील गरोदर महिलांना पूरक आहार मिळण्यासाठी सल्ला देणे किंवा त्यांच्या बाळांतपणासाठी तजवीज करणे यासाठी रुग्णालयांची खूप कमतरता आहे. ज्या प्रमाणे आपण चंद्रपूर येथे 100 खाटांच्या रुग्णालयाचे बांधकाम करीत आहेत त्या प्रमाणे राज्यातील इतर भागात देखील अशी रुग्णालये व्हावीत, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, यानंतर अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, पृष्ठ क्र.52, बाब क्र.23 वर मी बोलणार आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत सुमारे 1.77 कोटी बीपीएल कार्ड धारकांचा समावेश झालेला नाही. जी रेशनिंग व्यवस्था आहे ती लोकांना अजूनही मिळत नाही, ही खेदाची गोष्ट आहे. शासनाने त्यासाठी आवश्यक असणारी सर्व तरतूद तातडीने करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पृष्ठ क्र.57, बाब क्र.36- स्वयंसेवी संस्थांना आश्रमशाळा व मूलोद्योगोत्तर आश्रमशाळा चालविण्यासाठी सहायक अनुदाने देण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, बाब क्र.37 अन्वये ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाड्यामध्ये सवलत देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मी सांगू इच्छिते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग या सर्व विभागांकडे शासनाचे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष होत आहे. आदिवासींसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद केलेली असते. परंतु अजूनही मुंबईतील आरे कॉलनीतील आदिवासी पाडे किंवा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यांमध्ये वीज, शौचालय, पाण्याची सुविधा नाही. शासनाने यासाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.....

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्यांवर मी बोलणार आहे. आज आपण केंद्रापासून राज्यापर्यंत मोठ्या प्रमाणावर शौचालये बांधण्याचे फक्त मनसूबे व्यक्त केलेले आहेत. परंतु यासाठी जो पर्यंत प्रत्यक्ष तरतूद होत नाही तो पर्यंत ते शक्य नाही. आपण महामार्गावर मुतारी आणि शौचालय बांधावयाचे ठरविले तर त्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, यानंतर उच्च व तंत्र शिक्षण विभाग, बाब क्र.49 व 51 वर मी बोलणार आहे. मुंबई शहरातील जे.जे.स्कूल ऑफ आर्ट हे आशिया खंडात अत्यंत प्रसिद्ध आहे. परंतु, जे.जे.स्कूल ऑफ आर्टची मोठ्या प्रमाणावर दुर्दशा झालेली आहे. जे.जे.स्कूल ऑफ आर्टसाठी कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. तेथील शिक्षकांचे पगार देखील वेळेवर होत नाहीत. माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे साहेब सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छिते की, त्या कॉलेजमध्ये शिल्पकला, टेक्सटाईल, सिरॅमिक ॲण्ड पॉटरीज इत्यादी अभ्यासक्रम आहेत. मी स्वत: त्या कॉलेजची विद्यार्थीनी आहे. आज त्या कॉलेजची अवस्था अत्यंत दयनीय आहे. एकेकाळी हे कॉलेज आशिया खंडातील सर्वात चांगले कॉलेज होते. परंतु आज निधी अभावी त्या कॉलेजची खूप दुर्दशा झालेली आहे. आपण या कॉलेजसाठी स्पेशल तरतूद करून या कॉलेजचा दर्जा पूर्वी प्रमाणे होण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. आपल्याला त्यासाठी काही तरी समुपदेशन करणे आवश्यक आहे. कारण, मुलींची छेडछाड होते, विनयभंग होतात. माननीय महिला व बाल विकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे सभागृहात उपस्थित आहेत. हा अत्यंत गंभीर विषय आहे. मुलींवर अत्याचार होतात, त्या संदर्भात आपण कायदे केलेले आहेत. अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, या दृष्टीने दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. लहान मुलींवर अत्याचार होतात आणि ही विकृती समाजात मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. ती विकृती कोठे तरी कमी करावयाची असेल तर मुला-मुलींचे शाळा, कॉलेजपासून समुपदेशन केले पाहिजे की, प्रत्येक स्त्री आपली आई आहे, बहीण आहे. तिच्याकडे आदराने बघितले पाहिजे, तिचा सन्मान केला पाहिजे आणि हे सर्व करण्यासाठी शाळा, कॉलेजेसपासून शिक्षण दिले पाहिजे. आज मुले घरी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.....

गेल्यानंतर त्या मुलांचे आई-वडील नोकरीसाठी घराबाहेर गेलेले असतात. मुले घरात टी.व्ही. बघतात. टी.व्ही.मुळे मुलांच्या बाल मनावर अत्यंत घाणेरडे परिणाम होतात. परंतु, हा परिणाम कोठे तरी रोखावयाचा असेल तर आपण त्यांना दुसरे काही तरी समुपदेशनपर शिक्षण देण्यासाठी तरतूद केली पाहिजे. महिला व बाल कल्याण विभागाची ही जबाबदारी आहे. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षण मिळालेले आहे. मग ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषद सदस्य असो किंवा नगरसेविका असोत. या सर्वांनी ठरविले पाहिजे की, आपल्या वॉर्डात, विभागात मुलींचा, स्त्रियांचा सन्मान कसा होईल, त्यांना आदरयुक्त वागणूक कशी मिळेल, त्यासाठी पथनाट्य, पोस्टर कॅम्पेन घेण्याची आवश्यकता आहे. शासनाने अशा प्रकारचे कॅम्पेन करण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. मला असे वाटते की, आपल्याला या सर्व गोष्टी रोखावयाच्या असतील तर शासनाने यासाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपविते.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मी दोन-तीन महत्वाच्या मुद्यांच्या संदर्भातच माझे मनोगत व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पृष्ठ क्र.17, बाब क्र.14-आदर्श शिक्षक पुरस्कारांचा खर्च भागविण्याकरिता अतिरिक्त तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आदर्श शिक्षकांना प्रत्येक वर्षी राज्य शासनाकडून राज्य पुरस्कार आणि केंद्र शासनाकडून राष्ट्रीय पुरस्कार दिला जातो. आता पर्यंत संबंधित पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन आगाऊ वेतनवाढ दिली जात होती. परंतु, सहावा वेतन आयोग लागू झाल्यापासून शासनाने या दोन आगाऊ वेतनवाढी देणे बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अद्यापही त्या संदर्भातील निर्णय झालेला नाही. दरम्यान दिनांक 4 सप्टेंबर, 2014 रोजी शासनाने राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षकांना अशा प्रकारे दोन वेतनवाढ देण्याऐवजी ठोक 1 लाख रुपये देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आणि त्यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. शासनाने राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांची दखल घेतली आणि जाहीर केलेली रक्कम देण्यासाठी पुरवणी मागणीच्या माध्यमातून यासाठी तरतूद केली, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सन 2009 पासून तर सन 2012-13 पर्यंत राज्यातील जे राज्य पुरस्कार आणि राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक आहेत ते आजही त्या पुरस्काराच्या रकमेपासून किंवा अन्य लाभापासून वंचित आहेत. सन 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू झाला आणि सन 2009 मध्ये प्रत्यक्ष शासन निर्णय निर्गमित होऊन त्याची अंमलबजावणी सुरु झाली.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते....

2009 ते 2012-13 पर्यंत ज्या शिक्षकांना राज्य पुरस्कार मिळाला त्यांना वेतनवाढ दिलेली नाही. अन्य कोणतेही लाभ दिलेले नाहीत. शासनाने 1 लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. तो निर्णय 2013-14 पासून लागू केला आहे. दिनांक 4 सप्टेंबर, 2014 च्या शासन निर्णयामध्ये एक वाक्य असे अंतर्भूत केले आहे की, "हा आदेश या आदेशाच्या दिनांकापासून लागू राहील." पूर्वीच्या शिक्षकांना लाभ मिळाला. 2013-14 च्या शिक्षकांना लाभ मिळणार आहे. परंतु 2009 ते 2014 या काळात ज्यांना राज्य व राष्ट्रीय पुरस्कार मिळाला, त्यांनी कोणाला लाच देऊन पुरस्कार मिळविलेला नाही, त्यांच्या कर्तृत्वाच्या आणि गुणवत्तेच्या आधारे शासनाने त्यांना पुरस्कार दिला. त्याची दखल घेऊन जे द्यायचे असेल ते शासनाने द्यावे. 1 लाख रुपये ठोक रक्कम द्यायची असेल तर ती द्यावी. दोन वेतनवाढी द्यायच्या असतील तर त्या द्याव्यात. त्यापूर्वीच्या काळातील शिक्षकांना तो लाभ मिळाला, नंतरच्या काळातील शिक्षकांना लाभ मिळाला आणि यापुढे मिळत राहील. परंतु मधल्या 3-4 वर्षाच्या काळात जे शिक्षक राज्य पुरस्कार प्राप्त आहेत ते वंचित राहिले आहेत. त्यापैकी अनेकजण आज सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना लाभापासून वंचित ठेवणे योग्य नाही. ते गुणवंत शिक्षक आहेत. शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. माननीय मंत्री महोदय त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये नक्की खुलासा करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, या राज्यामध्ये शाळा तेथे ग्रंथालय आणि ग्रंथालय तेथे ग्रंथपाल ही शासनाची भूमिका आहे. शाळांचे मूल्यांकन करताना त्या शाळांमध्ये ग्रंथालय नसेल, ग्रंथपाल नसेल त्या शाळा अनुदानास प्राप्त धरल्या जात नाहीत. एका बाजूला ग्रंथपालाचे पद अनिवार्य करायचे आणि दुसऱ्या बाजूला त्या ग्रंथपालाला योग्य ती वेतनश्रेणी द्यायची नाही हे काही बरोबर नाही. राज्यामध्ये अनेक शाळांमध्ये पदवीधर ग्रंथपाल कार्यरत आहेत. जे डी.लिब. पदविकाधारक आहेत. त्यांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे रु.1400-2600 ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने दुर्लक्ष केले. शासनाने चुकीचा अर्थ लावल्यामुळे अनेक प्रकरणे न्यायालयात दाखल झाली. न्यायालयाने स्पष्ट निर्णय दिला की, या ग्रंथपालांना त्यांच्या पात्रतेनुसार वेतनश्रेणी दिली पाहिजे. एक दोन नव्हे तर अनेक प्रकरणामध्ये हा निर्णय झाला. काही प्रकरणाबाबत जीआर निघाला. त्यांना थकबाकी मिळाली. दुसऱ्या बाजूला मात्र शासनाने हा प्रतिष्ठेचा प्रश्न करून मुंबई

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते....

उच्च न्यायालयाच्या निकालाला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. सुप्रीम कोर्टाने शासनाची याचिका फेटाळली. त्यानंतर शासनाने पुन्हा सुप्रीम कोर्टात रिव्ह्यू पिटिशन दाखल केले. ते सुध्दा फेटाळण्यात आले. शासनाचा एवढा अट्टाहास का? मुंबई उच्च न्यायालयाने शासनाचे म्हणणे फेटाळले, सर्वोच्च न्यायालयाने म्हणणे फेटाळले, शासनाचे रिव्ह्यू पिटिशन फेटाळले, आता शासन काय करणार आहे? आता अट्टाहासाचा प्रश्न न करता, प्रतिष्ठेचा विषय न करता न्यायालयाने जो निर्णय दिला त्या निर्णयाचा आदर करुन ग्रंथपालांचा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मला अपेक्षा होती की, शासन या राज्यातील अनेक शाळांना आणि शाळामधील तुकड्यांना मूल्यांकनानुसार अनुदानास पात्र ठरविणार आहे. मागील एक दीड वर्षाच्या काळात अनेक जीआर निघाले. संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून मूल्यांकन झाले, त्यानंतर शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाले. राज्य शासनाने चाळणी लावली. जिल्हा, विभागीय आणि राज्य स्तरावरुन छाननी झाल्यानंतर हे प्रस्ताव मंत्रालय स्तरावर पाठविण्यात आले. चाळणी लावून येणाऱ्या प्रस्तावांना मान्यता मिळते. अनुदानास पात्र म्हणून घोषित केल्यानंतर मागील 8 ते 12 वर्षे उपाशीपोटी काम केलेल्या कर्मचाऱ्यांना अनुदान मिळण्यासाठी, वेतन देण्यासाठी दिलासा देण्याचे काम शासनाने केले. त्यांना अनुदानास पात्र ठरविले. अपेक्षा ही होती की, डिसेंबर, 2014 च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणी सादर होईल. परंतु पुरवणी मागणी सादर करण्यात आली नाही. किमान या अधिवेशनात पुरवणी मागणी सादर होऊन शाळा व तुकड्यांसाठी अनुदानाची तरतूद होईल अशी अपेक्षा होती. परंतु पुरवणी मागण्यांमध्ये यासाठी तरतूद झालेली नाही. या पुरवणी मागण्यांमध्ये फक्त एकच मागणी सादर झाली आहे ती म्हणजे, ज्या शाळा राज्य शासनाने अनुदानास पात्र म्हणून घोषित केलेल्या आहेत त्यांच्या संदर्भातील मागणी सादर केली आहे. मी या संदर्भात अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. मंत्री महोदयांशी बोललो होतो. शिक्षण सचिवांबरोबर बैठकीमध्ये चर्चा झाली. केवळ तांत्रिक बाबीमुळे वित्त विभागाच्या चुकीच्या धोरणामुळे किंवा त्यांच्या इंटरप्रिटेशनमुळे हा प्रस्ताव प्रलंबित राहिला. जर शासनाने याची दखल घेऊन तरतूद केली नाही तर या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदान मिळू शकणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, 2008-09, 2009-10, 2010-11 या तीन वर्षाची 926 पदे शासनाने मंजूर केली. या संदर्भात वित्त विभागाशी झालेल्या पत्रव्यवहारामध्ये काही त्रुटी राहिल्यामुळे 926

...3....

श्री.रामनाथ मोते....

शिक्षक गेली 5 वर्षे विनावेतन काम करीत आहेत. 2008-09 ची मान्यता असताना मे, 2014 ला, 2009-10 ची मान्यता असताना मे, 2014 ला आणि 2010-11 ची मान्यता असताना मे, 2014 ला 926 पदांना शासनाने मान्यता दिली. आता वेतन देण्याची जबाबदारी शासनाची आहे. त्यांच्या वेतनासाठी कोणतीही तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये दिसून येत नाही. या 926 शिक्षकांना वेतन देण्याच्या संदर्भात तांत्रिक अडचण दूर करावी आणि त्यांना वेळेवर वेतन दिले जावे. एका बाजूला राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. या शिक्षकांना जर 5-5 वर्षे वेतन मिळाले नाही, त्यांना वेतन देऊ शकलो नाही तर त्यांची मानसिकता आपण विचारात घेण्याची आवश्यकता आहे. या 926 शिक्षकांना तांत्रिक बाबी दूर करून वेतन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दिनांक 21.10.2013, 25.10.2013, 30.11.2013, 1.3.2014 व 30.6.2014 रोजी जे शासन निर्णय निर्गमित झाले त्या अनुषंगाने शासनाने अनेक प्राथमिक शाळांना व तुकड्यांना अनुदानास पात्र म्हणून घोषित केले. त्यासाठी 44 ते 45 कोटी रुपयांची तरतूद होणे आवश्यक होते. त्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केलेली दिसत नाही. यासाठी बजेटमध्ये निधी आहे. फक्त लाक्षणिक पुरवणी मागणी विधिमंडळाच्या नजरेस आणून द्यायचे काम पूर्ण झाले नाही म्हणून हे सगळे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वेतनापासून वंचित राहणार आहेत. ही तांत्रिक बाब दूर होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, दिनांक 7.2.2014, 1.3.2014, 27.6.2014 व 30.6.2014 रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने अनेक माध्यमिक शाळा आणि शाळामधील तुकड्यांना अनुदानास पात्र म्हणून घोषित केले गेले. परंतु त्या शाळांमधील शिक्षकांच्या वेतनासाठी तरतूद झालेली नाही. मी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना एक महिना अगोदर म्हणजे बजेट तयार करण्यापूर्वी, पुरवणी मागणीचा प्रस्ताव तयार होण्यापूर्वी अधिकाऱ्यांना पत्र देऊन विनंती केली होती. प्रस्ताव पुरवणी मागण्यांमध्ये आला नाही असे त्यांच्याकडून उत्तर दिले जाईल याची कल्पना असल्यामुळे तीन महिने अगोदर जी चूक केली होती ती पुन्हा होऊ नये म्हणून मी लेखी पत्र दिले होते व पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

व्हावी अशी विनंती केली होती. माझ्याकडे त्याची पोच आहे. तरी देखील तरतूद होऊ शकली नाही.

...4...

17-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) Y.4

SGB/ 16:40

श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदय, ज्या माध्यमिक शाळा किंवा तुकड्या अनुदानास पात्र ठरल्या आहेत, त्या सर्व तुकड्यांना अनुदान मिळण्यासाठी शासनाने आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे. दिनांक 9.2.2014 रोजी 162 शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर पदांना शासनाने मान्यता दिली. त्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद झालेली नाही. 2001 आणि त्यापूर्वीच्या मान्यतेप्रमाणे विनाअनुदानित उच्च प्राथमिक शाळांसाठी रु.81 लाखाची तरतूद होणे आवश्यक होते. हा खर्च शासनाला देणे शक्य आहे. यासाठी वाढीव बोजा शासनावर पडणार नाही. आता जे अनुदान मंजूर आहे त्यातून सुध्दा हे वेतन देणे शक्य आहे. त्याचप्रमाणे ज्या शाळांना आणि तुकड्यांना शासनाने अनुदानास पात्र म्हणून घोषित केले त्यांच्यासाठी तरतूद केलेली नाही.

नंतर झेड.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिशन बाजोरिया)

श्री.रामनाथ मोते...

माझी या निमित्ताने माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, जी तांत्रिक बाब आहे ती त्यांनी दूर करावी. आपल्याकडे निधी उपलब्ध आहे. पण ती बाब पुरवणी मागण्यांमध्ये येऊ शकली नाही. काही तांत्रिक कारणांमुळे सदर खर्च हा विधिमंडळाच्या निदर्शनास आणता आला नसेल तर ती तांत्रिकता आपण दूर करावी. यासंबंधी आपल्या सचिवांना ऑथोराईजड् करावे व हा निधी खर्च करण्यासाठी आपण विधिमंडळाची परवानगी घ्यावी. आपण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडू नये. या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आपण आशा दाखविली आहे. त्यांना आपण अनुदानास पात्र ठरविले आहे. त्यांना आपण वेतन अनुदानापासून वंचित ठेवू नये अशा प्रकारची विनंती करतो आणि यासंबंधी शासन कोणता ठोस निर्णय घेणार आहे, शासन शिक्षण सचिवांना ऑथोराईजड् करणार आहे काय व आपल्याकडे असलेला निधी सर्व तांत्रिक बाबी दूर करून या कर्मचाऱ्यांवर खर्च करणार आहे काय या माझ्या प्रश्नांना मंत्री महोदय उत्तरे देतील अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी आपण मला संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, मी पान क्र.103 वरील मराठी भाषा विभागाच्या बाब क्र.58 वर बोलणार आहे. या विषयाला आमच्या सर्व मित्रांनी स्पर्श करायला पाहिजे होता. परंतु, त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी काल-परवा देखील सभागृहामध्ये मोठी चर्चा झाली. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करीत असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेतली आहे. नवलेखक योजनेअंतर्गत पुस्तक प्रकाशनासाठी व हस्तलिखितांवरील अभिप्रायाबद्दल तज्ज्ञांच्या मानधनासाठी सहायक अनुदान, नवोदित लेखकांसाठी कार्यशाळा व चर्चासत्रे आयोजित करण्यासाठी सहायक अनुदान, नियतकालिकांच्या प्रकाशनासाठी सहायक अनुदान, ललितेतर वाङ्मयातील पुस्तकाच्या प्रकाशनार्थ सहायक अनुदान, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास सहायक अनुदान देण्याची तरतूद बाब क्र.57 मध्ये करण्यात आली आहे, त्याबद्दल मी शासनाचे समर्थन करीत आहे.

सभापती महोदय, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून सर्वांनी येथे मुद्दे मांडले आहेत. यासाठी सरकार देखील आग्रही आहे. सरकारतर्फे प्रयत्नांची पराकाष्ठा केली जात आहे. केंद्र सरकार त्यास मंजुरी देईल अशा प्रकारचा विश्वास आपल्याला आहे.

संस्कृत भाषेच्या सोबतच पाली ही भाषा आहे. पाली भाषा शिकण्याची योग्य ती सोय या राज्यामध्ये व्हावी. पाली भाषेचे देखील पुनरूज्जीवन व्हावे व या भाषेला देखील संस्कृत भाषेप्रमाणेच मान्यता मिळाली पाहिजे. पूर्वी पाली भाषेला संस्कृत भाषे सारखी मान्यता होतीच. पण मध्यंतरीच्या काळामध्ये या भाषेकडे थोडेसे दुर्लक्ष झाले. एमपीएससी व युपीएससी या स्पर्धा परीक्षांमध्ये पाली भाषेचा विषय असायचा. पण काय झाले तेच कळले नाही. हा विषय दोन्ही स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमातून वगळण्यात आला. माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंबंधी आश्वस्त केले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

औरंगाबादच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा व्यतिरिक्त राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये पाली भाषेचे अध्ययन व अध्यापन केले पाहिजे, संशोधन झाले पाहिजे. आमची पुरातन व प्राचीन संस्कृती, सभ्यता या भाषेच्या माध्यमातून राज्यातील, देशातील जनतेला आणि जगाला समजली पाहिजे अशा प्रकारची सूचना मी या निमित्ताने करीत आहे.

यानंतर मी महिला व बालविकास विभागाच्या पान क्र.95 वरील बाब क्र.56 वर बोलणार आहे. या विभागाच्या माननीय मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे उपस्थित आहेत. आज पोषण आहार योजनेमध्ये अनंत अडचणी आणि अडथळे आहेत. या अडचणी व अडथळे प्रशासनातर्फे निर्माण केल्या जात आहेत. त्यासंबंधातील पत्र देखील मी मंत्री महोदयांना दिलेले आहे. टीएचआर योजना राज्यामध्ये लागू झालेली आहे. ही योजना महिला बचत गटांमार्फत राबविण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय शासनाने व न्यायालयाने देखील घेतला आहे. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू करण्यात आलेली आहे. फक्त नागपूर शहर आणि नागपूर जिल्हा याला अपवाद आहे. यासंबंधातील जाहिरात निघाल्यामुळे महिला बचत गटांनी अर्ज केले. जे पात्र ठरले त्यांना बोलाविण्यात आले व त्यांची निवड करण्यात आली. टीएचआरसाठी ज्या बाबींची आवश्यकता होती त्याची पूर्तता करण्यात आली. यासाठी लोकांनी 40 ते 50 लाख रूपयांची गुंतवणूक केली. नागपूर शहर व नागपूर जिल्ह्यामधील जे पात्र महिला बचत गट आहेत, ज्या पात्र महिला बचत गटांनी शासनाच्या अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार 40 ते 50 लाख रूपयांची गुंतवणूक केली आहे त्यांना अद्याप पर्यंत मान्यता मिळालेली नाही. नागपूर जिल्हा परिषदेतील महिला व बाल विकास विभागाचा उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नागपूर जिल्हाधिकाऱ्यांना अंधारामध्ये ठेवून हा प्रकल्प डबघाईस आणलेला आहे. त्यामुळे यामध्ये माननीय मंत्र्यांनी स्वत: लक्ष घालावे व अन्याय दूर करावा अशी माझी विनंती आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, अंगणवाडीसेविका आणि शिक्षकांचा मुंबईत प्रचंड मोर्चा आला आहे. ग्रामीण भागामध्ये झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या उपक्षित व वंचित समाजाच्या मुलांना सुशिक्षित करण्यासाठी अंगणवाडी सेविका व शिक्षक ही योजना सुरू करण्यात आली. धोबी का कुत्ता ना घर का ना घाट का अशी आज अंगणवाडी सेविकांची आपण अवस्था करून टाकली आहे. कमीतकमी त्यांना सन्मानाने, स्वाभिमानाने जगता आले पाहिजे. ग्रामीण भागातील उपेक्षित, वंचित भागातील मुलांना उत्कृष्ट सेवा देता यावी यासाठी अंगणवाडी सेविकांची उपेक्षा ही थांबलीच पाहिजे. त्यांना सन्मानपूर्वक वागणूक कशी मिळेल, त्यांचा चरितार्थ कसा चालेल हे आपण पाहिले पाहिजे. त्यांचे कुटुंब व्यवस्थित चालले तर ते आपली सेवा चांगल्या प्रकारे देतील. त्यांचे कुटुंब चांगले चालले नाही तर मग त्यांचे सेवेमध्ये लक्ष राहणार नाही. उत्कृष्ट सेवा प्रदान करण्यासाठी शासनाने अंगणवाडी सेविका, शिक्षिकांच्या मागण्यांचा अत्यंत सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी माझी विनंती आहे. तसेच, त्यांची विनंती मान्य करण्यास आपण जास्त विलंब लावता कामा नये.

यानंतर उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पान क्र.90 वरील बाब क्र.49 वर बोलणार आहे. औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असेल किंवा राज्यातील इतर विद्यापीठे असतील त्यांच्या विकासासाठी योग्य प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती, महात्मा जोतिबा फुले चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती, राजर्षि छत्रपती शाहू महाराज चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे. हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित असला तरी सामाजिक न्याय विभागाच्या माननीय मंत्र्यांनी याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. या थोर पुरुषांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी तीन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांचे काम उत्कृष्टपणे, कार्यक्षम पद्धतीने चालावे म्हणून या समित्यांच्या सदस्य सचिवांची राहण्याची सोय आपण करावी, तरच ते आपले काम उत्कृष्टपणे करू शकतील.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

त्यामुळे ही जबाबदारी ओळखून उच्च व तंत्र शिक्षण विभागाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या पृष्ठ क्रमांक 68, बाब क्रमांक 41, च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, नागपूर येथील मेयो हॉस्पिटल हे अतिशय जुने हॉस्पिटल आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय नागपूरमध्ये आहे. दिल्लीमध्ये जसे एम्स मेडिकल कॉलेज आहे त्या धर्तीवर नागपूर येथे हॉस्पिटल केले जाईल अशा प्रकारची घोषणा शासनाने केली आहे. आमचे गृह राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील यांनी मेयो हॉस्पिटलला अचानक भेट दिली तर या मेयो हॉस्पिटलमध्ये कशा प्रकारचे काम चालते हे दिसून येईल. आमच्या गृह राज्यमंत्र्यांनी इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजमधून शिक्षण घेतले आहे. दिव्याखाली अंधार असणे बरोबर नाही. दिवा जळतो तेव्हा अंधार उजळतो ही जाणीव ठेवून आपण कारभार केला तर सगळीकडे प्रकाश पसरेल. मेयो हॉस्पिटलचे पुनरुज्जीवन करण्याची जबाबदारी सध्या नागपूर इम्प्रूव्हमेंट ट्रस्टकडे सोपवण्यात आली आहे. परंतु ही योजना कोठे बारगळली हे आम्हाला तरी काही कळत नाही. आघाडी सरकार गेले तरी काम झाले नाही. खरे म्हणजे मेयो हॉस्पिटलच्या संदर्भात प्रशासनाने सुध्दा दुर्लक्ष केलेले आहे. माननीय गृह राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील हे मेयो हॉस्पिटलचे विद्यार्थी असल्यामुळे त्यांनी मेयो हॉस्पिटलच्या संदर्भात लक्ष घालावे अशी विनंती आहे. सरकारी वैद्यकीय रुग्णालय नागपूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर हे जेव्हा निर्माण झाले तेव्हा या हॉस्पिटलची आशिया खंडातील सर्वात मोठे हॉस्पिटल म्हणून गणना केली जात होती त्यामुळे याकडे मंत्री महोदयांनी विशेष लक्ष द्यावे अशी विनंती आहे. नागपूर येथील मेडिकल कॉलेजमध्ये आपण जे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु केले त्यामध्ये अनेक गोष्टींची, अनेक तंत्रज्ञानाची, विशेष तज्ज्ञांची कमतरता असून त्याकडे मंत्री महोदयांनी लक्ष देऊन हे हॉस्पिटल उत्कृष्ट होण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

सभापती महोदय, महत्वाची गोष्ट अशी आहे की, औरंगाबाद येथे एक दोन वर्षापूर्वी कॅन्सर हॉस्पिटलचे उद्घाटन झाले आहे. औरंगाबाद प्रमाणे नागपूर येथे कॅन्सर हॉस्पिटल करता आले तर विदर्भ-मराठवाडयातील जनतेला जास्तीत जास्त फायदा होऊ शकेल असे मला वाटते त्यामुळे नागपूर येथे कॅन्सर हॉस्पिटल निर्माण करण्याचा आपण प्रयत्न करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 4, बाब क्रमांक 4, च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस स्टेशन निर्माण करण्यासाठी पुरवणी मागण्यामध्ये तरतूद करण्यात आली आहे. केवळ नक्षलग्रस्त भागातच नव्हे तर शहरी आणि ग्रामीण भागामध्ये उत्कृष्ट तसेच सर्व साधनांनी युक्त असे पोलीस स्टेशन तयार करण्याची गरज आहे. नक्षलग्रस्त भागाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे परंतु इतर भागातील पोलीस स्टेशनकडे आपल्याला दुर्लक्ष करुन चालणार नाही. शहरांमध्ये तसेच खेडयामध्ये आज जी गुंडगिरी सुरु आहे, नागपूरमध्ये गुंड दुकानात शिरुन व्यापाऱ्यांची भरदिवसा हत्या करतात व ही बातमी टीव्हीवर दाखवली जाते हे फार भयाणक आहे. राज्यामध्ये आज कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत वाईट झाली आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी गृह विभागाची संपूर्ण जबाबदारी आपल्या डोक्यावर घेण्याची आवश्यकता नाही. मुख्यमंत्री हे संपूर्ण महाराष्ट्राचा कारभार बघत असतात. माननीय मुख्यमंत्र्यांनी गृह विभागाची जबाबदारी स्वतंत्रपणे दुसऱ्या मंत्री महोदयांकडे सोपवली तर संबंधित मंत्री स्वतंत्रपणे चांगले काम करु शकतील. गृह विभागाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांवर आरोप करणे आम्हाला बरे वाटत नाही तसेच मुख्यमंत्र्यांना अकार्यक्षम म्हणणे हे आम्हाला बरे वाटत नाही. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी गृह विभागाची जबाबदारी एका स्वतंत्र मंत्र्यांकडे सोपवली तर राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती दुरुस्त होईल त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्य राखीव पोलीस दल (एसआरपी) ही अत्यंत महत्वाची पोलीस यंत्रणा आहे. एसआरपीचे प्रत्येक जिल्हयात कँप आहेत. एसआरपीच्या जवानांना ज्या पध्दतीने सोयी सुविधा मिळतात तशा सोयी सुविधा सिव्हील स्टाफला मिळत नाही. एसआरपीमधील सिव्हील स्टाफमध्ये स्वयंपाकी, चौकीदार इ. असतात परंतु या स्टाफला एसआरपी सारख्या ...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

सोयी सुविधामिळत नाहीत, त्यांना कोणत्याही प्रकारच्या रजा किंवा सुट्टया मिळत नाहीत. एसआरपी जवांनाची सेवा करतांना सिव्हील स्टाफचा मृत्यू झाला, गोळीबारामध्ये, एन्काऊंटरमध्ये त्यांचा मृत्यू झाला तर एसआरपी जवानांना ज्या सोयी सुविधा मिळतात त्या सोयी सुविधा सिव्हील स्टाफला मिळत नाहीत त्यामुळे यासंदर्भात शासनाने गंभीरपणे व सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक 6,7,8 व 9, पृष्ठ क्रमांक 8-9 च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, या सभागृहाचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे यांनी अत्यंत विस्तृत विचार या ठिकाणी व्यक्त केले आहेत. सन 2014 व 2015 मधील अवर्षणग्रस्त परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, मराठवाडा आणि विदर्भातील 1139 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या परिवाराला शासनाकडून मदत दिली जात असते. परंतु 119 आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना अपात्र ठरविण्यात आले असून 495 आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची प्रकरणे प्रलंबित असून ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. आमचे मित्र सुरेश भट यांनी आपल्या एका कवितेमध्ये म्हटले आहे की, "जगण्याने छळले होते, मरणाने सुटका केली." अशी म्हणण्याची पाळी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांवर आलेली आहे. जगण्यापेक्षा मरण चांगले ही भावना घेऊन शेतकरी उभा राहिला तर ते योग्य होणार नाही. शेतकरी मेला तर राज्य कसे जगेल,देश कसा जगेल ? ज्या शेतकऱ्याच्या भरवशावर आमची पोटे चालतात, ज्या शेतकऱ्याच्या भरवशावर आमच्या राज्याची आणि देशाची तिजोरी भरली जाते त्या शेतकऱ्यांकडे शासनाने दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यामुळे आपल्या माध्यमातून माझे शासनाला मागणे आहे की, शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना, दु:ख समजून घ्या व त्यांच्या दुखण्यावर सहानुभूतीपूर्वक विचार करून आत्महत्येपासून या शेतकऱ्यांना कसे परावृत्त करता येईल हा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून झाला पाहिजे.

सभापती महोदय, विदर्भातील, मराठवाडयातील तसेच खान्देशातील शेतकरी आत्महत्या का करतो ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

शासनाची परवानगी, रिझर्व्ह बँकेची परवानगी घेऊन सावकारी करणारे सावकार आहेत आणि परवानगी न घेता सावकारी करणारे अनधिकृत सावकार आहेत. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शासनाच्या धोरणाबद्दल सांगितले की, ज्या अधिकृत सावकारांकडून शेतकऱ्यांनी कृषीसाठी कर्ज घेतले त्यांचेच कर्ज माफ करण्यात येईल. ज्यांनी शेती व्यतिरिक्त इतर कामांसाठी कर्ज घेतलेले आहे त्यांचे कर्ज माफ केले जाणार नाही. अवकाळी पावसामुळे,गारपिटीमुळे वा दुष्काळामुळे शेतात काही पिकले नाही म्हणून त्याला कर्ज घ्यावे लागते. हे कर्ज मग तो मुलीच्या लग्नासाठी घेईल किंवा बैल मेला म्हणून बैलाची जोडी खरेदी करण्यासाठी घेईल किंवा अन्य घरगुती कामासाठी घेईल, आपण ते कर्ज देखील माफ केले पाहिजे. शासनास असा भेदभाव करता येणार नाही. आपण शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

वन विभाग- वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामध्ये जनावरे मृत्युमुखी पडतात. माणसे मृत्युमुखी पडतात, त्यांच्या कुटुंबांना मदत करण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. आता माणसे जंगलात घुसू लागली आहेत आणि वन्य प्राणी शहरात येऊ लागली आहेत. गोरेगाव व मुलुंड भागात बिबटे येत आहेत. नाशिक, नागपूर शहरात बिबटे शिरले आहेत. आजकाल कोकण विभागात देखील बिबटे येत आहेत. वन्य प्राण्यांमुळे जे नुकसान होते, माणसे मृत्युमुखी पडतात त्यांच्या परिवाराला योग्य मदत देण्यासाठी माननीय मंत्री लक्ष देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग, पृष्ठ क्रमांक 17, बाब क्रमांक 14 - या ठिकाणी शिक्षण विभागाचे मंत्री उपस्थित होते, परंतु आता ते दिसत नाहीत. मघाशी त्यांनी "कोणती क्रीडा" असे विचारले होते. ते रासक्रीडा म्हणाले नाहीत हे एका अर्थाने बरे झाले. आपण या ठिकाणी एकाच क्रीडावर चर्चा करतो ती एकच क्रीडा असते ती म्हणजे खेळाशी संबंधित क्रीडा. 125 कोटी लोकसंख्या असलेल्या देशात केरळची पी.टी.उषा ॲथेलीटमध्ये सुवर्ण पदक मिळवते. 125 कोटी लोकसंख्येच्या देशात फक्त एकच सुवर्णपदक मिळते ही अतिशय गंभीर बाब आहे. शरमेची बाब आहे. आपणास खेळामध्ये पदक मिळवावयाची असतील तर विद्यार्थ्यांना लहानपणापासून खेळाचे योग्य प्रशिक्षण दिले पाहिजे. भटक्या व विमुक्त जातीच्या समाजामध्ये डोंबारी खेळ करतात, ते

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

आपण सर्वांनी पाहिले असेल. दोन बाजूला बाबू उभे करून त्यामध्ये उंचावर रस्सी बांधून त्यावर उभे राहून आपला तोल सांभाळत ते कसरत करीत असतात. त्यांच्याकडे असलेल्या या टॅलेन्टचा आपण उपयोग करून घेतला पाहिजे. परंतु आता जिकडे तिकडे मुले क्रिकेट खेळताना दिसतात. ग्रामीण भागातील मुले देखील अंगावर शर्ट घालून, हाफपॅट घालून क्रिकेट खेळायला जातात. आपण देशी खेळाला प्रोत्साहन दिले पाहिजे. आम्ही लहान असताना आट्यापाट्या, लगोरी खेळ खेळत होतो. हे खेळ आपणास माहीत असतील असे मला वाटत नाही. आपल्याकडे अघोरी खेळ सुरु झाले पण लगोरी खेळ बंद झाला.

शालेय शिक्षण विभाग, पृष्ठ क्रमांक 17,बाब क्रमांक 14 - आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना "आदर्श शिक्षक पुरस्कार" देण्यासाठी जी आधीची रक्कम होती त्यामध्ये वाढ करून ती एक लाख रुपये करण्यात आली आहे आणि त्यासाठी मागणी करण्यात आली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी शिक्षकांच्या व्यथा मांडल्या. शिक्षकांचे थकीत वेतन देण्याची त्यांनी मागणी केलेली आहे.

नगर विकास विभाग, पृष्ठ क्रमांक 21, बाब क्रमांक 15,16,17- स्वेच्छाधीन निर्णया अंतर्गत सदनिकांचे वितरण करण्यासाठी मागणी केलेली आहे. मुंबईसारख्या शहरामध्ये झोपडपट्टयांच्या विकासासाठी एसआरए योजना सुरु झाली. झोपडपट्टयांचा विकास करण्यासाठी शासन एसआरए योजना विकासकांकडे, बिल्डरकडे देत आहे. विकासक झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या अज्ञानाचा, अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांची फसवणूक करीत आहेत. त्याची अनेक उदाहरणे येथे सांगता येतील. एसआरए योजना राबविण्यासाठी एमएमएआरडीए किंवा बीएसईएसच्या माध्यमातून काही एनजीओंवर झोपडपट्टीधारकांची यादी तयार करण्याची, पात्र आणि अपात्र झोपडपट्टीधारक ठरविण्याची जबाबदारी सोपविली जाते. परंतु ते त्यामध्ये अनेक प्रकारचे घोटाळे करतात. जे पात्र झोपडपट्टीधारक आहेत त्यांना अपात्र करतात आणि ज्यांचा झोपडपट्टीधारक म्हणून काही संबंध नाही त्यांना पात्र करतात. अशी स्पार्क नावाची एनजीओ मुंबई शहरात कार्यरत आहे. या स्पार्क

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

एनजीओने कांजूरमार्ग भागातील जे पात्र झोपडपट्टीधारक होते त्यांना वगळून ज्यांचा झोपडपट्टीशी काही संबंध नाही त्यांची नावे यादीमध्ये घुसविली आहेत. या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. विकासक, ठेकेदार आणि बिल्डर हे घोटाळे करून आमच्या गरिबांची लूट करीत आहेत, त्याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

वित्त विभाग, पृष्ठ क्रमांक 25, बाब क्रमांक 18 ते 20 - माझे सहकारी सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील आणि रामहरी रूपनवर यांनी एका महत्वाच्या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. अंदाजपत्रकामध्ये आमदारांच्या विकास निधीसाठी तरतूद करण्यात येते. काही वेळा हा विकास निधी वेळेमध्ये खर्च केला जात नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

त्यांनी 31 मार्च पूर्वी तो निधी खर्च केला नाही तर उर्वरित निधी शासनाकडे परत येतो. परंतु तो निधी परत आल्यानंतर शासन त्याचे काय करते हे कळत नाही. सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील व रामहरी रूपनवर यांनी अतिशय तर्कशुध्द मुद्दा मांडला. त्यांनी सांगितले की, सरकारने तो निधी परत घेण्यासाठी सभागृहाची परवानगी घेणे आवश्यक आहे. आमदार विकास निधीला जिल्हा नियोजन अधिकारी हे प्रशासकीय मान्यता देत असतात, शिवाय इतर एन.ओ.सी. वगैरे अनेक भानगडी असतात. त्यामुळे विलंब होतो. परिणामी, 31 मार्चपूर्वी निधी खर्च होत नाही आणि तो शासनाकडे परत येतो. शासनाकडून त्या निधीची कशाप्रकारे विल्हेवाट लावली जाते याची कोणालाच कल्पना नसते. त्यामुळे शासनाने या बाबत गंभीरपणे विचार केला पाहिजे. सभागृहामध्ये अर्थसंकल्पाच्या माध्यमातून आमदार महोदयांना निधी मंजूर केला असताना, तो निधी विहित मुदतीत खर्च झाला नाही तर 31 मार्च नंतर सुध्दा तो निधी त्या भागातील विकास कामांसाठी खर्च करण्यासाठी संधी दिली पाहिजे, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, कृषी, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विभागाच्या बाब क्रमांक-12, पृष्ठ क्रमांक-13 वर मी बोलतो. पशु वैद्यकीय दवाखान्यांचे बळकटीकरण करण्यासाठी शासनाने पुरवणी मागणी केली आहे. महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, नागपूरला महाराष्ट्रातील एकमात्र पशु व मत्स्य शास्त्र विद्यापीठ आहे. हे विद्यापीठ आगळेवेगळे असे आहे. नागपूरला आल्यानंतर आपण सुध्दा त्या विद्यापीठाला नक्की भेट द्यावी. ते विद्यापीठ अत्यंत उत्कृष्ट आहे. परंतु आज ते विद्यापीठ अनेक घोटाळ्यांनी गाजत आहे. या निमित्ताने माझी विनंती आहे की, त्या विद्यापीठातील प्रशासकीय कारभार दुरुस्त करावा.

सभापती महोदय, आपण गायीला गोमाता मानतो. विनोबाजींनी गायीला गोमाता संबोधून, गायीची हत्या थांबविली पाहिजे, अशी मागणी केली होती. मी काल-परवा साप्ताहिक चित्रलेखा अंक वाचला. त्या अंकामध्ये गोहत्या बंदीबाबतचा चांगला लेख छापून आलेला आहे. महोदय, बाबरने मंदिर पाडून मशीद उभारली असा आरोप केला जातो. परंतु याच बाबरने सर्वात पहिले गोवंश हत्या बंदीचा आदेश काढला होता. ही माहिती मिळाल्यानंतर मला आश्चर्य वाटले. बाबरने येथील राज्य जिंकल्यानंतर गोहत्या बंदीबाबतचा कायदा, कानून तयार केला, ही नवीन माहिती आम्हाला या लेखाच्या माध्यमातून मिळाली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण आटोपते घ्यावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी काल-परवा जालन्याला गेलो होतो. त्या भागात कुरेशी समाज मोठ्या प्रमाणावर आहे. मला अंबड, औरंगाबाद, मुंबईला सुध्दा शेकडो लोक भेटायला येतात. कदाचित आपल्याला सुध्दा भेटण्यासाठी येत असतील. परंतु गोवंश बंदी लागू केल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन बंद झाले आहे. गोहत्या बंदी आवश्यकच आहे. कारण हिंदू बांधवांची गायीवर श्रध्दा आहे. त्या श्रध्देचा आदर केलाच पाहिजे. पण गोवंश हत्या बंदी करताना सरसकट बंदी घातली तर बाकीच्या लोकांच्या उदरनिर्वाहासाठी काय पर्यायी व्यवस्था करणार आहात, या बाबतचे उत्तर सरकारने दिले पाहिजे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्रमांक-36, पृष्ठ क्रमांक-57 वर मी बोलणार आहे. या मागणीच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, ज्येष्ठ नागरिकांना एस.टी.मध्ये सवलत देण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. ही सवलत सामाजिक न्याय विभागाकडून दिली जाणार आहे की, एस.टी. देणार आहे हे माहीत नाही. माझ्या माहितीप्रमाणे ही सवलत एस.टी. देणार असून, त्यासाठी निधीची तरतूद सामाजिक न्याय विभागाकडून केली जाणार आहे. ज्येष्ठ नागरिकांना अशा प्रकारची सवलत दिल्याबद्दल मी माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाबतीत सांगतो की, आश्रमशाळा वसतिगृह अधीक्षकांच्या 1996 ते 2015 या कालावधीतील वेतनश्रेणीची थकबाकी देण्याचा शासनाने निर्णय घेतल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, जाता जाता एवढेच सांगतो की, पृष्ठ क्र.25, बाब क्रमांक 18, 19 व 20 च्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी पेण अर्बन सहकारी बँकेच्या बाबतीत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. पेण तालुक्यातील शिक्षकांचे खाते, पी.एफ.खाते हे पेण अर्बन सहकारी बँकेमध्ये आहे. शिवाय याच बँकेतून त्यांचा पगार निघतो. परंतु ती बँक डबघाईस आल्यामुळे त्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मी तर म्हणेन की, ज्यांनी घोळ केला असेल त्यांना कारागृहात टाका, त्यांना फासावर लटकवा. पेण परिसरातील 90 टक्के कर्मचाऱ्यांचे त्या बँकेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

खाते आहे. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांची अशाप्रकारे लूट होता कामा नये, त्यांचा सत्यानाश

होता कामा नये. त्यामुळे या बाबतीत सरकारने योग्य ती दखल घेतली पाहिजे. महोदय, माननीय सहकार मंत्र्यांनी सांगितले की, स्पी बँकेचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे. माझी मागणी आहे की, त्याच धर्तीवर पेण अर्बन सहकारी बँकेचे सुध्दा पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता आहे. इतर बँकांचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे, मग पेण अर्बन सहकारी बँकेने कोणाचे घोडे मारले आहे ? सर्वसामान्य जनता आणि कर्मचाऱ्यांशी संबंधित ही बँक आहे. या बँकेतील खातेदार हे भांडवलदार नाहीत. सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय लोक या बँकेचे खातेदार आहेत. त्यामुळे मी पुनश्च मागणी करतो की, पेण अर्बन सहकारी बँकेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मी ज्या सूचना केल्या आहेत, त्याबाबत शासन दखल घेईल, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्याला कोटी कोटी धन्यवाद देतो व माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर साधारणत: दोन दिवस चर्चा होत असते. परंतु राज्य सरकारच्या सर्व मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्यांचा गोषवारा एकाच दिवशी ठेवून, या मागण्यांवरील चर्चा एक उपचार म्हणून पार पाडली जात आहे असे मला वाटते. खरे म्हटले तर कोणत्याही राज्यापुढे, आपले राज्य चालवित असताना राज्याची आर्थिक स्थिती काय आहे, आपल्यासमोर कोणते प्रश्न प्रामुख्याने उभे आहेत आणि भविष्यात कोणते प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे, या सर्व गोष्टींवर साधकबाधक विचार करुन निर्णय घेतला जातो. एक निश्चित आहे की, आपण राज्य सरकारचा कारभार हातामध्ये घेतल्यानंतर केवळ तीन-चार महिन्यांचा कालावधी लोटला आहे. आम्ही समजू शकतो की, आपण सर्वजण आपापल्या विभागाचे काम समजून घेत आहात. आपल्या परीने काय करता येईल या बाबतचे मार्गदर्शन आपल्याला मिळत असून, त्या दृष्टीने आपली वाटचाल आपापल्या विभागाच्या माध्यमातून सुरु आहे. अगोदरच्या सरकारने 15 वर्षे काय केले, आपण आल्यानंतर काय घडणार आहे किंवा 15 वर्षांपूर्वी काय केले या इतिहास-भूगोलात न जाता मी माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, पूर्वी आमच्या कानावर काही गोष्टी येत होत्या. प्रत्येक विभागाच्या मंत्री महोदयांची तक्रार असायची की, आमच्यासमोर इतके मोठे प्रश्न असल्यामुळे आम्ही निधी मिळण्याबाबतचा प्रस्ताव तयार करतो आणि तो मंत्रिमंडळासमोर ठेवतो. परंतु तो प्रस्ताव वित्त विभागाकडून अडविला जातो. काही वेळा मंत्री महोदय स्पष्टीकरण देताना सांगत की, आम्ही सर्व बाबींची पूर्तता केली आहे, परंतु जोपर्यंत वित्त विभागाकडून मान्यता मिळत नाही तोपर्यंत पुढे जाता येत नाही. मघाशी एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, यावेळी मोठ्या रकमेच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या नाहीत. त्यांनी आकड्याच्या खेळात न जाता असे म्हटले की, पुरवणी मागण्याचा एकूण क्वॉंटम हा बराचसा मर्यादित स्वरुपात असल्याबद्दल शासनाचे अभिनंदन केले. महोदय, प्रत्येक गोष्टीला एक टाईम फ्रेम असते. आपण किती महिन्याच्या कालावधीसाठी किती खर्च करणार आहोत, नियोजित खर्च किंवा अधिकची वाढ तसेच अचानक काही प्रसंग

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

उद्भवल्यामुळे त्यात करावी लागणारी अधिकची वाढ, हा संपूर्णपणे आर्थिक व्यवस्थापनाचा भाग आहे.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

तो प्रत्येक खात्यामध्ये ज्या गांभीर्याने घेतला पाहिजे, त्या गांभीर्याने घेतला जातो की नाही याकडे पाहण्याची आवश्यकता या चर्चेच्या निमित्ताने आहे असे मला सूचित करावेसे वाटते. आपण निश्चितपणे असे म्हणतो की, राज्य शासनापुढे काही आपात्कालीन परिस्थिती उद्भवली की काही तातडीच्या उपाययोजना कराव्या लागतात. कुठल्याही राज्याचा अर्थसंकल्प किंवा वार्षिक आर्थिक उलाढाल असते. त्यामध्ये 2-3 प्रकार असतात. राज्याला मिळणारे उत्पन्न, राज्याला केंद्र सरकारकडून उपलब्ध होणारा निधी, राज्य स्वत:ची पत बाजारात नेऊन त्याद्वारे किती प्रमाणात अर्थसहाय्य उभे करू शकते, मग ते देशातून असेल किंवा देशा बाहेरून असेल किंवा वेगवेगळ्या माध्यमांतून असेल, हे पहावे लागते. कारण ज्या पध्दतीच्या प्रकल्पांची राज्याला प्रगतीपथावर ठेवण्याची आवश्यकता आहे, त्यासाठी आवश्यक असलेला निधी तर उभा केला गेलाच पाहिजे. मग तो निधी मोठ्या प्रमाणात उभा केला गेला तर त्याचे व्यवस्थापन आपण योग्य पध्दतीने करतो की नाही, हे पाहण्याची जबाबदारी प्रत्येक खात्यावर त्यांच्या खात्यामधील योजना कार्यान्वित करताना निश्चितपणे आहे.

सभापती महोदय, त्यामागचा मोठा विचार असा आहे की, प्रत्येक विभाग स्वतंत्र असले तरी ते कुठे ना कुठे एकमेकांशी निगडित आहेत. आपला काही भाग दुसऱ्या विभागाच्या कामामध्ये येऊ शकतो, ज्याला आपण इंटर डिपार्टमेंटरी डिसिप्लीन असे म्हणतो. सर्व माननीय मंत्र्यांनी हा महत्त्वाचा विषय समजावून घेण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक खात्यामध्ये साधारणत: भारतीय प्रशासन सेवेतील एक वरिष्ठ अधिकारी प्रमुख म्हणून काम करीत असतो, त्या खात्याचा तो प्रधान सचिवही असतो. आपल्याला हे सर्व कॅडर उपलब्ध आहे. ते ज्या प्रकारचे प्रशिक्षण, अनुभव घेऊन आपल्याकडे आले आहेत, त्यामधील फायनान्स हा विषय त्यांच्यासाठी सुध्दा महत्त्वाचा असतो आणि आपल्यासाठीही महत्त्वाचा असतो. आपण सर्वांनी तो चांगल्या पध्दतीने समजून घेतला तर मला वाटते की, आपल्या कार्यपध्दतीबद्दल आणि आर्थिक नियोजनाबद्दल आपल्याला अधिक सतर्क होऊन त्यामध्ये सहभागी होता येईल. विभागाची प्रत्येक बाब, पृष्ठ क्रमांक न सांगता काही गोष्टी मुद्दाम बोलाव्याशा वाटल्या म्हणून मी त्याचा उल्लेख केला आहे. कृपया कोणताही गैरसमज आपल्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

कोणाच्या मनात नसावा. माझी एकच इच्छा आहे की, आपण राज्याचा कारभार करीत आहोत हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपण सगळीकडे म्हणतो की, कार्पोरेट कल्चर आहे. आपण ही संस्कृती काय आहे हे लक्षात घेतले पाहिजे. प्रत्येक पैसा खर्च होतो, त्याचा इफेक्टिव्हनेस काय झाला आहे याची ज्याप्रमाणे आपण गुणवत्ता तपासत असतो त्याप्रमाणे आपल्या खात्याकडे येणारा प्रत्येक पैसा योग्यरितीने खर्च होतो किंवा नाही, हे बघण्याची जबाबदारी प्रत्येक खात्याच्या संबंधित माननीय मंत्र्यांवर आहे, ती जबाबदारी माननीय राज्यमंत्र्यांवर अधिक आहे, कारण त्यांनी तो दैनंदिन कारभार अधिक जवळून पहायचा असतो, अशा प्रकारची ही आपली रचना आहे.

सभापती महोदय, सर्वप्रथम मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 3, बाब क्रमांक 2 वर बोलतो. न्यायसहायक प्रयोगशाळेच्या संदर्भात माझ्या आधीच्या वक्त्यांनी बराच उल्लेख केला आहे. मध्यंतरी असे वाचनात आले होते की, आपण न्यायसहायक प्रयोगशाळा म्हणजे फॉरेन्सिक लॅबोरेटरी याची एक मोबाईल फॉरेन्सिक लॅबोरेटरी म्हणूनही आपल्या राज्यात उपयोग होण्यासाठीची योजना केली आहे. कोल्हापूर आणि नांदेडला न्यायसहायक प्रयोगशाळांसाठी पुरवणी मागण्यांमध्ये मागणी केली आहे. न्यायसहायक प्रयोगशाळा निर्माण करण्यासाठी, त्याची इमारत बांधण्यासाठी, त्यातील यंत्रसामुग्री आणण्यासाठी जी तरतूद असेल त्यातून हे सर्व उभे राहील. पण न्यायसहायक प्रयोगशाळेमध्ये काम करणारे तांत्रिक, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग आपण कुठून आणणार आहात ? कारण त्याचे नियोजन या बरोबरीने झाले तरच या व्यवस्थेला काही तरी अर्थ राहणार आहे आणि त्यातून आपल्याला काही तरी प्राप्त होण्याची शक्यता आहे. मी एवढ्यासाठी सांगतो की, परवा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील उत्तराच्या भाषणात माननीय मुख्यमंत्र्यांनी असा उल्लेख केला की, राज्यात आम्ही कन्व्हिक्शन रेट वाढविण्याचा प्रयत्न करीत आहोत. गुन्हे दाखल होऊन कोर्टात जातात, त्यामधून कन्व्हिक्शन किती होते याबद्दलचा एक ताळमेळ करण्याचा आपण प्रयत्न करीत आहात ही चांगली, स्वागतार्ह गोष्ट आहे. परंतु हा रेट वाढविण्यासाठी ज्या प्रकारच्या इन्फ्रास्ट्रक्चरची आवश्यकता आहे, त्यामध्ये या न्यायसहायक प्रयोगशाळांचा समावेश होतो. आपल्याला यासाठी तंत्रज्ञ कमी पडणार आहेत. आपण पुढील 5, 10, 15 वर्षात प्रशिक्षित

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

मॅनपॉवरची गरज किती आहे, राज्यामध्ये त्यात येणाऱ्या संस्था किती आहेत हे पाहिले पाहिजे. किंबहुना आपण एक आरोग्य विज्ञान विद्यापीठ वेगळे तयार केले आहे, त्यामध्ये न्यायसहायक प्रयोगशाळांमध्ये काम करणाऱ्या तंत्रज्ञांसाठी काही विशेष अभ्यासक्रमाची तरतूद केली आहे का, त्याप्रमाणे प्रशिक्षित तयारीचे मनुष्यबळ निर्माण करू शकणार आहोत का ? सभापती महोदय, हा इतका व्यापक विषय असून इतर विषयांशी त्याचा संपर्क येत असतो. त्यामुळे एक मागणी करताना त्याला पूरक ठरणाऱ्या इतर गोष्टींची पूर्तता केली नाही तर काहीही अर्थ नाही. प्रत्येक वाढवून मागितलेला पैसा जनतेचा आहे, तो आपल्याकडे येतो. आपण विश्वस्त या नात्याने तो पैसा खर्च करीत असतो. त्यामुळे तो पैसा खर्च करीत असताना तो योग्य प्रकारे होतो की नाही याची अकाऊंटिबिलिटी सुध्दा आपल्यावर आहे. आपण या दृष्टीने विचार केला पाहिजे आणि त्या दृष्टीने विचार झाला तर मला वाटते की, कोल्हापूर आणि नांदेड प्रमाणे सबंध राज्यामध्ये फॉरेन्सिक लॅबच्या व्यवस्थेच्या संदर्भात आपल्याला निश्चितपणे काही तरी धोरणात्मक निर्णय घेता येईल. आता जरी यासाठी मर्यादित तरतूद असली तरी येणाऱ्या अर्थसंकल्पात यासाठी चांगल्या प्रकारची तरतूद व्हावी, अशी मी आपणास विनंती करतो.

सभापती महोदय, आता मी गृह विभागाच्याच पृष्ठ क्रमांक 3, बाब क्रमांक 3 वर बोलणार आहे. धान्य वापरून अल्कोहोल तयार करणे या संदर्भातील ही बाब आहे. जुना संदर्भ द्यायचा नाही म्हटले तरी तो येतो. मागच्या सरकारच्या काळात अल्कोहोल निर्मितीसाठी धान्य देण्यास सुरूवात झाली किंवा त्यासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना झाली. आपल्याला एकदा या संदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यायला हवा. आपल्याला धान्यापासून अल्कोहोल निर्मिती करायचीच नसेल तर त्या बाबतची कोणती मूल्ये आपण जपत आहोत आणि ती मूल्ये जपण्यासाठी आपल्याला किती किंमत द्यावी लागत आहे याचा तारतम्याने विचार केला पाहिजे. कारण आपण निधीची मागणी केलेली आहे याचा अर्थ ती योजना पुढे नेण्यासाठी आपण उत्सुक आहात. तुम्ही ती योजना पुढे नेण्यासाठी उत्सुक असाल तर मग या आधी आपण त्या संदर्भात केलेली वक्तव्ये अस्थायी, अनाठायी ठरतात. आपण याचाही या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने विचार करावा असे मला वाटते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

सभापती महोदय, आता मी महसूल विभागाच्या पृष्ठ क्रमांक 8, बाब क्रमांक 6 वर बोलणार आहे. सदर बाब आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य देण्याच्या संदर्भातील आहे. किती शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात, त्यापैकी किती जणांना सहाय्य मिळते, किती केसेस योग्य धरल्या जातात, किती केसेस रिजेक्ट होतात, ही तफावत यंत्रणांमुळे होत आहे का, हे पाहिले पाहिजे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना मदत वेळेवर पोहचली पाहिजे. आपण त्यामध्ये असलेले प्रशासकीय अडथळे जोपर्यंत दूर करणार नाही तोपर्यंत आकड्यांच्या खेळाच्या पलीकडे जाऊन जो मानवी दृष्टीकोन घेतला पाहिजे, तो घेण्याच्या बाबतीत आपण यशस्वी होऊ असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, मला वाटते की, संबंधित खात्याने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना एकदा एकत्र बोलावून त्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. आपण सबंध महाराष्ट्राचे स्किल डेव्हलपमेंट करण्याच्या गोष्टी करता. आपण जी गोष्ट इतरांना सांगतो ती स्वत:पासून सुरू करणे केव्हाही सोयीस्कर असते. त्यामुळे आपण यावर मात करण्यासाठी जास्तीत जास्त प्रमाणात या बाबींचा विचार करावा. इतक्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या अशी आकडेवारी समोर येते, तेव्हा पुन्हा टक्केवारीमध्ये जाऊन 475 शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य मिळाले नाही, 112 शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मिळाले, तुमचा स्ट्राईक रेट काय होता, असा प्रश्न विचारण्याची वेळ येऊ नये.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.....

100 % Efficient, managed scheme आणि Zero Tolerance असणाऱ्या योजना असल्या पाहिजेत. आपली सर्व प्रशासकीय पध्दत संपूर्णपणे पारदर्शी असल्यामुळे त्या त्या जिल्ह्यात जो कारभार चाललेला आहे, त्याचे स्पष्ट चित्र लोकांसमोर आणण्याची गरज आहे आणि त्या दृष्टीकोनातून आपण विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पशुसंवर्धन विभा्गाच्या पृष्ठ 12, बाब क्रमांक डी-8 वर बोलत असताना गोवंश हत्याबंदीच्या प्रश्नाकडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे. गोवंश हत्याबंदीचे विधेयक मंजूर झाले असून हा कायदा लागू झालेला आहे. त्याचे श्रेय संपूर्ण मुंबईमध्ये पोस्टर्सच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न आमच्या दृष्टीस पडला आहे. परंतु, यामधून निर्माण होणारे काही प्रश्न आहेत. पशु दवाखाने, विद्यापीठे हे विषय आपण बाजूला ठेऊ. परंतु, ही बंदी आल्यानंतर पशुधन किती प्रमाणात वाढणार आहे, आज किती पशुधन आहे, त्यामध्ये किती वाढ होणार आहे, त्यांची वये काय राहणार आहेत, जे पशु वृद्ध होत जातील त्यांची काळजी कोण घेणार आहे, या व्यवसायावर अवलंबून असलेल्या लोकांना दुसरा काही व्यवसाय उपलब्ध करून दिला नाही तर जी बेकारी अगोदरच आहे त्यामध्ये भर पडणार आहे का, अशा प्रकारचे प्रश्न साहजिकच निर्माण होणार आहेत. आपला हेतू चांगला असतो. चांगल्या पध्दतीने आपण या प्रश्नाकडे बघत आहात. परंतु, या प्रश्नातून निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मागण्यांमध्ये कोठे तरी तरतूद असण्याची आवश्यकता होती. असेही काही होणार नाही की, त्यांचा रोजगार बुडाला म्हणून ते रस्त्यावर येतील. परंतु, शासनाकडून त्यांना दिलासा मिळण्याची आवश्यकता आहे. ज्याप्रमाणे आपण शेतकऱ्यांना दुधाचा, कुक्कुटपालनाचा जोडव्यवसाय करण्याबाबत मार्गदर्शन करतो, त्याप्रमाणे या कायद्यामुळे जी परिस्थिती व्यावसायिकांवर उद्भवणार आहे, त्याबाबतीत त्यांचे कौन्सिलिंग करण्याच्या बाबतीत, प्रश्नाचे निराकरण करण्याच्या बाबतीत कोणती व्यवस्था आपण करणार आहोत, हे प्रश्न या निमित्ताने विचारात घेण्यासारखे आहेत.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 57, बाब क्रमांक 37 अन्वये ज्येष्ठ नागरिकांना भाड्यात सवलत देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. वृध्द, विकलांग, निराश्रित, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी एस.टी.ची सवलत आहे. ज्याला आपण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.....

काठीने औषध लावणे म्हणतो, तशा प्रकारची ही तरतूद आहे. मी देश पातळीवरील एका अंध संस्थेचे काम बघतो. अशा प्रकारची सवलत अनेक राज्यात मिळते. माझा अनुभव असा आहे की, समोरचा व्यक्ती अंध आहे, हे वाहन चालकाला समजत असते. परंतु, तरी सुध्दा तो त्या अंधाला विचारतो की, तू कार्ड आणले आहेस का ? ज्याला दृष्टी आहे त्याने समोरच्या दृष्टीहीन माणसाला कार्ड विचारण्याची आवश्यकता काय आहे ? या सर्व यंत्रणेमधील त्रुटी आहेत. ज्येष्ठ नागरिकाच्या वयाची मर्यादा 60 आहे की 65 आहे, यावरून वाद होतात. आधार कार्ड दाखविले तरी हे चालणार नाही, असे सांगितले जाते. आपण जेव्हा एखादी सवलत देतो तेव्हा त्याकडे मेहरबानी म्हणून बघत नाही. ज्येष्ठ नागरिक, अपंग यांना सांभाळण्याची जबाबदारी शासन म्हणून आपली असते. त्या दृष्टीकोनातून याकडे पाहिले आणि तसे वागविले गेले तर आपले शासन खऱ्या अर्थाने गोरगरिबांना मदत करीत आहे, अशा प्रकारचा संदेश लोकांपर्यंत जाऊ शकेल.

सभापती महोदय, इतरही अनेक प्रश्न निर्माण होत असतात. एस.टी.किती लोकांना सवलत देणार, एस.टी.चालवायची कशी, ती तोट्यात जाईल, असे विचारले जाते. एस.टी.तोट्यात जाईल, एवढे लक्ष, एवढे कोटी रुपये तोटा येणार आहे, असे आपण धरून चालू. पण हा तोटा भरून काढण्यासाठी काही पर्याय आपल्याकडे आहेत का, आपण काही मार्गांवर ज्यांच्या खिशाला परवडणार आहे, अशांसाठी वेगळ्या पध्दतीने प्रवासी वाहतूक सुरु करु शकतो का, याचाही विचार केला पाहिजे. आज राज्यात मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्ग वाढला आहे. त्यांना चांगली सुविधा दिली तर ते अधिकचे पैसे खर्च करण्यास तयार होतात. शिवनेरीचे उदाहरण आपल्यासमोर आहे. आपण असेही पाहतो की, खाजगी एअरलाईन्स नफ्यात चालतात मात्र एअर इंडियाला तोटा होतो. तशीच परिस्थिती एस.टी.ची झाली नाही ना, हाही विचार आपण करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारची आव्हाने स्वीकारण्याची गरज प्रत्येक खात्याला आहे. मर्यादित स्वरूपात अर्थपुरवठा होत असताना जास्तीत जास्त परिणामकारकरितीने मिळणाऱ्या निधीचा वापर आपण कसा करणार आहोत, अधिक चांगले रिझल्टस् कसे देणार आहोत, याकडे लक्ष दिले तर निश्चितपणे चांगली पावले आपल्याला टाकता येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.....

सभापती महोदय, नियोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 61, बाब क्रमांक 38 अन्वये मानव विकास निर्देशांक वृध्दी करण्यासाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. मला वाटते, मराठवाड्यात, विदर्भात सिंचनाचा, शिक्षणाचा आणि अन्य क्षेत्राचा जो अनुशेष आहे, तो दूर करण्याच्या दृष्टीकोनातून, राज्याच्या समतोल विकासाच्या दृष्टीकोनातून मानव विकास निर्देशांक ही आपल्या राज्याची खरी कसोटी आहे. ज्या ठिकाणी मानव विकास निर्देशांक कमी आहे, अशा तालुक्यांची, गावांची यादी आपल्याकडे आहे. हा निर्देशांक वाढविण्यासाठी आपल्याला काय करता येईल, यासाठी मागणी आली तर त्यासाठी निधी खर्च होईल. मानव विकास निर्देशांक वाढविण्याचे काम म्हणजे एखादे फळझाड मोठे करण्यासारखे आहे. आंब्याचे रोप लावल्यानंतर लगेच दुसऱ्या वर्षी आंब्याचे फळ मिळेल, अशी अपेक्षा कोणी बाळगत नाही. मानव विकास निर्देशांकाचे काम फळझाडासारखेच आहे. हे काम आपल्याला मनापासून करावे लागेल. सातत्याने त्याच्या वाढीवर लक्ष ठेवावे लागेल आणि त्याचा विशिष्ट काळानंतर सारखा आढावा घ्यावा लागेल. सुरु केलेल्या योजनांची अंमलबजावणी होते किंवा नाही, याचा प्रत्येक वेळी आढावा घेण्याची गरज आहे आणि तो आपण घ्यावा, त्यामुळे मानव विकास निर्देशांक वाढण्यास मदत होईल. परंतु, यासंदर्भात केलेली मागणी औपचारिक स्वरूपाची आहे. ही बाब ठळक समजून त्याकडे लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्याचे माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत सभागृहात उपस्थित आहेत. ज्याप्रमाणे गारपीट, अवकाळी पाऊस हे मोठे संकट आहे, त्याचप्रमाणे आज देश पातळीवर आलेले असले तरी महाराष्ट्रातही स्वाइन फ्लूने गंभीर रूप धारण केले आहे. यापूर्वी कोणकोणत्या साथीचे रोग आले आणि त्यावेळी विरोधी बाकावर बसलेले सध्याच्या सन्माननीय आरोग्य मंत्र्यांनी राज्य शासनाला कोणकोणत्या सूचना केल्या होत्या, याची कल्पना त्यांनाही असेलच. आज त्या सूचनांची अंमलबजावणी करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. आपण पुरवणी मागण्यांमध्ये याबाबतच्या प्रसिध्दीसाठी, प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी 1 कोटी रूपयांचा निधी मागितला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.....

ही मागणी पुरेशी आहे किंवा नाही, याच्या खोलात मी जाणार नाही. पण आपण मूलभूत विचार काय करीत आहोत, याकडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे. रोजच्या वर्तमानपत्रात नागपूरला एवढे लोक दगावले, पुण्यामध्ये एवढ्या लोकांना लागण झाली, एवढ्या नवीन केसेस मिळाल्या, अशा बातम्या येत असतात. परंतु, लोकांकडून वारंवार अशा सूचना येत आहेत की, केवळ शासकीय आरोग्य सेवेवर अवलंबून न राहता आपण खाजगी सेवा देणाऱ्या संस्थांना औषध पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रसिध्दी इतकेच अशा महत्त्वाच्या बाबींकडे आपण लक्ष दिले तर या रोगावर मात करण्यासाठी त्याचा आपल्याला निश्चित उपयोग होऊ शकेल. त्यादृष्टीने आपण विचार करावा.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 91 वरील बाब क्रमांक 51 अन्वये अशासकीय कला, विज्ञान आणि वाणिज्य व विधि महाविद्यालयांना अनुदाने यासाठी तरतूद केली आहे. राज्यातील महाविद्यालयीन वसतिगृहे कशी आहेत, कशा प्रकारची आहेत, किती आहेत, संख्या किती आहे, किती विद्यार्थ्यांना त्यामध्ये प्रवेश मिळतो, हा सर्व विचार ह्युमन रिसोर्सेस डेव्हलपमेंटशी निगडित आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालये असतात. कदाचित खाजगी संस्थांची वाढ झाल्यामुळे दोन-तीन गटांची महाविद्यालये असू शकतात. काही ठिकाणी उत्तम व्यवस्था असते. खाजगीकरण मोठ्या प्रमाणात झालेले आहे. खाजगी विद्यापीठांना आपण स्वायत्त दर्जा देऊन मान्यता दिलेली आहे. आपल्या सरकारमान्य कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालयांमध्ये पायाभूत सुविधा अपूर्ण आहेत. याचा विचार आपण केला तर त्या दृष्टीने आपल्याला निश्चितपणे सुधारणा करता येणे शक्य आहे. या आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी आहेत. यामधील बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. सन्माननीय मंत्री डॉ.दीपक सावंत विरोधी पक्षात असताना आदिवासी योजनांबाबत सभागृहाला कायम जागरुक करण्याचे काम करीत असत. या विभागात काय चालले आहे, कोणत्या प्रकारचा साबण दिला जात आहे, नोटिफिकेशनमध्ये कोणत्या प्रकारचा साबण पुरविण्याची जबाबदारी आहे, याकडे ते लक्ष वेधायचे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापती स्थानी माननीय उप सभापती)

श्री.हेमंत टकले...

At that time, we were answerable. Today, you are answerable. Therefore, we expect a better delivery from Hon. Minister Dr. Sawant.

सभापती महोदय, पान क्रमांक 103, बाब क्रमांक 58 मराठी भाषा विभाग यावर मी बोलत असताना असे सांगू इच्छितो की, मला याचे मोठे आश्चर्य वाटते की, मराठी भाषा विभाग हा आपणा सर्वांकडून इतका दुर्लक्षित का राहतो ? मराठी भाषा विभागाचा उल्लेख पुरवणी मागण्यांच्या विवरण पत्रात देखील शेवटच्या पानावर आलेला आहे. मराठी भाषेचा आग्रह आमच्या पेक्षा मागील 15 वर्षाच्या काळात कोण अधिक धरीत होते. बॉम्बे हायकोर्टाचे नांव मुंबई उच्च न्यायालय व्हावे, त्यातून बॉम्बे हे नाव निघून जावे, याबाबत आता केंद्र शासनाच्या पातळीवर त्यासंदर्भातील चर्चा सुरु झालेली आहे. त्यासंदर्भातील आश्वासन मिळविण्याबाबत आपण यशस्वी झाला आहात, अशा प्रकारची बातमी आम्ही वाचली होती. नावाच्या पाट्या बदलून मराठी भाषेचे आपण काय करीत आहात. मराठी भाषा ज्ञान भाषा होण्यासाठी तिला अभिजात भाषेचा दर्जा तिच्या ताकदीवर मिळणार आहे. यासाठी अनेक प्रयत्न केले, अनेक समित्या नियुक्त झाल्या होत्या. साहित्य कला अकादमीकडे प्रस्ताव जाऊन तो मंजूर झाला आहे. 27 फेब्रुवारीला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळेलच अशा प्रकारची अपेक्षा असताना आता निदान महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, या बाबीची आपणाकडून पूर्तता व्हावी अशा प्रकारची अपेक्षा पुरवणी मागण्यांवर बोलताना व्यक्त केली तर ती अनाठायी आहे, असे मला वाटत नाही. त्या पलीकडे जाऊन मराठी भाषेच्या संदर्भात शासनाकडून जे प्रयत्न सुरु आहेत, त्यापेक्षा खूप अधिक प्रयत्न मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या वेगवेगळ्या संस्था करीत आहेत. वेगवेगळ्या विद्यापीठातील मराठी भाषा विभाग काम करीत आहेत. या सर्वांचे एकत्रीकरण आपणाला करायचे असेल तर त्यासाठी निधीची आवश्यकता आहे. केवळ रंगभवन येथे मराठी भाषा भवनाची इमारत भव्य दिव्य उभारून मराठी भाषेचे फार मोठे कल्याण करणार आहात, अशातला हा भाग नाही. खऱ्या अर्थाने मराठी भाषा समृध्द व्हावी, ज्ञान भाषा व्हावी, व्यवहार भाषा व्हावी, यादृष्टीने प्रयत्न करायचे असतील तर ज्या प्रमाणे राज्यातील काही प्रकल्पांबाबत आपण नेहमी म्हणतात की,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले...

मराठी भाषेसाठी जे जे करायला लागेल त्यासाठी कधीही निधीची कमतरता हे शासन पडू देणार यासाठी शासन कधीही निधी कमी पडू देणार नाही. मला या सरकारकडून अशी अपेक्षा आहे की, नाही अशा प्रकारचा शब्द आपण पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने द्यावा. पुरवणी मागण्यांवरील चर्चेचे विषय उपचार म्हणून न राहता सर्व विषयांची चर्चा व्हावी, दुर्दैवाने त्या प्रकारचे वातावरण सभागृहात कायम राहील किंवा आहे असे मला वाटत नाही. यामध्ये देखील सुधारणा होण्याची गरज आहे. पुरवणी मागण्यांमधील प्रत्येक बाबीबद्दल पुन्हा शासनाने पुनर्विचार करुन आवश्यक त्या सुधारणा कराव्यात. ज्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत, त्याबाबत मला वाटणारे माझे मत व मला तुमच्याकडून असणाऱ्या अपेक्षा याबाबतचे विवेचन करण्याची संधी दिली त्याबाबत मी सभापती महोदयांचे आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: राज्यातील नागपूर, वर्धा व बुलढाणा या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना बँकींग परवाना मिळणे

मु.शी.: राज्यातील नागपूर, वर्धा व बुलढाणा या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना बँकींग परवाना मिळणे यासंबंधी सहकार मंत्र्याचे निवेदन.

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: सन 2014-2015 च्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

(चर्चा पुढे सुरु..

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014-2015 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 8, बाब क्रमांक 6, यावर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना जी मदत देण्यात येते, त्याबाबत मला असे आठवते की, सन 1996-97 च्या काळात युती शासनाने पहिल्यांदा एक लाख रुपये शेतकऱ्यांना मदत दिली होती. आता यवतमाळ जिल्ह्यात सर्वात जास्त आत्महत्या होत आहेत. गेल्या 14 ते 15 वर्षानंतर देखील सरकार एक लाख रुपयेच मदत देत आहे. याबाबत शासनाचे काही वेगळे धोरण नाही काय ? आर्थिक तरतूद असते, आर्थिक लिमिट असते, माझ्या महिती प्रमाणे या रकमेत तीन वर्षानंतर सुधारणा होणे आवश्यक आहे. दर तीन वर्षानंतर त्या रकमेची किंमत कमी होते. 14 वर्षापूर्वी सरकार एक लाख रुपये देत होते. आज देखील एक लाख रुपयेच देत आहे. आता एक लाख रुपये देणे म्हणजे लोकांना गंमत वाटते. आता एक लाख रुपये देणे म्हणजे त्या शेतकऱ्याचा व त्याच्या कुटुंबीयांचा अपमान आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, एक लाख रुपयाऐवजी आता 5 लाख रुपये देण्यात यावेत. शेतकऱ्याचा प्रश्नाकडे महाराष्ट्रात लक्ष दिले जात नाही. शेतकऱ्यांनी या सरकारला ज्या अपेक्षेने निवडून दिले ती अपेक्षा या सरकारने पूर्ण केलेली नाही. मी आपणाला शुभेच्छा देतो की, आपण पाच वर्षे व्यवस्थित राज्य करावे. आपले सरकार पहिल्या तिमाहीत नापास झाले आहे. सहामाहीत तर नापास होणारच आहे. या सरकारकडून शेतकऱ्यांची अशी अपेक्षा होती की, आमच्या शेती मालाला भाव मिळेल, कापसाला भाव मिळेल. या सरकारने आश्वासन दिले होते की, उत्पादन खर्चाच्या दीड पट भाव देण्यात येईल. परवाच्या दिवशी या सरकारने खाजगी सावकारी कर्ज माफ केले आहे. मी त्यावेळी देखील सरकारला विचारले होते व आजही विचारीत आहे की, माझ्या तालुक्यात मी सर्व्हे केला तेव्हा रजिस्टर सावकाराकडून कर्ज घेतलेला एकही शेतकरी मला दिसला नाही.

उप सभापती : पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य विचार मांडत असताना आपण खाली बसून त्यांना बाब क्रमांक विचारीत आहात. या पुस्तकात ही बाब कोठे आहे ती आपण शोधावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

या नंतर श्री. बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, आपण निश्चितपणे चांगला निर्णय घेतलेला आहे. परंतु, ते पैसे कोणाच्या घरात जाणार आहेत, हे तपासून पहावे. नाही तर आम्ही नंतर हे सर्व घोटाळे म्हणून बाहेर काढू. लक्षात ठेवा, ही साधी गोष्ट नाही. हा फार मोठा घोटाळा असेल, तर सांभाळून करा, एवढेच माझे म्हणणे आहे. (...अडथळा....) तुम्ही शेतकऱ्यांना सावकारी... (....अडथळा....) हा खूप मोठा घोटाळा आहे. आपण राजरोसपणे घोटाळा करीत आहात. माझे आपल्याला उघडपणे सांगणे आहे की, सावकार आता रजिस्टर तयार करीत आहेत. मी तुमच्या माहितीसाठी सांगतो. मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. ज्याने शासनाकडे रजिस्ट्रेशन केलेले आहे, जो शेतकऱ्यांना कर्ज देणार आहे, असा एकही सावकार नाही.

सभापती महोदय, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर आपण त्याच्या कुटुंबीयांना अतिशय तुटपुंजी मदत देतो. ज्या शेतकऱ्यांची शेती वनाच्या जवळ आहे त्या शेतकऱ्यांची शेती वन्य प्राणी वारंवार उद्ध्वस्त करतात. आम्ही शासनाकडे वारंवार मागणी करतो की, शासनाने कुंपण करण्यासाठी शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. परंतु, कुंपण करण्यासाठी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळत नाही. तुम्ही या विषयासाठी मोर्चे काढले होते, हे विसरु नका. तुम्ही एवढ्या लवकर हे विसरु नका, एवढ्या लवकर शेतकऱ्यांना विसरु नका नाही तर त्यांनी आम्हाला घरी बसविले, तुम्हाला देखील घरी बसवतील. (...अडथळा...) पुन्हा आम्हीच येणार, दुसरे कोण आहे. मी दोन-तीन गोष्टींचा उल्लेख करणार आहे.

सभापती महोदय, मराठी भाषा विभाग, पृष्ठ क्र.103, बाब क्र.58-मराठी भाषा विभागाच्या 6 विद्यमान कार्यक्रमांच्या खर्चासाठी नवीन उप-शीर्षाखाली स्वतंत्र तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आपण नेहमी मराठी भाषेच्या विकासासाठी, संवर्धनासाठी बोलत असतात, याचा मला आनंद आहे. मी सांगू इच्छितो की, संपूर्ण देशात 10 टक्के लोक बंजारा भाषा बोलतात. महाराष्ट्र राज्यात 7 टक्के लोक बंजारा भाषा बोलतात आणि दुसऱ्या समाजातील 3 टक्के लोक देखील बंजारा भाषा बोलतात. आपण आमच्या पुसद किंवा यवतमाळ जिल्ह्यात आलात तर आपल्या लक्षात येईल की, तेथे बंजारा ही एक प्रकारची राजभाषा आहे. त्या भागातील मुस्लिम देखील बंजारा भाषा बोलतात. आमचे आदिवासी बांधव देखील बंजारा भाषा बोलतात. राज्यातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड.....

एकूण लोकसंख्येच्या 10 टक्के लोक बंजारा भाषा बोलतात. माझी मागणी आहे की, आपण बंजारा भाषेला विशेष महत्व देऊन बंजारा भाषेसाठी देखील वेगळी तरतूद करावी.

सभापती महोदय, महिला व बाल विकास विभाग, पृष्ठ क्र.95, बाब क्र.56-अंगणवाडी केंद्रांच्या बांधकामासाठी अतिरिक्त तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. महिला व बाल विकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे सभागृहात उपस्थित आहेत. शालेय पोषण आहार योजना कोणासाठी होती ? ज्या मुलांना आई-वडील नाहीत, अशा मुलांसाठी ही योजना आहे. हा विषय महिला व बाल विकास विभागाचा आहे. ज्या मुलांना आई-वडील नाहीत, अशी मुले त्या ठिकाणी दोन वेळचे जेवण घेतात. परंतु, शालेय पोषण आहाराचे मागील किती महिन्यांचे पैसे देण्यात आलेले नाहीत, हे आपण आपल्या विभागाला विचारावे. आपण किती शिक्षकांना पगार देता ? (...अडथळा...) हा उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा विषय नाही, हा महिला व बाल विकास विभागाचा विषय आहे. मुलांना पोषण आहार देखील मिळत नाही.

सभापती महोदय, औद्योगिक प्रशिक्षणासाठी कंत्राटी पद्धतीने इन्स्ट्रक्टरची नेमणूक करण्यात आलेली आहे. आपण एकीकडे शिक्षकांची शिक्षण सेवक म्हणून नेमणूक करतो. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जे इन्स्ट्रक्टर म्हणून काम करतात त्यांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यात आलेली आहे. जवळपास अशा 1500 कर्मचाऱ्यांची परीक्षा घेऊन त्यांनी रितसर पद्धतीने नेमणूक करण्यात आलेली आहे. परंतु आता त्यांचा कॉन्ट्रॅक्ट संपलेला आहे. त्यामुळे त्यांना आता त्यांना घरी बसावे लागत आहे. माझी शासनाला विनंती आहे की, ज्या प्रमाणे शिक्षकांची शिक्षण सेवक म्हणून नेमणूक केली जाते त्या प्रमाणे इन्स्ट्रक्टर यांची देखील शिक्षण सेवक म्हणून नेमणूक करावी आणि त्यांना न्याय द्यावा.

सभापती महोदय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, पृष्ठ क्र.57, बाब क्र.36 व 37 वर मी बोलणार आहे. मी माननीय सामाजिक न्याय मंत्री महोदयांना धन्यवाद देईन. मला आजच त्यांचे पत्र मिळाले. आपल्याला भटके विमुक्त, अपंग यांच्यासाठी काही सूचना करावयाच्या असतील तर त्या कराव्यात, असे त्यांनी मला सुचविले. सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात खूप

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री.हरिसिंग राठोड.....

काही सुचविण्यासारखे आहे. मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. परंतु, या ठिकाणी मी एका गोष्टीचा जरूर उल्लेख करीन. सभागृहात अनेक वेळा धनगर समाजाच्या आरक्षणाचा विषय उपस्थित होतो. कशासाठी आरक्षण ? कोणते आरक्षण ? मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी आपण धनगर समाजाला आरक्षण देण्याची मागणी करता त्यावेळी भटक्या विमुक्तांना देखील आरक्षण पाहिजे....

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांना सांगू इच्छितो की, आपण भाषणाचा समारोप करावा.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, माझा सर्वांना सल्ला आहे. मी याचा अभ्यासक आहे. काय होणार आहे आणि काय करावयास पाहिजे, याची मला माहिती आहे. या सभागृहाच्या माध्यमातून हे जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे की, तुम्हाला केवळ धनगरांना आरक्षण देता येणार नाही. जसे तुम्हाला शेड्युल ट्राईबला देताच येणार नाही. (...अडथळा...) मी सांगू इच्छितो की, ज्या प्रमाणे.....

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री आणि सभागृहाच्या नेत्यांनी धनगर समाजाला आरक्षण देण्यात येईल असे सांगितले असताना सन्माननीय सदस्यांनी आरक्षण देता येत नाही, असे म्हणणे चुकीचे आहे.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांना सांगू इच्छितो की, आपण भाषणाचा समारोप करावा.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड : सगळ्यात कठीण काम धनगरांना आरक्षण देण्याबाबतचे आहे, ते तुम्हाला करावे लागणार आहे. सभापती महोदय, एका वाक्यात सांगायचे म्हणजे महाराष्ट्रामध्ये धनगर समाजाबरोबर भटक्या विमुक्त जातीला सुध्दा आरक्षण द्यावे लागेल एवढे बोलून मी वेळेअभावी माझे भाषण पूर्ण करतो.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महसूल विभाग बाब क्रमांक 9 अन्वये सिंधुदुर्ग जिल्हयातील वन्य प्राण्यांमुळे झालेल्या नुकसानीबद्दल भरपाई देण्यासाठी 3 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. सरपटणाऱ्या प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान होत नसले तरी सर्पदंशामुळे माणूस मरतो, तेव्हा अशा घटनांचा यामध्ये समावेश करावा अशी मी शासनाला विनंती करतो. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये तिलारी येथे एलिफंट सँक्च्युरी व्हावी अशीही माझी मागणी आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभाग बाब क्रमांक 14, पृष्ठ क्रमांक 17 वर पुरवणी मागणी सादर केली आहे. आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन वेतनवाढी ऐवजी 1 लाख रुपये देण्याचा शासनाने निर्णय घेतला त्याच धर्तीवर प्रत्येक वर्षी 5 सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त व 11 नोव्हेंबर रोजी मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या स्मृती निमित्त वय वर्षे 70 वा त्यापेक्षा अधिक वयाच्या सेवानिवृत्त शिक्षकांचा पंचायत समिती स्तरावर यथोचित सन्मान करावा व त्यासाठी आर्थिक तरतूद करावी.

सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयामध्ये कोकण विभागाच्या परीक्षा मंडळासाठी शासनाने 3 एकर भूखंड मंजूर केला आहे. त्या भूखंडाभोवती कुंपण घालण्यासाठी 65 लाख रुपयाची टोकन ग्रँट वर्ग केली आहे. त्या संदर्भातील कार्यवाही पूर्णत्वास जावी. जेणेकरुन त्या जागेचा व्यवस्थित वापर होईल व त्या जागेवर कोणतेही अतिक्रमण होणार नाही.

सभापती महोदय, नगरविकास विभाग बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 21. 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार नागरी स्थानिक संस्थांकरिता अतिरिक्त तरतूद करण्याबाबत पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, ठाणे येथील मॉडेला मिलच्या जागेत कॅन्सर हॉस्पिटल व स्मशानभूमीचे आरक्षण ठेवण्यात आले आहे, ते आरक्षण विकसित करणे आवश्यक आहे. त्या परिसरात स्मशान भूमी नसल्यामुळे स्मशानभूमीची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी आर्थिक तरतूद व्हावी. रस्त्यासाठी विशेष निधी अंतर्गत फक्त 60 टक्के निधी उपलब्ध झाला, तो त्वरित वितरित व्हावा अशी विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) HH.3

SGB/ 18:10

ॲड.निरंजन डावखरे.....

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग. बाब क्रमांक 39, पृष्ठ क्रमांक 65. भिवंडी निजामपूर महापालिकेच्या अंतर्गत स्व.इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयातील 41 अधिकारी आणि कर्मचारी पदांना सामावून घेऊन त्यांच्या 30 जानेवारी ते 31 मार्च या काळातील वेतनासाठी आर्थिक तरतूद प्रस्तावित केली आहे. तेथील आणखी काही कर्मचाऱ्यांना अद्याप वेतन मिळालेले नाही. ऑगस्ट, 2014 पासून वेतन देण्याबाबत तातडीने कार्यवाही व्हावी अशी विनंती करतो. जेणेकरुन ते हॉस्पिटल चांगल्या पध्दतीने लोकांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देऊ शकेल. भिवंडीमध्ये हातमाग व्यवसायामध्ये काम करणाऱ्या कामगारांना चांगल्या आरोग्याच्या सोयी शासनाच्या माध्यमातून दिल्या जाऊ शकतील.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग बाब क्रमांक 50. विद्यापीठांना अर्थसहाय्य व अंतर्गत वेतन व वेतनेतर खर्चासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. रत्नागिरी येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र 2013 मध्ये बांधून पूर्ण झाले आहे. उपकेंद्राद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकविले जात नसून पूर्ण झालेली इमारत विनावापर पडून आहे. त्या इमारतीचा योग्य वापर व्हावा. तेथे हॉस्टेलची सुविधा नसल्यामुळे शिक्षक जाण्यास तयार नाहीत. असलेल्या सुविधेचा योग्य वापर होत नाही याबाबत शासनाने योग्य ती कारवाई करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 65, बाब क्रमांक 40. सार्वजनिक आरोग्य विभागाची पूरक मागणी सादर केलेली आहे. स्वाइन फ्लू आजाराबाबत जाहिरात व प्रसिध्दी माध्यमातून प्रतिबंध व उपाययोजना करण्यासाठी तरतूद केलेली आहे. नव्याने पालघर या आदिवासी जिल्हयाची निर्मिती झालेली आहे. त्या जिल्हयाकरिता जिल्हा रुग्णालय आवश्यक असल्यामुळे त्याकरिता तरतूद करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, नगरविकास विभाग, बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 21. राज्यातील एनयुएलएम या संस्थेची राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत स्थापना करण्यात आली आहे. एम्प्लॉयमेंट प्लेसमेंटच्या अंमलबजावणीसाठी कौशल्य विकास सोसायटी या अग्रगण्य संस्थेची नियुक्ती केली होती. बीपीएलमधील कुटुंबातील दीड लाख व्यक्तींना प्रशिक्षण देण्याचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उद्दिष्ट ही संस्था पूर्ण करु शकली नाही. त्यामुळे योजनेला हरताळ फासला जात आहे. प्रशिक्षणापासून लाभार्थी वंचित होत आहेत. लाभार्थ्यांमध्ये निर्माण झालेला संताप याबाबत शासनाने

...4...

संबंधितांची चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदय त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये याबाबत खुलासा करतील असा मी विश्वास व्यक्त करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 4. नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस ठाणे बांधण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने नव्याने निर्माण झालेल्या पालघर जिल्हयामध्ये सातत्याने गुन्हेगारी वाढत असून त्या जिल्हयाकरिता पोलीस मुख्यालय होणे गरजेचे आहे. त्या जिल्हयाला न्याय मिळेल असा विश्वास व्यक्त करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 35, पृष्ठ क्रमांक 53. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अन्नधान्याच्या व्यवहारातील तूट भरुन काढण्यासाठी अर्थसहाय्याची तरतूद करण्यात आली आहे. ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन 1 ऑगस्ट, 2014 रोजी पालघर जिल्हा अस्तित्वात आला. जिल्हयाची सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्था नाही. सद्य:स्थितीत ठाणे जिल्हयाकडून अन्नधान्य वितरण व्यवस्था होत आहे. त्यासाठी पालघर जिल्हयाची अन्नधान्य वितरण व्यवस्था निर्माण करुन तेथील नागरिकांना दिलासा द्यावा. ठाणे जिल्हयातील कार्यालयाबरोबर संपर्क ठेवावा लागतो, त्यामुळे वितरण व्यवस्थेत प्रचंड त्रास होतो. पालघर जिल्हयासाठी स्वतंत्र सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्था निर्माण करण्यात यावी अशी मी शासनाला विनंती करतो. आपण मला माझे विचार मांडण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 1, पृष्ठ क्रमांक 3. पोलीस कर्मचारी हे 8 तासापेक्षा अधिक वेळ काम करतात. किंबहुना 24 तास डयुटीवरच असतात. त्या पोलीस कर्मचाऱ्यांना भत्ता देण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. या भत्त्यामध्ये वाढ होणे अपेक्षित आहे. ग्रामीण भागामध्ये पोलिसांना आपल्या जिवावर उदार होऊन काम करावे लागते.

नंतर 2 आय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले....

त्यामुळे मी त्यांच्या आर्थिक स्थितीकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

यानंतर मी पान क्र.4 वरील, बाब क्र.4 वर शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. शासनाने नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस स्टेशन बांधण्यासाठी तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. नक्षलग्रस्त भाग हा अतिशय दुर्गम असल्यामुळे तेथे कोणीही जायला तयार होत नाही. अशा ठिकाणी पोलीस जिवावर उदार होऊन काम करीत असतो. आपण सदोदित गडचिरोलीमध्ये घडलेल्या घटना ऐकत असतो. येथे काम करणाऱ्या कंत्राटदारांना देखील सुरक्षा देणे आवश्यक आहे. नक्षलग्रस्त भागातील बांधकामे गतीने होण्यासाठी, सुसज्ज व अद्ययावत होण्यासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे. पुरवणी मागणीमध्ये तरतूद केली असल्यामुळे मी शासनाचे स्वागत करतो.

यानंतर मी पान क्र.9 वरील बाब क्र.9 वर बोलणार आहे. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या नुकसानीसाठी भरपाई देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. विदर्भात वन्य प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान होताना दिसते. त्यासाठी सोलर फेंसिंग करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे जे काही नुकसान होईल त्याची तातडीने भरपाई देणे आवश्यक आहे. प्रत्येक हिवाळी अधिवेशनामध्ये दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी यावर चर्चा होते. त्यावेळी वन्य प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान होत असल्याचा देखील उल्लेख केला जातो. तेव्हा यासाठी शेतकऱ्यांना भरघोस मदत करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर मी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पान क्र.17 वरील बाब क्र.14 वर बोलणार आहे. आदर्श शिक्षक पुरस्काराचा खर्च भागविण्याची तरतूद आपण केली आहे. सन 2006 पासून आदर्श शिक्षकांना देण्यात येणाऱ्या दोन इंक्रीमेंट थांबविण्यात आल्या आहेत. तसेच, 2009 ते 2014 च्या दरम्यान ज्यांना आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कृत करण्यात आले त्यांचा कुठल्याही प्रकारचा सन्मान करण्यात आलेला नाही. फक्त त्यांचा सत्कार करण्यात आला. 5 सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी शिक्षकांचा सत्कार करावा लागतो. पण 5 सप्टेंबर 2014 रोजी पासून आचार संहिता लागू होईल म्हणून 1 लाख रुपये रोख देण्याची घोषणा दिनांक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल सोले...

सप्टेंबर 2014 रोजी करण्यात आली. पण त्याचा लाभ अजून कोणालाही मिळालेला नाही. पूर्वी दोन इंक्रीमेंट देण्याची शासनाची जी योजना होती ती अधिक चांगली होती. सदर योजना सन 2006 नंतर बंद करण्यात आली. मधल्या काळात म्हणजे सन 2009 ते 2014 च्या दरम्यान ज्या शिक्षकांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही त्या शिक्षकांना रोख रक्कम द्यावी अशी विनंती मी माननीय शिक्षण मंत्र्यांना करणार आहे. केंद्र शासन आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना बऱ्याच सुविधा देते. त्याप्रमाणे राज्य शासन आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना सुविधा देत नाही. केंद्र सरकारतर्फे आदर्श शिक्षकांना रेल्वे प्रवासाच्या भाड्यामध्ये सूट देण्यात येते. आपण एस.टी.च्या प्रवास भाड्यात आदर्श शिक्षकांना सूट देऊ शकतो. आपल्या राज्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना केंद्र शासनाच्या धर्तीवर देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा द्याव्यात अशा प्रकारची विनंती मी शासनाला करतो.

सभापती महोदय, शासनाने अत्यंत कमी पुरवणी मागण्या मांडलेल्या आहेत. अत्यंत निकडीच्या बाबींचाच मागण्यांमध्ये अंतर्भाव करण्यात आलेला आहे. त्या पूर्ण झाल्या पाहिजेत, अशी या शासनाची भावना दिसते. त्यामुळे या पुरवणी मागण्यांचे मी समर्थन करतो आणि शासनाचे अभिनंदन करतो. धन्यवाद.

.....

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपीकिशन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकरण संस्था) : सभापती महोदय, आपण सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर मला बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. मी फक्त दोनच बाबींवर बोलणार आहे.

सभापती महोदय, मी पान क्र 21 वरील नगरविकास विभागाच्या बाब क्र.15 वर बोलणार आहे. 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार नागरी स्थानिक संस्थांकरिता रू 2,45,70,73,000 इतक्या निधीची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. माननीय पंतप्रधानांनी देशातील राज्यांमध्ये स्मार्ट सिटीजची योजना राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. या राज्यामध्ये 227 अ, ब, क, ड, नगरपालिका आहेत. नगरपालिका ही केंद्र नगराची केंद्र बिंदू असते. राज्यातील 50 टक्के नगरपालिकांची अशी स्थिती आहे की, त्याठिकाणी दिवसा नगरसेवक आणि अधिकारी बसलेले असतात आणि रात्रीच्या वेळी गुरे-ढोरे बसलेली असतात. स्मार्ट सिटीच्या बाजूला अ, ब, क, ड नगरपालिका असेल आणि तेथे गुरे-ढोरे बसत असतील तर राज्य शासनाने काही तरी उपाययोजना केली पाहिजे. यासाठी राज्य शासनाने पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून राज्यात एकसूत्रता आणण्याचे काम केले पाहिजे. नगरपालिका नगराची केंद्र बिंदू असते. नगराची संपूर्ण देखभाल ही नगरपालिकेच्या माध्यमातून होत असते. त्यामुळे नगरपालिकांमध्ये सुधारणा आणण्याची गरज असून त्यासाठी भरीव तरतूद करण्याची गरज आहे. आज राज्यातील सर्वच नगरपालिकांची स्थिती अत्यंत वाईट आणि बिकट आहे. आज नगरसेवकांना फक्त 50 रूपये मानधन मिळते. त्यामुळे नगरपालिकांसाठी राज्य शासनाने भरीव तरतूद केली तर ती योग्य होईल.

यानंतर मी पान क्र.41 वरील विधी व न्याय विभागाच्या बाब क्र.29 वर बोलणार आहे. न्यायाधीशांची 179 नवीन पदे प्रस्तावित करण्यात आली आहेत. यासाठी रूपये 47,23,79,000 इतकी तरतूद करण्यात आली आहे. गेल्या 15 वर्षात रास्ता रोको या सारखी जी विविध आंदोलने करण्यात आलेली आहेत त्यासंबंधातील किरकोळ गुन्हे संबंधितांवर दाखल असून त्यांची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. यासाठी अनेकांना कोर्टामध्ये चकरा माराव्या लागत आहेत. असे किरकोळ गुन्हे शासनाने मागे घेतले तर न्यायालयावरचा लोड देखील कमी होईल अशी सूचना मी या माध्यमातून करीत आहे आणि येथेच थांबतो. आपण मला परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी सन 2014-15 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मी पान क्र.21 वरील बाब क्र.15 वर बोलणार आहे. मुंबईच्या हाकेवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आहे. ही खरोखरच महानगरपालिका आहे काय, असा प्रश्न मला पडतो. कल्याण महानगरपालिकेच्या क्षेत्रातील मांडा-टिटवाळा, गाळेगाव मोहीली या गावांमध्ये आजही पक्के रस्ते नाहीत. स्मार्ट सिटी व चांगल्या विकास कामासाठी या महानगरपालिकेला पुरस्कार मिळाला आहे, त्याचे मला आश्चर्य वाटते आहे. मी शासनाला विनंती करतो की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अशा गावांना मुख्य शहरांशी जोडणारे पक्के रस्ते बनविण्यासाठी शासनाने भरीव मदत करावी.

कल्याण पूर्व हा मोठा इलाखा असून मी तेथे राहातो. येथे जवळ जवळ पाच ते सहा लाख लोकवस्ती आहे. येथील जलवाहिन्या अत्यंत खराब झाल्या असून त्या 10 ते 20 वर्षांपूर्वीच्या आहेत. काही जलवाहिन्यांमध्ये तर ड्रेनेजचे पाणी देखील जाते. गेल्या वर्षी तर एका वॉर्डमध्ये पाईप लाईनमध्ये कुत्र्याचे पिल्लू मेलेल्या अवस्थेत आढळले होते. अशी आज तेथील अवस्था आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जगन्नाथ शिंदे .....

13 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून कल्याण-डोंबिवली भागातील जलवाहिन्या बदलून देण्यासाठी शासनाने पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा, जेणे करून जनतेला शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकेल.

सभापती महोदय, केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून कल्याण डोंबिवलीमध्ये बीएसयुपी योजना लागू करण्यात आली. परंतु त्यामध्ये प्रचंड अनियमितता झाल्यामुळे आजमितीस या योजनेतील सर्व प्रकल्पाची कामे बंद पडली आहेत. प्रकल्प वेळेत पूर्ण न होऊ शकल्यामुळे त्यांच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली व पर्यायाने वाढीव खर्च करणे महानगरपालिकेच्या आवाक्याबाहेर गेल्यामुळे राज्य शासनाने आर्थिक मदत करून त्यावर योग्य नियंत्रण करून हे प्रकल्प मार्गी लावावेत. असे जर झाले तर आमच्या करदात्यांनी या योजनेवर जो पैसा खर्च केला आहे तो कारणी लागेल. त्यामुळे शासनाने यासंदर्भात सहानुभूतीपूर्वक मदत करावी अशी विनंती मी या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आरोग्य खाते ऑलरेडी व्हेंटीलेटरवर आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या संदर्भातील अनेक त्रुटी मी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या असूनही शासन याबाबत ढिम्म आहे. मनपाची रुग्णालये शासनाने चालविण्यास घेतल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही व ही बाब शासनाला सुध्दा ठाऊक आहे. मनपाची रुग्णालये शासन चालविण्यास का घेत नाही हे आम्हाला काही समजत नाही.

सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अस्थापनेचा खर्च 40 टक्क्यापेक्षा जास्त असल्यामुळे नवीन पदांना मंजुरी देता येत नाही व ही बाब जगजाहीर आहे. या विषयाच्या संदर्भात मी मागील अधिवेशनात एक लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले होते परंतु त्यांनी ही बाब गांभीर्याने घेतली नसल्यामुळे मी पुन्हा पूरक मागण्यांच्या निमित्ताने आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने त्वरित कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची हॉस्पिटल्स आपल्या ताब्यात घेऊन येथील जनतेला आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी विनंती करतो. ..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जगन्नाथ शिंदे .....

सभापती महोदय, नगर विकास विभागाच्या बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 21 च्या संदर्भात मी माझे विचार मांडित आहे. नद्यांचे संवर्धन व संरक्षणाची मोहीम देशात सुरु झाली असताना कल्याण येथील वालधुणीच्या नदीबाबत शासन उदासीन आहे. या विषयाच्या संदर्भात आम्ही शासनाला अनेक वेळा सूचित केले असून यासंदर्भात शासनाने लवकरात लवकर निर्णय करणे जरुरीचे आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा या विभागाच्या बाब क्रमांक 14, पृष्ठ क्रमांक 17 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, प्रत्येक जिल्हयामध्ये, तालुक्यांमध्ये चांगली क्रीडा संकुले निर्माण होणे ही देशाची गरज आहे. खेळामध्ये आपले राज्य आणि देश फार मागे आहे. आज ग्रामीण भागामध्ये खेळाचे कौशल्य असलेले खेळाडू मोठया संख्येने उपलब्ध आहेत त्यामुळे ग्रामीण भागातील चांगले खेळाडू तयार करण्याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 39, पृष्ठ क्रमांक 65 च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. गेल्या सहा महिन्यापासून आपल्याकडे मोठया संख्येने स्वाईन फ्ल्यूचे रुग्ण आढळून येत आहेत. स्वाइन फ्लूच्या संदर्भात व्हायरॉलॉजी टेस्ट्ची सुविधा महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. महानगरपालिकेमध्ये स्वाईन फ्लूच्या संदर्भात विशेष असे वॉर्ड नसल्यामुळे अशा प्रकारच्या वॉर्डची व्यवस्था असणे आवश्यक आहे. स्वाईन फ्लूचे उपचार गरिबांना मोफत उपलब्ध व्हावेत अशी माझी मागणी असून यासंदर्भात मी माननीय मुख्यमंत्री,अर्थमंत्री तसेच आरोग्य मंत्र्यांना निवेदन दिले असून या ठिकाणी मी जे विषय उपस्थित केलेले आहेत त्यासंदर्भात शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी मी शासनाला आपल्या मार्फत विनंती करतो.

धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 4 च्या संदर्भात मी प्रथम माझे विचार व्यक्त करणार आहे. या पुरवणी मागणीद्वारे नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस स्टेशन बांधण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आपण नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस स्टेशन बांधण्यासाठी तरतूद करता तशी तरतूद आदिवासी किंवा इतर कोणत्याही भागात सुसज्ज पोलीस स्टेशन बांधण्याच्या संदर्भात करणे आवश्यक आहे. मी मागच्या हिवाळी अधिवेशनात आर्णी तालुक्यातील जुन्या पोलीस स्टेशनच्या संदर्भात माझे विचार व्यक्त केलेले आहेत. आर्णी तालुक्यातील सदर पोलीस स्टेशन हे 100 वर्षापूर्वीच्या इमारतीमध्ये होते. या इमारतीजवळ पोलीस स्टेशनसाठी जागा उपलब्ध असतांना हे पोलीस स्टेशन दुसरीकडे नेण्यात आले परंतु या ठिकाणी अद्यापपर्यंत पोलीस स्टेशन दिलेले नाही.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात आपण ज्या प्रमाणे नक्षलग्रस्त भागाकडे लक्ष देत आहात त्याच प्रमाणे ज्या ज्या ठिकाणी पोलीस स्टेशन्स प्रलंबित असतील त्या ठिकाणी पोलीस स्टेशन द्यावे अशी मागणी मी या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक 6,पृष्ठ क्रमांक 8 च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना सहाय्य करण्यासाठी करण्यात आलेली तरतूद फार अपुरी आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय असते. या कुटुंबाचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले असते. काल परवा आर्णी तालुक्यातील मुकुंदपूर येथील प्रशांत इंगोले नावाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. या शेतकऱ्याचे वय केवळ 24 वर्षाचे होते. या शेतकऱ्याचे दुसऱ्या दिवशी लग्न होणार होते. या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या हातावर मेहंदी लावलेली होती. या शेतकऱ्याने लग्नाच्या आदल्या दिवशी आत्महत्या केली. या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, आत्महत्याग्रस्त कुटुंबाला आपण 1 लाख रुपये मदत देत असतो. हे सानुग्रह अनुदान फार कमी असून त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ख्वाजा बेग .....

असून अशा शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज माफ करावे अशी माझी पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मागणी आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची अनेक प्रकरणे अपात्र ठरवली जातात त्यामुळे अशा सर्व प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन विशिष्ट अशी योजना राबवून ही प्रकरणे अपात्र ठरविण्याची खरोखर गरज आहे काय, ही बाब तपासून घेऊन अशा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाना जादा मदत करावी अशी विनंती मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 8,पृष्ठ क्रमांक 9 नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधा पोहचलेल्या शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य देण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. जानेवारी-फेब्रुवारीमध्ये गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अतिशय तुटपुंजी मदत शासनाकडून देण्यात आलेली आहे. गारपिटीने नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, काल परवा आर्णी तालुक्यात जी गारपीट झाली त्यामध्ये गणेश मोरे, एन.टी.जाधव आणि आशिष राऊत या तीन डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. या शेतकऱ्यांना जवळ जवळ 40 लाख रुपयांचे उत्पन्न मिळणार होते ते संपूर्ण उत्पादन गारपिटीमुळे जमिनीवर आले. त्यामुळे शासनाची यासंदर्भातील मदत तुटपुंजी आहे काय, हे पाहणे गरजेचे असून या पुरवणी मागणीद्वारे मदत वाढवून द्यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, पशुवैद्यकीय दवाखान्याबाबत मी बाब क्रमांक 12 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. गोवंश हत्या कायदा लागू करण्यात आला असून या विषयावर मी जास्त बोलणार नसून एवढेच सांगू इच्छितो की, पशुवैद्यकीय दवाखाने ज्या ज्या ठिकाणी आहेत त्या त्या पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये सर्व सोयी-सुविधा उपलब्ध आहेत काय तसेच ज्या दवाखान्यांचा स्तर कमी आहे,श्रेणी कमी आहे अशा पशुवैद्यकीय दवाखान्यांची श्रेणी वाढवून सुविधा देण्यासाठी त्यासंदर्भातील सर्व बाबी या पुरवणी मागण्यांद्वारे मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 40, पृष्ठ क्रमांक 65 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यात स्वाईन फ्लूचा उद्रेक झाल्यामुळे जाहिराती व प्रसिध्दी माध्यमातून या रोगावर प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याबाबत शासनाने योजना आखलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.ख्वाजा बेग.....

रुग्णालयात स्वाईन फ्लूचे रुग्ण वाढत आहेत त्याचप्रमाणे इतर प्रकाराच्या आजाराचे रुग्ण देखील वाढत आहेत. त्या रुग्णांना योग्य त्या सोयीसुविधा पुरविणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ज्या ठिकाणी ट्रॉमा केअर सेंटरची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी ते उभारले पाहिजेत अशी मागणी करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2014-2015 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी आपण मला परवानगी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पृष्ठ क्रमांक 17, बाब क्रमांक 14 - राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार मिळणाऱ्या शिक्षकांना दोन आगाऊ वेतनवाढी ऐवजी एक रकमी एक लाख रुपये देण्यासाठी तरतूद केलेली आहे त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. परंतु दिनांक 5 सप्टेंबर 2006 ते 5 सप्टेंबर, 2013 या कालावधीत ज्या शिक्षकांना राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत त्यांना दोन आगाऊ वेतनवाढी दिलेल्या नाहीत. त्या शिक्षकांना दोन आगाऊ वेतनवाढी देण्यासाठी तरतूद करावी, अशी मी येथे मागणी करतो.

सभापती महोदय, शासनाने सन 2000 मध्ये "कायम विना अनुदानित" तत्वावर शाळा काढण्याची परवानगी दिल्यानंतर सन 2009 मध्ये त्यातील "कायम" शब्द काढून टाकण्यात आला आणि सन 2011 पासून शाळांचे मूल्यांकन करुन त्या अनुदानास पात्र आहेत किंवा कसे याचा निर्णय घेतला. त्यानुसार 7 फेब्रुवारी, 2014 रोजी 11 माध्यमिक शाळा पात्र ठरल्या. 1 मार्च, 2014 रोजी 472, 27 जून, 2014 रोजी 187, 30 जून, 2014 रोजी 139, 30 जून, 2014 रोजी 194, 19 ऑगस्ट, 2014 रोजी 333, आणि 9 फेब्रुवारी, 2015 रोजी 162 शाळा अशा एकूण 1 हजार 398 शाळा आणि 29 ऑगस्ट, 2014 रोजी 118 प्राथमिक शाळा पात्र ठरल्या असताना या शाळांना अनुदान देण्याबाबत शासनाने तरतूद केलेली नाही. या शाळांना अनुदान देण्यासाठी शासनाने तरतूद करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, अपंग समाविशी शिक्षण योजना माध्यमिक स्तर अंतर्गत येत असलेल्या 1365 विशेष शिक्षकांना गेल्या तीन वर्षापासून वेतन मिळालेले नाही. त्यापैकी चार शिक्षकांनी आत्महत्या केल्या आहेत. आपण येथे शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल बोलतो. आपण येथे शिक्षकांच्या आत्महत्येबद्दल देखील बोलले पाहिजे. माझी शासनाला विनंती आहे की, अपंग समाविशी शिक्षण योजनेमध्ये काम करणाऱ्या 1365 शिक्षकांना मागील तीन वर्षापासून जे वेतन अदा केलेले नाही ते अदा करावे. त्यासाठी नागपूर विभाग शिक्षण उप संचालक कार्यालयापुढे आंदोलन सुरु आहे त्याची दखल घेण्यात यावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो पुंडलिक गाणार...

सभापती महोदय, अनुदानित शाळांतील शिक्षकांना 1 तारखेला वेतन मिळाले पाहिजे अशी मागणी सातत्याने महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेच्या वतीने करण्यात येते. शासनाने वारंवार वचन दिले पण ते वचन पाळले जात नाही.

सभापती महोदय, महात्मा गांधी विद्यालय, आरमोरी, जिल्हा गडचिरोली, येथील अभय भास्कर वनमाळी या शिक्षकाचा आजच सकाळी मृत्यू झाला. मागील दोन महिन्यांपासून त्या शाळेतील शिक्षकांना वेतन मिळालेले नाही. आजारी असलेल्या या शिक्षकाला औषधोपचार घेता आले नाही म्हणून त्याचा मृत्यू झाला. या घटनेस त्या जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांना कारणीभूत धरुन त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, अशी मी येथे मागणी करतो.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, पृष्ठ क्रमांक 90, बाब क्रमांक 48- सन 2011 पासून महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना थकबाकी मिळालेली नाही. निधी अभावी त्यांची देयके प्रलंबित आहेत. त्यासाठी निधीची तरतूद करावी, अशी मी शासनास विनंती करतो.

सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, पृष्ठ क्रमांक 29, बाब क्रमांक 21 - आताच मंत्री महोदयांनी येथे घोषणा केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत शिक्षक, कर्मचारी, भागधारक व खातेधारक यांचे जमा असलेले पैसे त्यांना परत करण्याची व्यवस्था शासनाने करावी अशी विनंती आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पृष्ठ क्रमांक 57, बाब क्रमांक 36 - गडचिरोली, वर्धा आणि नागपूर जिल्ह्यामध्ये शिष्यवृत्तीचा 56 कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. या घोटाळ्यास जबाबदार असलेले संस्थाचालक, अधिकारी आणि संबधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी विनंती मी या निमित्ताने करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2014-2015 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आताच सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाचा पाढा वाचून आजच सकाळी एका शिक्षकांचा मृत्यू झाला असे त्यांनी सांगितले. या केवळ शिक्षकांच्याच वेदना नाही तर राज्यातील शेतकरी,शेतमजूर, गरीब, झोपडपट्टीधारक आणि मध्यमवर्गीयांच्या वेदना आहेत.

पृष्ठ क्रमांक 4-अर्थसंकल्पीय अंदाज 2014-2015मध्ये समाविष्ट करावयाचे विवरणपत्र - राज्याच्या समतोल व समान विकास झाला पाहिजे, मग तो मराठवाडा विभाग असो, विदर्भ विभाग असो, पश्चिम महाराष्ट्र विभाग असो. सन 2014-2015 योजनांतर्गत अर्थसंकल्पीत होणारा अतिरिक्त नियतव्यय निरंक आहे. विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी नियमव्ययाचे वाटप पुढील प्रमाणे आहे. (1) विदर्भ विकास मंडळ - शून्य, (2) मराठवाडा विकास मंडळ- शून्य, (3) उर्वरित विकास मंडळ- शून्य.

सभापती महोदय, विदर्भाचा समतोल विकास करण्यासाठी विदर्भ वैधानिक विकास महामंडळ होते. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ होते. परंतु यातील "वैधानिक" शब्द काढून टाकण्यात आलेला आहे. ज्या हेतूने विदर्भ वैधानिक विकास मंडळाची निर्मिती झाली ते पाहता या महामंडळासाठी पुरवणी मागण्यांमध्ये भरीव तरतूद करून विदर्भाचा विकास करण्याचा प्रयत्न होईल असे वाटले होते, पण तसे झालेले नाही. विदर्भाचा 75 हजार कोटी रुपयांचा अनुशेष आहे. वित्त मंत्री विदर्भातील आहेत, ऊर्जा मंत्री विदर्भातील आहेत आणि माननीय मुख्यमंत्री देखील विदर्भातील आहेत. आम्हाला वाटले होते की, विदर्भ वैधानिक विकास महामंडळाला काहीतरी भरीव तरतूद मिळेल,पण तसे झालेले नाही.

महसूल व वन विभाग, पृष्ठ क्रमांक 8,बाब क्रमांक 8, - राज्यात शेतकऱ्यांच्या मोठ्या संख्येने आत्महत्या होत आहेत, त्यांच्या कुटुंबाना मदत देण्यासाठी तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधा पोहोचलेल्या शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी फक्त 114 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. खरे म्हणजे ही मागणी 200 कोटी रुपयांपेक्षा जास्त असणे आवश्यक होते.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये....

सभापती महोदय, या सरकारकडून नागपूरच्या अधिवेशनात 7 हजार कोटी रुपयांची मदत करण्याबाबत घोषणा करण्यात आली होती. परंतु त्यापैकी प्रत्यक्षात किती रकमेचे वाटप झाले हा संशोधनाचा विषय आहे.

महोदय, बाब क्रमांक-9, अंतर्गत 3 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. तसेच बाब क्रमांक-10, पृष्ठ क्रमांक-13 अंतर्गत वनस्पतीवर संशोधन करण्याचा प्रकल्प तयार करणे हे शासनाचे कर्तव्य असल्याचे नमूद केले आहे. महोदय, नागपूरमध्ये सतपुडा बॉटीनिकल गार्डन हे आमच्या सरकारच्या काळात झाले आहे. परंतु त्यासाठी एक रुपयाचा सुध्दा निधी ठेवण्यात आलेला नाही. महोदय, हल्ली लोक आयुर्वेद पध्दतीच्या उपचारावर जास्त भर देतात. होमिओपॅथी आणि ॲलोपॅथीपेक्षा आयुर्वेदीक उपचार पध्दती ही शरीराला लाभदायक आहे. परंतु त्या बाबतचा विचार या पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आलेला नाही. माझी विनंती आहे की, नागपूरच्या सतपुडा बॉटीनिकल गार्डनसाठी किमान 2 कोटी रुपयांची तरतूद करावी.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक-13, बाब क्रमांक 10 च्या अनुषंगानेच सांगू इच्छितो की, राष्ट्रीय आयुष अभियान औषधी योजनेसाठी 4 कोटी रुपयांचे जे प्रावधान करण्यात आलेले आहे ते केंद्र पुरस्कृत आहे. यामध्ये राज्य शासनाचा एकही पैसा नाही. केंद्र सरकारकडून निधी आल्यानंतर ही योजना राबविण्यात येईल असे सरकारचे म्हणणे आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक-13, बाब क्रमांक-12 अंतर्गत पशु वैद्यकीय दवाखान्यांचे बळकटीकरण करण्यासाठी 2 कोटी 9 लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. माझी मागणी आहे की, शासनाने प्रत्येक तालुक्यात नवीन पशु वैद्यकीय दवाखाने निर्माण करावेत आणि त्यासाठी अतिरिक्त निधीची मागणी करावी.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी पृष्ठ क्रमांक-17, बाब क्रमांक-14 वर आपले म्हणणे मांडले. महोदय, हे सरकार शिक्षकांचे पगार थांबवून त्यांना पुरस्कार देण्याचे स्वप्न पाहत आहे. आजही राज्यातील 1300 शिक्षकांना पगार मिळत नाही. प्रलंबित पगाराचे भिजत घोंगडे ठेवून शासनाने नव्याने हा पुरस्कार सुरु केला आहे. महोदय, ज्यांना पुरस्कार द्यावयाचा असेल त्यांना द्यावा. पण जे शिक्षक विना अनुदानित तत्त्वावरील शाळांमध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

काम करीत आहेत त्यांना सुध्दा कामावर घ्यावे. तसेच आपले राज्य दुसऱ्या राज्याच्या तुलनेत क्रमांक-1 चे कसे होईल हा प्रयत्न राज्य सरकारने करावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, शिक्षणाचे पहिले धोरण सर्वपल्ली डॉ.राधाकृष्णन यांनी सुरु केले. परंतु राज्यात अजूनपर्यंत क्रीडा धोरण नाही. त्यामुळे या राज्याचे क्रीडा धोरण तयार करणे आवश्यक आहे. आपल्या राज्यातून आंतरराष्ट्रीय खेळाडू कसे निर्माण होतील याकडे माननीय क्रीडा मंत्र्यांनी लक्ष दिले पाहिजे. महोदय, या वर्षीच्या प्रजासत्ताक दिनी आपल्या राज्याच्या वारकरी पथकाला दिल्लीमध्ये उत्कृष्ट देखाव्याचे पारितोषिक मिळाले. परंतु या राज्यातून एकही आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण झाला नाही की ज्याने आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये नाव कमविले आहे. माझी या निमित्ताने मागणी आहे की, सरकारने लवकरात लवकर क्रीडा धोरण तयार करावे.

सभापती महोदय, नगर विकास विभागाच्या बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक-21 च्या अनुषंगाने सांगतो की, राज्याला 775 कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकारकडून मिळेल आणि त्यानुसारच खर्च करण्यात येईल असे नमूद केले आहे. राज्य शासनाच्या तिजोरीत खडखडाट आहे. आपण केंद्र सरकारकडे मोठ्या आशेने पाहत असतो. परंतु वारंवार केंद्र सरकारकडे पाहून आपल्या राज्याचा विकास होऊ शकत नाही. सन्माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांना मी आणि सन्माननीय सदस्य श्री.अनिल सोले भेटलो होते. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राला निधी देणार नाही. पूर्वी राज्यांना 30-32 टक्के निधी देत होतो. परंतु आता 42 टक्के निधी देत आहोत.

श्री.अनिल सोले : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून सन्माननीय सदस्यांच्या वक्तव्याला माझी हरकत आहे. माननीय पंतप्रधानांनी महाराष्ट्राला निधी देणार नाही असे म्हटलेले नाही. त्यांनी फक्त एवढेच सांगितले की, पूर्वी केंद्र सरकार राज्यांना 32 टक्के निधी देत होते. आता 42 टक्के निधी देत आहे. त्यांनी असेही सांगितले की, मी सुध्दा एका राज्याचा मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे. त्यामुळे राज्याचे काय प्रश्न असतात हे मला माहीत आहे. त्या दृष्टिकोनातून राज्यांना मोठ्या प्रमाणावर निधी थेट देत आहोत. 68 टक्क्यापर्यंत निधी देऊ असेही त्यांनी सांगितले आहे.

UNCORRECTED COPY // NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, निश्चितच जो माणूस सत्य बोलतो तो आम्हाला चांगला वाटतो. त्यांच्यावर आमचा विश्वास आहे. शिवाय ते देशाचे पंतप्रधान आहेत.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, त्यांनी आपले भाषण आटोपते घ्यावे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, 775 कोटी रुपये निधी केंद्र सरकारकडून मिळाल्यानंतर राज्य सरकारचे 245 कोटी रुपये खर्च करण्यात येतील असे म्हणणे योग्य नाही. मी सांगू इच्छितो की, हा निधी सुध्दा राज्याच्या विकास कामांसाठी कमी पडतो आहे. त्यामुळे या निधीमध्ये वाढ करावी.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मागणी क्रमांक-57, बाब क्रमांक-36 च्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, या पुरवणी मागण्यांमध्ये केवळ आश्रमशाळांसाठी 13 कोटी 16 लाख रुपयांच्या थकबाकीची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय कोणतीही मागणी केली नाही. तसेच इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी एक रुपयांची सुध्दा मागणी करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. नागपूरचा थिम पार्क हा नागपूर शहराचा दागिना आहे. परंतु त्याला सुध्दा पुरवणी मागण्यांमध्ये स्थान नाही. शाहू महाराज आणि आंबेडकर यांचे संयुक्त....

उप सभापती : सन्माननीय सदस्य आपली वेळ संपलेली आहे. आता माननीय मंत्र्यांनी उत्तरास सुरुवात करावी.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, वेळेची मर्यादा लक्षात घेऊन मी माझे भाषण येथेच संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रवीण पोटे-पाटील (सार्वजनिक बांधकाम (सावर्जनिक उपक्रम वगळून) राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामहरी रूपनवर, जयंत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री प्रा.जोगेंद्र कवाडे, हेमंत टकले, हरिसिंग राठोड, ॲड.निरंजन डावखरे, जगन्नाथ शिंदे, अनिल सोले, गोपीकिसन बाजोरिया, सर्वश्री ख्वाजा बेग, नागो गाणार, प्रकाश गजभिये यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्यांवर आपले विचार व्यक्त करुन महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत.

महोदय, मी विनंती करु इच्छितो की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 21, 22 व 23 अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या एकूण तीन पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, उद्योग विभागाच्या मागणी क्रमांक के-3 अंतर्गत बाब क्रमांक 30 खाली दर्शविण्यात आलेली 2 कोटी 32 लाख 10 हजार रुपयांची पुरवणी मागणी सभागृहाने मंजूर करावी, अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सर्व सूचनांचा शासनाकडून सहानुभूतीपूर्वक आणि सकारात्मक विचार होईल, असे या ठिकाणी स्पष्ट करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, वित्त विभागाच्या नियोजन संबंधित बाब क्रमांक 38 आणि वित्त विभागाशी संबंधित बाब क्रमांक 18, 19 व 20 या पुरवणी मागण्या सभागृहाने संमत कराव्यात, अशी मी विनंती करतो.

महोदय, या पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, हेमंत टकले, प्रकाश गजभिये इत्यादी सदस्यांनी ज्या सूचना केल्या, त्या सर्वांचा विचार होईल एवढेच या निमित्ताने सांगतो.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्ही मांडलेल्या विषयांच्या संदर्भात माननीय मंत्री उत्तर देत असतील तर खूप बरे होईल.

श्रीमती पंकजा मुंडे (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, सभागृहातील 90 टक्के सन्माननीय सदस्य निघून गेले आहेत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांचा आग्रह आहे म्हणून मी त्यांनी मांडलेल्या मुद्यांविषयी बोलते. सन्माननीय सदस्यांनी महिला व बाल विकास विभागाच्या बाब क्रमांक 56 वर मत मांडले आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने 26 कोटी रुपये इतका नियतव्यय ठेवला आहे. अंगणवाड्या नसतील तर त्यांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुविधा मग त्या बालकांच्या, मातांच्या, सोसायटींच्या विषयी असोत त्या होणार नाहीत. त्यामुळे शासनाने अंगणवाड्या करण्याचाच निर्णय घेतला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अंगणवाड्यांच्या माध्यमातून महिलांशी संबंधित असलेले विषय तेथे हाताळले जावेत. महिलांना प्रशिक्षण देण्याचे, मार्गदर्शन करण्याचे काम अंगणवाड्यांच्या माध्यमातून झाले पाहिजे. मी सांगू इच्छिते की, ती कामे ऑलरेडी बऱ्याच प्रमाणात तेथे होतात. अंगणवाड्यांच्या ठिकाणी माता समिती असते. तेथे गर्भधारणा झालेल्या महिलांना मार्गदर्शन दिले जाते. अंगणवाड्यांतील सेविका गर्भधारणा झालेल्या व स्तनदा मातांना पोषण आहाराविषयी तेथे मार्गदर्शन करीत असतात. मुलांचे डाएट काय असावे या विषयी देखील तेथे मार्गदर्शन होत असते. परंतु तरीही शासन तेथील मातांसाठी, महिलांसाठी विस्तृत प्रमाणात प्रॉपर्ली डिझाईन करून एक कोर्सच अंगणवाड्यांतून राबवित आहे. येणाऱ्या काळात नक्की त्या विषयी सकारात्मक विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर जिल्ह्यामध्ये बचत गटांना टीएचआर पुरवठा करण्याबाबत सांगितले आहे. मी या संदर्भात सांगू इच्छिते की, सदर बाबतीत उच्च न्यायालयात एक रिट पिटिशन दाखल झाली होती. त्यामुळे तेथील डेप्युटी सीईओंनी यासाठी परवानगी दिली नव्हती. आता त्याचा निकाल लागला आहे त्यामुळे तालुकास्तरीय समिती स्थापन करून बचत गटांना काम देण्याच्या संदर्भातील निर्णय घेणार आहोत. सभापती महोदय, इतर सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अंगणवाडी सेविका व शिक्षिका यांच्या बाबतीतही प्रश्न आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांच्या मानधनात, वेतनात वाढ व्हावी ही मागणी बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित आहे. 8 मार्चला आलेल्या भव्य मोर्चात माननीय मुख्यमंत्री, माननीय वित्तमंत्री आणि मी स्वतः महिला व बालविकास मंत्री म्हणून वाढ ऑफिशिअली जाहीर केली आहे. मी मागेही या संदर्भात सभागृहात सांगितले आहे की, ती वाढ पूर्वी जाहीर झाली तेव्हा पूर्वीच्या शासनाच्या वित्त विभागाने त्याला परवानगी दिली नव्हती, त्यामध्ये इररेग्यूलॅरिटीज निर्माण झाल्या आहेत. आता वित्त विभागाने 176 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस या महिला व बालविकासाच्या कणा आहेत. आता त्यांच्या वेतनवाढीचा निर्णय आर्थिक तरतुदीसह जाहीर केला आहे. आता त्यांचा विषय सुरळीत होणार आहे.

सभापती महोदय, सन 2014-15 या वित्तीय वर्षाच्या मागणी क्रमांक एल अंतर्गत बाब क्रमांक 32, 33, 34 च्या योजनेतर खर्चासाठी 102 कोटी 88 लाख 35 हजार रुपये आणि बाब क्रमांक 56 साठी 26.75 कोटी इतक्या रकमेच्या विभागाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी, अशी मी विनंती करते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे (कृषी, सार्वजनिक आरोग्य, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : सभापती महोदय, कृषी विभागाच्या पृष्ठ क्रमांक 13 वरील बाब क्रमांक 10, 11 साठी प्रस्तावित एकूण रुपये 2000 इतक्या खर्चाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहास विनंती करीत आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात मते व्यक्त केली आहेत. कृषी विभागाच्या संदर्भात ज्या सन्माननीय सदस्यांनी मते व्यक्त केली ते बहुतेक सन्माननीय सदस्य गैरहजर आहेत. त्यामुळे मी त्या संदर्भात उत्तर देत नाही. मी एवढेच सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांच्या सूचना व्यवहार्य असतील तर निश्चितपणे त्या तपासून त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 39, 40 या दोन मागण्या आहेत. या रुपये 1000 इतक्या लाक्षणिक पुरवण्या मागण्या आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात मते व्यक्त केली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी अलिबाग येथील सीटी स्कॅन मशिन व ऑपरेशन थिएटरच्या संदर्भात मत मांडून ऑपरेटरची बदली करण्याच्या संदर्भात विषय उपस्थित केला आहे. बदली करताना त्याच्या जागेवर दुसरा ऑपरेटर आल्याशिवाय तेथील ऑपरेटर बदलू नये असे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांची मागणी योग्य आहे. सीटी स्कॅन मशिन मोठे आहे. मशिन लोकांच्या सेवेसाठी दिले आहे. त्यामुळे सीटी स्कॅन मशिन ऑपरेटरविना बंद ठेवता कामा नये. निश्चितपणे त्या संदर्भात दखल घेतली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामहरी रुपनवर यांनी स्वाईन फ्लूच्या संदर्भात विषय मांडून सोलापूर रुग्णालयात पुरेशी औषधे उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात लक्ष वेधले आहे. मी सांगू इच्छितो की, वैद्यकीय महाविद्यालय असले तरी तेथे टॉमिफ्लूचा पुरवठा पुरेसा केला आहे, तेथे रुग्णांची काळजी घेतली जाते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांनी स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचा पगार झालेला नाही असे म्हटले आहे. मी सांगू इच्छितो की, मनपाने ठराव केला आहे आणि त्या माध्यमातून त्यांनी सांगितले आहे की, या कर्मचाऱ्यांचा पगार दिला पाहिजे. मी सांगू इच्छितो की, जोपर्यंत ते कर्मचारी शासनाच्या सेवेत दाखल होत नाहीत तोपर्यंत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे ....

त्यांचा पगार देणे सयुक्तिक होणार नाही. दिनांक 30 जानेवारी, 2015 च्या आदेशान्वये शासनात समावेश केला असल्यामुळे आता पुरवणी मागण्या मंजूर होताच त्या कर्मचाऱ्यांचा पगार देण्याच्या संदर्भात शासन स्तरावरून कार्यवाही होईल.

सभापती महोदय, पालघर जिल्ह्यात स्वाईन फ्लू च्या संदर्भात काळजी घेण्याची आवश्यकता आहे. जव्हार, पालघर, वाडा, विक्रमगड, तलासरी या ठिकाणी व्हेंटिलेटर, आयसीयू यांच्या सारख्या सुविधा देण्यात येतील. रूग्णाला आयसीयूमध्ये ट्रान्सफर करायचे असेल तर पालघरमध्ये सुध्दा करण्यात येते आणि त्यांना सुविधा देण्यासाठी कार्यवाही करण्यात येते. अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला आहे. सन्माननीय सदस्यांच्या बाबी लक्षात घेऊन संबंधितांना योग्य सूचना देण्यात येतील. मी सन्माननीय सदस्यांचा आभारी आहे. सभागृहाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहास विनंती करतो.

सभापती महोदय, गृह विभागाशी संबंधित बाब क्रमांक 1, 2 व 4 आहेत. सदर बाबींवरील लाक्षणिक पूरक मागण्या एकूण रूपये 4000 च्या आहेत. मी सदर पूरक मागण्यांना मंजुरी देण्यासाठी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करतो. सन्माननीय सदस्यांनी विविध विषय उपस्थित केले आहेत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गणवेषाशी संबंधित निधीच्या संदर्भातील विषय उपस्थित केला. काही निधी उपलब्ध होता. सर्व पोलिसांच्या गणवेषासाठी तो निधी अपुरा होता. त्यामुळे यासाठी तत्काळ निधी उपलब्ध करण्यासाठी या विषयाचा पुरवणी मागणीमध्ये समावेश केला आहे. दिनांक 31 मार्चपूर्वी हा निधी खर्च करण्यासाठी गृह खात्याच्या माध्यमातून सर्व प्रयत्न केले जाणार आहेत.

सभापती महोदय, फॉरेन्सिक लॅबोरेटरीचा देखील विषय आहे. राज्यातील रेट ऑफ कन्व्हिक्शन वाढविण्याच्या दृष्टीने 9 फॉरेन्सिक लॅब राज्यात कार्यरत आहेत. माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री यांनी या संदर्भात अतिशय चांगली भूमिका घेऊन कन्व्हिक्शन रेट वाढण्याच्या संदर्भात सकारात्मक भूमिका व्यक्त केली आहे. सभागृहात नागपूर, कलिना लॅबचा उल्लेख केला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे ....

आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक स्तरावर 36 आणि आयुक्तालय स्तरावर 9 असे 45 फॉरेन्सिक सपोर्टिंग मोबाईल युनिट निर्माण करीत आहोत आणि त्यामध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी रायगड जिल्ह्यातील आगल्याची वाडी आणि कमळपाडा या गावात वाळीत टाकण्याचे प्रकार वाढले असल्याबाबतचा एक मुद्दा उपस्थित करून या संदर्भात एक बैठक आयोजित करावी, अशी विनंती केली होती. निश्चितपणे या अधिवेशन काळातच अशा प्रकारची बैठक आयोजित करण्यात येईल आणि संबंधितांना योग्य त्या सूचना देण्याच्या संदर्भात कार्यवाही करू.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्था आणि स्वतंत्र कार्यभाराबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी त्यांचे या गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, या राज्यामध्ये पहिल्यांदाच, अनेक दिवसानंतर मुख्यमंत्री महोदयांकडे गृह विभागाची जबाबदारी असल्यामुळे या विभागासंदर्भात कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडेच गृह विभाग असल्यामुळे अन्य विभागांप्रमाणे कॅबिनेट मंत्री मग मुख्यमंत्री अशा प्रकारे प्रकरणांचा प्रवास न होता एकाच वेळी ही सर्व प्रोसेस होते व त्यामुळे या विभागाला जलद गतीने न्याय मिळतो. स्वतः मुख्यमंत्री महोदय लॉयर आहेत, मी प्रोफेसर आणि आमचे सहकारी राज्यमंत्री डॉक्टरेट आहेत. त्यामुळे गृह विभागाचा स्वतंत्र प्रभार एखाद्या मंत्री महोदयांकडे असावा, असा जो मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे, त्याबाबत एवढेच सांगतो की, मुख्यमंत्री महोदय स्वतः अतिशय गंभीरतेने आणि संवेदनशीलतेने या खात्याचा कारभार सांभाळत आहेत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांवरील भार थोडा कमी व्हावा, अशी सदिच्छा मी व्यक्त केली होती.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या सदिच्छेबद्दल मी त्यांचे आभार मानतो आणि ते आमची काळजी करीत आहेत, याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी एसआरपीएफ मधील सिव्हिल स्टाफच्या सुटीबाबतचा एक प्रश्न उपस्थित केला होता. मी स्वतः एसआरपीएफ कॅम्पला भेट दिली आहे. आपण त्यांची स्पेशल भरती करीत नाही. कॅम्पमधीलच ते कर्मचारी असतात. ते कॅम्पमध्येच रहात असतात. त्यामुळे सुटीच्या बाबतीत वेगळे धोरण आपल्याला स्वीकारता येणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे.....

सभापती महोदय, गृह विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी आपल्या माध्यमातून सभागृहाला विनंती करतो.

सभापती महोदय, पणन विभागाच्या बाब क्रमांक 47 अन्वये योजनांतर्गत योजनेसाठी 74 लाख 62 हजार एवढ्या रकमेची पुरवणी मागणी सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. या विभागा संदर्भात कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला नाही. तथापि, सन्माननीय सदस्यांनी काही पत्रव्यवहार केला तर निश्चितपणे त्याची दखल घेण्यात येईल. या विभागाच्याही मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी आपल्या माध्यमातून मी विनंती करतो आणि थांबतो.

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री) : सभापती महोदय, शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, वैद्यकीय शिक्षण या विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. या विभागाचे काम करीत असताना स्वाभाविकपणे या सर्व मुद्यांचा, सूचनांचा उपयोग होणार आहे.

सभापती महोदय, शिक्षक वेतनवाढीपासून वंचित आहेत, आदर्श शिक्षक नेमले जातात परंतु, त्यांना अनेक वर्ष सहाव्या वेतन आयोगाच्या अटीमुळे दोन वेतनवाढी मिळत नाहीत, असा मुद्दा आपण स्वतः उपस्थित केला आहे. नवीन सरकार आल्यानंतर 1 लाख रुपये देण्याचा निर्णय आपण घेतला आहे आणि तो निर्णय आपण ताबडतोब अंमलात आणीत आहोत. तरीही मधल्या काळातील शिक्षकांचे काय, असा प्रश्न निर्माण होतो. स्वाभाविकपणे या विषयामध्ये अर्थ विभागाशी चर्चा करून त्या शिक्षकांना एक तर दोन वेतनवाढी मिळाल्या पाहिजेत किंवा 1 लाख रुपये मिळाले पाहिजेत, याबाबतचा निर्णय आम्ही सकारात्मक पध्दतीने घेऊ.

सभापती महोदय, पदवीधर ग्रंथपालांना योग्य ती वेतनश्रेणी देण्याबाबतचा मुद्दाही आपण उपस्थित केला आहे. मुळात ग्रंथपाल म्हणजे पुस्तकांचा कस्टोडिअन ही कल्पनाच चुकीची आहे. ग्रंथपालाचे काम हे विद्यार्थ्यांना पुस्तके वाचण्यास प्रेरणा देण्याचे आहे. ग्रंथालयातील पुस्तके विद्यार्थ्यांकडून वाचली जातील, हे पाहणे गरजेचे असून या दृष्टीकोनातून ग्रंथपाल म्हणजे पुस्तक वाचनाचा शिक्षक आहे. अशा प्रकारची भूमिका आपण येणाऱ्या काळात ग्रंथपालांच्या बाबतीत घेणार आहोत. सध्या त्यांच्या वेतनश्रेणीबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयाचा निकाल आल्यानंतर आपण त्याबाबतचा निर्णय घेऊ. सद्यःस्थितीत ग्रंथपालांच्या टेबलवर पुस्तके मांडलेली असतात, विद्यार्थी येतात, पुस्तके नेतात, नेत नाहीत, अशी परिस्थिती आहे. माझ्या दृष्टीने ग्रंथालयात असलेली पुस्तके ग्रंथपालांनी विद्यार्थ्यांना वाचायला दिली पाहिजेत, त्यांना वाचनाची आवड लावली पाहिजे, त्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. अशा प्रकारे ग्रंथपालांची भूमिका असली पाहिजे. ज्यावेळी अशा प्रकारचा निर्णय आपण घेऊ, त्यावेळी वेतनश्रेणीचाही विचार आपण नक्की करु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, मूल्यांकनास पात्र ठरलेल्या शाळा व तुकड्यांना लवकरात लवकर अनुदान द्यावे, अशा प्रकारचा मुद्दा आपण आणि सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी मांडला आहे. याबाबतची प्रक्रिया आपण सुरु केली आहे. टप्प्याटप्प्याने 20 टक्के, 40 टक्के, 60 टक्के, 80 टक्के अशा पध्दतीने आपण अनुदान देणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी देखील एक मुद्दा उपस्थित केला होता. परंतु, त्या आता सभागृहात उपस्थित नाहीत.

सभापती महोदय, या निमित्ताने एक बाब मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, मी तीन वर्षे विरोधी पक्ष नेता होतो आणि जवळ जवळ 9 पुरवणी मागण्यांवरील चर्चेत मी भाग घेतला आहे. परंतु, एकाही पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या उत्तराला मी अनुपस्थित नव्हतो. आज काय झाले माहीत नाही. कदाचित त्यांच्या पक्षाची बैठक असू शकेल किंवा कालच्या विजयाचे सेलेब्रेशन असेल पण अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एकही सदस्य सभागृहात उपस्थित नाही, असे कसे होऊ शकते ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु होताना सभागृहात आठ मंत्री उपस्थित होते. परंतु, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी गोंधळ घातला आणि सभागृह स्थगित करण्यास आपल्याला भाग पाडले. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी मोठमोठी भाषणे ठोकली. पण त्या संदर्भातील मंत्र्यांच्या उत्तरासाठी सभागृहात थांबायचे नाही, हे बरोबर नाही.

सभापती महोदय, विधानसभेत ज्यावेळी अशा प्रकारचा प्रसंग घडला होता त्यावेळी सन्माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील अध्यक्ष होते. त्यावेळी असा निर्णय झाला होता की, जे सदस्य सभागृहात उपस्थित नसतील त्यांच्या मुद्दांना मंत्री महोदयांनी उत्तर देण्याची आवश्यकता नाही. मला वाटते, आपल्या सभागृहानेही असाच निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. ज्या सदस्यांना उत्तराची अपेक्षा असते, ते सदस्य सभागृहात थांबतात आणि ज्यांना नसते ते निघून जातात. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी जरूर भाषणे करावीत. आजही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

त्यांनी चांगली भाषणे केली आहेत आणि त्याचे स्वागत आहे. पण ते जर उत्तराच्या वेळी सभागृहात उपस्थित नसतील तर त्यांच्या प्रश्नांना मंत्री महोयांनी उत्तरे दिलीच पाहिजेत, असे नाही. त्यांच्या मुद्यांची नोंद सरकार घेतच असते. मला वाटते आपण हा निर्णय घ्यावा.

तालिका सभापती : ठीक आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सचिवांना प्राधिकृत करुन अनुदान मंजूर करण्याबाबत संबंधित संघटना आणि आपल्या बरोबर माझी चर्चा झाली होती. येत्या काळात त्याचाही आम्ही विचार करणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर सभागृहात उपस्थित आहेत. कुशल कामगार निर्माण करण्यासाठी आयटीआयच्या धोरणात बदल केला पाहिजे, असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला आहे. कुशल कामगारांसाठी धोरण ठरविण्याबाबत कालच मुख्यमंत्री महोदयांसमवेत मी स्किल डेव्हलपमेंटच्या संदर्भात प्रेझेंटेशन घेतलेले आहे. आपल्या राज्यातील विविध खात्यात असलेली स्किल डेव्हलपमेंट एका खात्याअंतर्गत आणून त्या खात्यासाठी आपण एका प्रधान सचिवांनी नेमणूक केली आहे. प्रायव्हेट, गव्हर्नमेंट आणि प्रायव्हेट-पब्लिक अशा तीन प्रकारच्या आयटीआयच्या माध्यमातून ही योजना आपण नक्की राबविणार आहोत.

सभापती महोदय, ईबीसी सवलत दीड लाख रुपयांपर्यंत वाढवावी, असाही मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर यांनी उपस्थित केला आहे. आता दिनांक 30 मे, 2014 च्या शासन निर्णयान्वये ही मर्यादा 15 हजार रुपयांवरुन 1 लाख रुपये केली आहे. आताच आपण ही मर्यादा 15 हजार रुपयांवरुन 1 लाख रुपये केली असल्यामुळे लगेच ती दीड लाख रुपये करणे संयुक्तिक ठरणार नाही. ही वाढ करण्यासाठी आणखी कालावधी जाणे योग्य ठरेल.

सभापती महोदय, आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी क्रीडा विभागावर बोलत असताना गावोगावी स्विमिंग पुलची व्यवस्था करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. एकदा विद्यार्थी पाण्यात पोहायला शिकला की, तो आयुष्यातील अडचणीरुपी सागरातही पोहायला शिकतो आणि यशस्वी होतो, अशी त्यांची मानसिकता आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी आणखी एक महत्त्वाचा विषय मांडला आहे. तालुका स्तरावर आपण क्रीडा संकुले बांधतो. ही क्रीडा संकुले बांधण्यासाठी निधी मिळतो. पण पुढे त्याची निगा राखली पाहिजे, ते होत नाही. मग त्या ठिकाणी गर्दुल्ले, दारूडे यांचे अड्डे तयार होतात. त्या ऐवजी एखादे महाविद्यालय, साखर कारखाना, काही धर्मादाय संस्था असतील तर सरकारने आपली मालकी ठेऊन, काही अटी घालून ही संकुले त्यांना चालविण्यासाठी दिली पाहिजेत. जनतेला ही संकुले खुली राहतील, हेही पाहिले पाहिजे. समजा नाशिक विभागातील काही तालुक्यांसाठी ॲथेलेटिक्सचा स्पेशल कोच नेमला पाहिजे, पश्चिम महाराष्ट्रामध्ये कुस्तीचे स्पेशल वस्ताद, गुरु पहिलवान नेमले पाहिजेत, अशा अटी त्यांना घालता येतील.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे...

अशा प्रकारे वेगवेगळ्या खेळांचे कोच नेमून त्यांना तयार करण्याची जबाबदारी महाविद्यालये, साखर कारखाने, क्रीडा संस्था किंवा इतर संस्थाना देण्याचा विचार शासन सकारात्मक दृष्टीकोनातून करीत आहे.

सभापती महोदय, प्रा.जोंगेंद्र कवाडे यांनी विमुक्त जाती, भटक्या जमाती यांच्यातील मुलांची गुणवत्ता हेरुन देशी खेळांकडे जास्त लक्ष द्यावे असा मुद्दा उपस्थित केला होता. खो-खो, कबड्डी, कुस्ती, हॉलिबॉल या चार खेळांच्या स्पर्धासाठी शासनाकडून वर्षाकाठी 50 लाख रुपये देण्यात येतात या स्पर्धा वर्षातून एकदा भरविण्यात येतात. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे मला मान्य आहे, आता 2016 मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धासाठी खेळाडू तयार करुन अपेक्षित यश मिळणार नाही. परंतु 2020 मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत महाराष्ट्रातील 20 खेळांडूना मेडल्स मिळावेत यासाठी क्रीडा विभाग कामाला लागला आहे. आता पासून या प्रकारचे क्रीडापटू हेरुन त्यांना पुढील सहा वर्षात आंतरराष्ट्रीय कोच व प्रशिक्षणाच्या माध्यमातून तयार करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील खेळाडूंना पुढे नेण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी मिळून केला पाहिजे. केवळ सरकारने हे काम करावे असे नसून विविध संघटना, संस्था आपल्यासारखे जागरुक लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे. हो खेळाडू कोणत्याही पक्षाचा किंवा कोणत्याही सरकारचा नसतो. तो आपल्या महाराष्ट्राचा आहे, अशा प्रकारचे प्रयत्न आपण सर्वांनी पुढील काळात केले पाहिजेत. क्रीडा क्षेत्राला जास्तीत जास्त निधी मिळावा असा उल्लेख करण्यात आला होता. कॉमन वेल्थ गेम्ससाठी मिळालेल्या निधीतून काही निधी या कामासाठी वापरीत असतो. एशियन गेम्समध्ये आपणाला दहा पदके मिळाली आहेत. केरळमध्ये चौथे स्थान मिळाले आहे. तेथे 123 पदके मिळाली आहेत, तरी देखील ही बाब पुरेशी नाही, यामध्ये आणखी वाढ केली पाहिजे, हे मला मान्य आहे, त्या प्रमाणे शासन प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी प्रत्येक तालुक्यात व जिल्ह्यात क्रीडा संकुलाबरोबर विभागीय स्तरावर क्रीडा संकुले तयार करण्यासंदर्भात मास्टर प्लॅन तयार करण्यात यावा असे सूचित केले आहे. केमिस्ट असोसिएशन अत्यंत तगडी आहे, चार-पाच क्रीडा संकुले केअर टेकरसाठी द्यावयाची आहेत, या असोसिएशनकडे क्रीडा संकुले दिली तर ती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे...

अत्यंत व्यवस्थित चालतील. जनतेच्या सेवेतून असोसिएशनला पैसा मिळतो. त्यातून थोडासा खर्च क्रीडा खात्यासाठी करण्यास आपण सांगितला तर आपणाला कोणीही नाही म्हणणार नाही. पाच ते सहा क्रीडा संकुले आपण केअर टेकरसाठी घ्यावीत असे मी आपणाला या निमित्ताने आवाहन करतो. केमिस्ट आणि ड्रगिस्ट असोसिएशनचे आपण प्रमुख आहात. ही असोसिएशन अतिशय चांगले व सकारात्मक काम करते. रुग्णांना देखील ती असोसिएशन मदत करते.

सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांच्या असोसिएशनकडे सहा ते सात संकुले केअर टेकरसाठी देण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्या जिल्ह्यातील क्रीडा संकुल पीएनपी व केमिस्ट असोसिएशनकडे केअर टेकरसाठी देण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी शिक्षकांना एक तारखेला वेतन देण्यात यावे असा मुद्दा उपस्थित केला होता. याबाबत सरकार असा विचार करीत आहे की, एक तारखेला ऑन लाईनद्वारे शिक्षकांच्या खात्यात पगाराची रक्कम जमा व्हावी. काही ठिकाणी शिक्षकांचे वेतन जिल्हा सहकारी बँकांमध्ये जमा आहे, परंतु त्या बँका डबघाईस आल्यामुळे तेथील शिक्षकांचे वेतन अडकते. मंत्रिमंडळाने काल चार जिल्हा बँकाच्या संदर्भात निर्णय घेतला आहे. या जिल्हा बँकाचे लायसन्स रिव्हाईज करण्यात आले आहे. त्यामुळे रायगड जिल्हा बँक वगळता इतर बँकांकडे असा पगार देणे योग्य होणार नाही. कारण शिक्षकांचा पगार थकवून चालणार नाही. त्यामुळे ही कामे राष्ट्रीयकृत बँकाकडे देण्याची कार्यवाही सरकारला करावी लागेल. ज्या खाजगी बँका चांगल्या असतील त्यांच्याकडे शिक्षकांचे वेतन अकाऊंट द्यावे लागेल. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चांगली असेल तर तेथील अकाऊंट कायम ठेवण्यात येतील. ज्या चांगल्या बँका आहेत त्यांच्याकडे शिक्षकांचे अकाऊंट देण्यात येतील.

सभापती महोदय, मराठी भाषा विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विषय उपस्थित केला होता. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा 1 मे पर्यंत मिळावा असे त्यांनी सांगितले आहे. यामध्ये वस्तुस्थिती अशी आहे की, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत लिंग्विस्टीक एक्सपर्ट कमिटीने शिफारस केली आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी व भाषा संवर्धनासाठी 80 कोटी रुपये दिले पाहिजेत अशी आर्थिक तरतुदीची अट शिफारस करताना टाकण्यात आली आहे. मनुष्यबळ, गृह व वित्त विभागात ही फाईल फिरत असून फाईल फिरताना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे...

किती दमछाक होते याची आपणाला माहिती आहे. 27 फेब्रुवारीचे टारगेट ठरविण्यात आले होते. सांस्कृतिक खात्याकडून ते पूर्ण झाले होते. परंतु आर्थिक तरतुदीच्या बाबीमुळे ते पुढे गेले. 1 मे पर्यंतचे टारगेट ठेवण्यास काही हरकत नाही.

त्याचप्रमाणे आयटीआय मधील कंत्राटी निदेशकांना नियमित करण्याचा विषय उपस्थित करण्यात आलेला आहे. ही सर्व प्रक्रिया कायदेशीररित्या पूर्ण करण्यात येणार आहे. शासकीय महाविद्यालयांच्या वसतिगृहांची सुधारणा करणे व संख्या वाढविणे याबाबत शासन सकारात्मक असून कार्यवाही करण्यात येणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार यांनी सन 2011-2012 पासून राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या वेतनाच्या थकबाकीचा मुद्दा उपस्थित केला होता. 289.58 कोटी रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये महाविद्यालयांना उशिरा मान्यता प्राप्त झालेल्या प्राध्यापकांचे वेतन व इतर बाबींचा समावेश आहे. या सर्व बाबींची पूर्तता करण्यात येईल व संबंधित प्राध्यापकांना न्याय देण्यात येईल.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र प्रकाशन समिती व राजर्षी छत्रपती शाहू महाराज चरित्र प्रकाशन समिती यांचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी, असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. सदर समित्यांसाठी वेतन व कार्यालयीन खर्चासाठी सन 2014-2015 मध्ये 33.91 लक्ष रुपये तरतूद केलेली आहे. त्यामध्ये पुढील काळात वाढ करण्यात येणार आहे. समितीने ज्या ज्या मागण्या केल्या आहेत त्या शासनाकडून पूर्ण करण्यात आल्या आहेत.

सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र रत्नागिरी येथे स्थापन होऊन देखील ते कार्यरत नाही असा मुद्दा मांडला होता. रत्नागिरी येथील उपकेंद्र सुरु झाले असून केवळ नगरपालिका, रत्नागिरी यांच्याकडून इमारतीला ओसी मिळाली नाही. त्या इमारतीचे ताबापत्र मिळविण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य व शासन यांनी मिळून हे काम केले तर ते लगेच पूर्ण होऊ शकते. त्यानंतर परिपूर्ण उपकेंद्र सुरु होणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) OO-4

VVK/ प्रथम श्री.रोझेकर... 19:20

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, राज्य प्रशासकीय पूर्व परीक्षा प्रशिक्षण सेवा केंद्र, नागपूर येथे सुरु असून तेथे 60 प्रवेश क्षमता आहे. तेथे उपलब्ध असलेले वसतिगृह, वाचनालय यांच्या सोई सुविधा पाहून ही प्रवेश क्षमता 100 पर्यंत वाढविण्याचा विचार शासन करीत आहे. कोल्हापूर येथे राज्य प्रशासकीय पूर्व परीक्षा प्रशिक्षण केंद्रांची प्रवेश क्षमता 60 असून ही क्षमता देखील 80 किंवा 100 करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर, नाशिक व अमरावती या सहा ठिकाणी आयएएस प्रशिक्षण केंद्र विकसित करण्यात येत आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, स्कील डेव्हलपमेंटच्या संदर्भात मी मुद्दा उपस्थित केला होता, त्याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी जी सूचना केलेली आहे ती मी मान्य करतो. मी सभागृहाला विनंती करतो की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या 46 कोटी 13 लाख 21 हजार रुपये, शालेय शिक्षण विभागाच्या फक्त 1 हजार रुपये, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या 48 लाख 28 हजार 96 रुपये व मराठी भाषा विभागाच्या 6 हजार रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी नव्याने निर्माण झालेल्या पालघर जिल्ह्याला स्वतंत्र पीएलए अकाऊंटबाबत मुद्दा उपस्थित केला होता. पालघर हा जिल्हा ठाणे जिल्ह्यातून वेगळा झालेला असल्यामुळे तेथील सर्व खर्च ठाणे येथील पीएलए अकाऊंटमधून होत आहे. आता आर्थिक वर्ष संपत आले आहे. 1 एप्रिल, 2015 पासून पालघर जिल्ह्यासाठी वेगळा पीएलए अकाऊंट उघडण्यात आले आहे. त्यासाठी कर्मचारी देण्यात येतील. पालघर जिल्ह्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाची स्वतंत्र यंत्रणा देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्या अशी मी विनंती करतो.

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. यातील दोन तीन प्रश्न अत्यंत महत्वाचे आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी एक्साईजबाबत मुद्दा उपस्थित केला होता. 7 कोटी रुपयांची तरतूद आसवनींसाठी करण्यात आली आहे. त्यामुळे ही बाब मला चिंताजनक वाटते, असे त्यांनी म्हटले आहे. हे सात कोटी रुपये दारु दुकानांसाठी किंवा दारु उत्पादकांसाठी नाहीत. नाशिक येथील आसवनींमध्ये द्राक्षांपासून दारु निर्माण करण्यास सुरुवात झाली आहे. बनाना वाईन तयार करण्याचा निर्णय शासन घेत आहे. यासाठी पूरक साहित्य असल्याशिवाय वाईन तयार करता येत नाही.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

कारण, ती दारु नाही. ज्या प्रमाणे द्राक्ष वाईन दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहे त्या प्रमाणे बनाना वाईन संदर्भात शासन निर्णय घेत आहे. ज्यावेळी अशा वाईनच्या कंपन्या सुरु करावयाच्या असतात तर त्यांना शासनाच्या माध्यमातून प्राथमिक स्वरूपाची मदत करण्याचे धोरण फार पूर्वी पासून घेण्यात आलेले आहे आणि यासाठी ही 7 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. याचा अर्थ दारूला प्रोत्साहन देणे किंवा चालना देणे असा होत नाही. दारु उत्पादक वेगळे, विदेशी दारु वेगळी आणि कंपनी लिकर वेगळी आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी वाईन ही दारु नाही, असे सांगितले.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ते मेडिकल उपयोगासाठी असते.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी या संदर्भात त्यांच्या भाषणात उल्लेख केला. डॉ.बंग आणि इतर काही लोकांचे असे म्हणणे आहे की, राज्यातील काही जिल्ह्यात दारु बंदी झाली. महाराष्ट्र दारु मुक्त केव्हा होणार, हा मुख्य मुद्दा होता. मी माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांना विचारु इच्छितो की, वाईन ही दारु नाही, मग दारूच्या दुकानाला वाईन शॉप का म्हणतात, याचे उत्तर आपण द्यावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, वाईन ही दारु नाही असे माननीय श्री.शरद पवार साहेबांनी यापूर्वीच सांगितले होते. ही त्यांचीच व्याख्या होती आणि माझेही तेच मत आहे. मी त्यांच्या मताशी यासाठी सहमत आहे की, अल्कोहल म्हटले की आपल्याला दारु असे वाटते. परंतु, काही औषधांसाठी अल्कोहल लागते. त्यासाठी देखील काही अल्कोहलची निर्मिती होते. रेक्टीफाय स्पिरीट हा त्यामधील एक वेगळा भाग असतो आणि त्यातून दारु तयार करण्याचा एक वेगळा भाग असतो. वाईन हा प्रकार असा आहे की, त्यामध्ये फार कमी प्रमाणात अल्कोहलचे प्रमाण असते, जे औषधीच्या संदर्भात त्यामध्ये अधिक असू शकते. काही मेडिसिन्स अशा आहेत की, वाईनमध्ये 2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

टक्के, 4 टक्के अल्कोहलचे प्रमाण असते तर काही औषधांमध्ये हे प्रमाण 6 टक्के, 7 टक्क्यापर्यंत असते आणि ते शरीरासाठी उपयुक्त असते, असेही या संदर्भात काही डॉक्टरांचे मत आहे. नाशिक विभागात वाईनचे जे कारखाने आहेत त्या कारखान्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आणखी पूरक अशा स्वरूपाचे उत्पन्न मिळाले पाहिजे म्हणून आपण त्यांना शासनाच्या माध्यमातून मदत करण्याची भूमिका घेतो. उलट वाईनवर जी थोडी फार एक्साईज ड्युटी होती ती देखील मागील शासनाने काढून टाकलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, राज्यात मोठ्या प्रमाणावर पशु वैद्यकीय दवाखाने आहेत आणि पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. राज्यात मागील 9-10 वर्षापासून पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जवळपास 50 टक्क्यापेक्षा जास्त जागा रिक्त आहेत. आमचे सरकार सत्तेवर आल्यानंतर आम्ही वारंवार या संदर्भात पाठपुरावा केला. एमपीएससीच्या माध्यमातून या जागा भरण्यासाठी त्यांना विनंती करण्यात आली होती आणि आजच आम्हाला एमपीएससीकडून पत्र प्राप्त झालेले आहे. आपल्याकडे 378 डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. त्यांनी 300 डॉक्टर सिलेक्ट करून आपल्याकडे यादी पाठविलेली आहे. त्यामुळे येत्या महिन्याभरात या 300 डॉक्टरांची सर्व ठिकाणी नियुक्ती होईल. त्यामुळे आता पर्यंत या संदर्भात जी तीव्रता जाणवत होती, ती तीव्रता या माध्यमातून कमी होईल. तसेच, एलडीओ यांच्या जागा कमिशनर यांच्याकडूनच भरल्या जातात आणि त्या संदर्भात एलएसएस, एलडीओंच्या जागा त्यांच्या माध्यमातून भरण्याचा आमचा प्रयत्न राहील.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केली की, गोवंश हत्या बंदी विधेयक आल्यानंतर काय होणार आहे ? सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेब, आपल्यालाही या संदर्भात चिंता आहे. गोवंश हत्या बंदी विधेयक आल्यानंतर काहींनी सांगितले की, खाटीक रिकामे राहतील, आता आपल्याला कोल्हापुरी चप्पल मिळणार नाही, चामडे मिळणार नाही, चामड्याचे कारखाने बंद होतील, पर्स तयार होणार नाहीत. परंतु अशी परिस्थिती नाही. शेवटी,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

भाकड जनावरे घेतली तरी ती कधी ना कधी मरणारच आहेत. आज त्यांना मारण्यापेक्षा निसर्गानेच त्यांना मारले तर ते आजच्या ऐवजी उद्या मरतील आणि चामडे उद्या मिळेल. ही नियमित चालणारी प्रक्रिया आहे, का ही प्रक्रिया आता थांबणार आहे ? गोवंश हत्या बंदी विधेयक आल्यामुळे गायींचे मरणे थांबले आणि आता चामडे मिळणारच नाही, असे तर काही होणार नाही. त्यामुळे त्याचा परिणाम आजच्या ऐवजी उद्या होऊ शकेल. दुसरा प्रश्न असा आहे की, या जनावरांचे तुम्ही काय करणार ? गोवंश हत्या बंदी विधेयक मंजूर करण्यापूर्वी केंद्र आणि राज्य शासनाने या संदर्भात विचार केलेला आहे. या संदर्भात केंद्र शासनाने राज्य शासनाच्या मदतीने गोकुळ ग्राम योजना तयार केलेली आहे. गोकुळ ग्राम योजनेच्या अंतर्गत राज्यातील जेवढ्या भाकड गायी असतील, म्हातारी जनावरे असतील, मग त्यामध्ये बैल देखील आहेत, त्या सर्वांना दत्तक घेण्याची ती योजना आहे. एक हजार जनावरांच्या मागे एका गोकुळ ग्रामला मंजुरी देण्याचा त्यामध्ये उल्लेख आहे आणि एक हजारापेक्षा जास्त जनावरे यासाठी आहेत की, ते छोटे असेल तर तो गुरांच्या छावण्यांसारखा प्रकार होईल. म्हणून मोठ्या जिल्ह्यात दोन-तीन आणि लहान जिल्ह्यात दोन अशा प्रकारे गोकुळ ग्रामसाठी स्थाने निवडून त्या ठिकाणी गायी, भाकड जनावरे राहतील किंवा त्या ठिकाणी दुधाळ जनावरे देखील ठेवण्यास परवानगी आहे. गोकुळ ग्राममध्ये दुधाळ गायी ठेऊ नका असे म्हटलेले नाही. गोकुळ ग्राममध्ये 30-40 टक्के दुधाळ गायी ठेवता येतात, यासाठी मनाई नाही. आम्ही हजार जनावरे मोजू आणि त्यामध्ये काही अंशी केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून त्या जनावरांच्या चाऱ्याची, पिण्याच्या पाण्यासाची व्यवस्था करू त्याच बरोबर, या योजनेमध्ये असेही आहे की, राज्य शासनाकडे यासाठी जागा उपलब्ध नसेल तर शासनाच्या ज्या गायरान जमिनी आहेत त्या जमिनी त्यांना नाममात्र दराने गोकुळ ग्राम योजने अंतर्गत देण्यात याव्यात. त्या ठिकाणी लागून जे वन आहे आणि या वनांमध्ये आपण खाजगी कुरण राखीव ठेवतो. इंग्रजांच्या काळापासून जनावरांच्या चाऱ्यासाठी स्पेशल रिझर्वेशन ठेवलेले असते आणि त्याचा पैसा शासनाच्या माध्यमातून घेतला जातो. गोकुळ ग्राममध्ये ज्या गायी असतील त्यांच्या चाऱ्यासाठी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

फॉरेस्टमधील कुरणांचे जंगल राखीव ठेऊन त्यांना ते पुरविण्याच्या संदर्भातील निर्णय राज्य शासनाला घ्यावयाचा आहे.

सभापती महोदय, जैन संघटना, अहिंसावादी संघटना, एनजीओ यासाठी मोठ्या प्रमाणावर पुढे आलेल्या आहेत आणि ही योजना सुरु होण्यापूर्वीच राज्य शासनाकडे शेकडो अर्ज आलेले आहेत की, तुम्ही एक नावा पैसा देखील आम्हाला देऊ नका. आम्हाला या योजनेत सहभागी व्हावयाचे आहे. अनेक आदरणीय जैन धर्म गुरुंनी मला स्वतः भेटून सांगितले की, आम्हाला पैसे नकोत, आमच्या दृष्टीने पैसा गौण आहे. गायींचे संरक्षण करण्याच्या संदर्भात राज्य शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो आणि आम्ही ती जबाबदारी घेतो. आम्ही भागड गायी मरेपर्यंत सांभाळण्याची जबाबदारी घेतो, अशी भावना अनेक सन्माननीय जैन साधुंनी माझ्याकडे व्यक्त केली. मला सांगण्यास आनंद होतो की, या संदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत असताना मी आजच माननीय केंद्रीय मंत्री श्री.राधामोहन सिंग यांच्याबरोबर चर्चा केली. मी मघाशी सभागृहात येण्यापूर्वी त्यांनी गोकुळ ग्राम योजनेच्या संदर्भातील मंजुरी पाठविलेली आहे. त्यांनी मंजुरी दिलेल्या प्रकल्पांमध्ये पुणे येथील एका प्रकल्पाचा समावेश आहे. दुसरा प्रकल्प आरे येथील आहे आणि तिसरा प्रकल्प दापचेरी येथील आहे. ते आणखी काही प्रकल्पांना मंजुरी देणार आहेत. त्यांनी केंद्र शासनाच्या माध्यमातून या योजनेसाठी जवळपास 90 कोटी रुपये प्राथमिक स्वरुपात देण्याचे मान्य केलेले आहे. म्हणून जनावरांचे काय होणार आहे याची आता चिंता करण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, गोकुळ ग्राममध्ये असणाऱ्या गायींपासून मिळणाऱ्या गोमुत्रावर प्रक्रिया करुन औषध विकणे किंवा त्या ठिकाणी जे शेण मिळेल त्याचा सेंद्रीय खत म्हणून वापर करणे आणि यासाठी बाजारात मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. तेथील जनावरांपासून जे शेण मिळेल ते गोबर गॅस प्लान्टसाठी किंवा गोवऱ्या बनविण्यासाठी वापरता येईल. मुंबई शहरात किंवा अन्य ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गोवऱ्या विकल्या जातात आणि या माध्यमातून जे उत्पन्न मिळणार आहे ते शंभर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

टक्के उत्पन्न त्याच संस्थेला मिळणार आहे. मी मघाशी सांगितले की, यासाठी जमीन लागत असेल तर शासनाच्या माध्यमातून गोकुळ ग्राम योजनेसाठी नाममात्र दराने आपण जमीन देणार आहोत. या योजनेत मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, अशी माझी आपल्याला विनंती आहे. राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत त्यांनी आरे येथील 16 कोटी 93 लाख रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी देऊन पैसा देखील पाठविलेला आहे.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

अमरावतीचा आणखी एक प्रकल्प त्यांनी मंजूर केला आहे. अमरावती येथील पोहरा या ठिकाणी गौळाऊ गायी असा नवीन प्रकल्प मंजूर केला असून त्यासाठी 17.90 कोटी रुपये मंजूर केले आहेत आणि निधी प्राप्त झाला आहे. ताकवडे, पुणे येथे 32.68 कोटी रुपये प्रकल्पास मंजुरी दिली असून दोन्ही प्रकल्प राबवायचे आहेत. तसेच पंढरपुरी म्हशींचे ब्रीड तयार करणे असा कार्यक्रम आहे. त्याकरिता 54.38 कोटी रुपये उपलब्ध करण्यास मंजुरी दिली आहे. ब-याच दिवसापासून वृत्तपत्रात बातम्या येत होत्या. चर्चा खूप झाली आहे. नेमके काय करणार, कातडे मिळणार की नाही, जनावरांचे काय होणार असे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत होते. या दृष्टीकोनातून आम्ही पूर्वतयारी केली होती. गोवंश हत्या बंदी विधेयक 1995 साली मंजूर झाले होते. गोहत्या बंदी विधेयक 1976 साली मंजूर झाले होते. काँग्रेसच्या राजवटीत त्या विधेयकाला मंजुरी मिळाली होती. नव्याने मंजूर झालेले नाही. त्यात फक्त 'गोवंश' शब्द शिवसेना भाजपच्या युती शासनाच्या काळात घातला गेला. हे विधेयक 19 वर्षे दिल्लीमध्ये राष्ट्रपतीच्या मंजुरीसाठी प्रतीक्षेत होते. योगायोगाने आता मंजुरी मिळाली. नवीन काही झाले असा प्रकार त्यामध्ये नाही.

सभापती महोदय, महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, कृषी, फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विकास आणि राज्य उत्पादन शुल्क या विभागाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो. मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या माध्यमातून ज्या काही सूचना करण्यात आलेल्या आहेत त्यांचा सकारात्मक विचार शासनाकडून केला जाईल एवढे सांगतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील (नगरविकास, विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या नगरविकास विभाग, विधी व न्याय विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने चर्चा करीत असताना माननीय सदस्यांनी अनेक मौलिक सूचना केलेल्या आहेत.

माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी पंढरपूर प्राधिकरणाबाबतचा प्रश्न मांडला होता. माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी एनयुएलएम अंतर्गत कौशल्य विकास कार्यक्रमाबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. महाराष्ट्र शासनाने उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत या राज्यस्तरीय स्टेट स्कील डेव्हलपमेंट सोसायटीची स्थापना केली होती. या सोसायटीच्या माध्यमातून राज्याच्या विविध भागात कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याचे ठरविले होते. गेली दोन वर्षे या राज्यातील बीपीएल कुटुंबातील दीड लाख मुलांकरिता प्रत्येकी 15 हजार रुपये निधी केंद्र सरकारकडून दिला होता, तो कौशल्य विकास कार्यक्रमाचा निधी अखर्चित राहिला हे खरे आहे. याकरिता मागील चार महिन्यात मी चार बैठका घेतल्या आणि एक जीआर काढण्यात आला होता. त्यामध्ये राज्य शासनाऐवजी खाजगी संस्था असली तरी त्यांच्यामार्फत उपक्रम राबविला जावा या दृष्टीने एक बैठक घेण्यात आली. अधिकाऱ्यांची बैठक घेऊन एका महिन्याच्या आत याबद्दलचा निर्णय घेण्यात येईल. नगरविकास तसेच विधी व न्याय विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राजे अम्ब्रीशराव अत्राम (आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2014-15 च्या आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलताना माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अतिशय महत्वाची सूचना केली आहे. ज्या धरणाची कामे 70 टक्क्याहून अधिक पूर्ण झाली आहेत त्यांच्या उर्वरित कामांसाठी निधी द्यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. निश्चितपणे शासनाचे तसेच धोरण आहे. हा संपूर्ण निधी सिडकोकडून येणार आहे. या धरणाचे काम करणारी एफ.ए.कन्स्ट्रक्शन ही कंपनी न्यायालयात गेल्यानंतर न्यायालयाने असे आदेश दिले आहेत की, लवादाची निर्मिती करण्यात यावी. त्यानुसार सहा सदस्य समिती नेमली गेली. या धरणाचा खर्च 1934 कोटी रुपये इतका झाला आहे. जोपर्यंत लवादाची समिती निर्णय देत नाही तोपर्यंत एक नया पैसा या कंपनीला द्यायचा नाही असे आदेश हायकोर्टाने दिलेले असल्यामुळे या धरणासाठी पैसा अदा करणे आणि काम करणे यामध्ये अडचण आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : मंत्री महोदयांनी सिंचन क्षेत्राचा अभ्यास केलेला नाही. ठेकेदार न्यायालयात जातात, कामाला वेळ लावतात, विलंब झाल्याबद्दल अधिक क्लेम करतात, व्याज लावतात, हे प्रकार थांबविण्यासाठी त्या ठेकेदाराबरोबर लवादाच्या सदस्यांची बैठक आयोजित करुन त्याचे म्हणणे काय आहे ते ऐकून घ्यावे आणि तडजोडीने प्रश्न मिटविण्यात यावा. अन्यथा 100 कोटी रुपयांऐवजी 300 कोटी रुपये द्यावे लागतील. 90 टक्के काम पूर्ण झाले असून 10 टक्के काम शिल्लक आहे. त्याकरिता 50-60 कोटी रुपये लागणार असतील ते उपलब्ध करुन द्यावेत व काम पूर्ण करुन घ्यावे. अन्यथा 600 कोटी रुपयांचा क्लेम त्याच्याकडून केला जाईल. न्यायालयात जाऊन वाद निर्माण करण्यासाठी अधिकारी त्यांना सपोर्ट करतात. हे प्रकार थांबले पाहिजेत. बाळगंगा धरण पूर्ण झालेले आहे. थोडेच काम शिल्लक आहे. काळू धरण एमएमआरडीएचे आहे. त्याबाबत आपण लक्ष घातले पाहिजे. चर्चेसाठी आम्हाला बोलावण्यात यावे. आमच्या जमिनी संपादित केल्या आहेत. 5-6 गावे विस्थापित झालेली आहेत. तीन वर्षापासून आम्हाला धरणाचे पाणी मिळत नाही. आम्हीच हे प्रकरण उपस्थित केले होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी असा आक्षेप घेतला की मी अभ्यास केला नाही, त्याला माझी सहमती नाही. मी अगदी बारकाईने प्रत्येक प्रकल्पाबाबत अभ्यास करून बोलतो. दिनांक 3.12.2014 रोजी न्यायालयाने आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशाशिवाय आपण काही करणे योग्य नाही. अन्यथा तो न्यायालयाच्या आदेशाच्या अवमान होऊ शकतो. समितीचा निर्णय लवकर घेण्याचा प्रयत्न आहे.

नंतर..2आर.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे...

सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रूपनवर यांनी नीरा देवधर धरणासंबंधात वितरण प्रणाली करण्यासंबंधात सुचविले आहे. आता नवीन भूसंपादन कायदा आला आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना जास्त पैसे मिळतील अशी अशा लागली आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर विरोध आहे. त्यामुळे नवीन भूसंपादन कायद्यानुसार ॲवॉर्ड करावे लागेल. जेथे प्रखर विरोध आहे तेथे कालव्या ऐवजी बंद पाईप लाईनद्वारे पाणी देता येईल काय अशा प्रकारची धोरणात्मक चर्चा सुरू आहे. त्यावर आम्ही निश्चितपणे लवकरात लवकर निर्णय घेणार आहोत. धरणातील, नदीतील पाणी पळविले जाते असे देखील सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. धरणामध्ये पाणी ठेवण्यापेक्षा त्या पाण्याचा वापर झाला पाहिजे. आज भूसंपादन करण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यासंबंधी निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये सरकार आहे. पाणी वाया जाण्या ऐवजी ते नदीमध्ये सोडले तर 30 हजार हेक्टरला पाणी मिळू शकेल. जेव्हा जमिनी मिळतील किंवा बंद पाईप लाईनद्वारे पाणी देण्याची व्यवस्था करण्यात येईल तेव्हा समन्यायी पद्धतीने संबंधित लाभधारकाला पाणी पुरविण्यात येईल. धन्यवाद.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्री) : सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागणी मागणी क्रमांक 6, पृष्ठ क्र.99, लेखाशीर्ष 4215, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, बाब क्र.57 राज्यातील ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजनेसाठी कर्ज रोखे तसेच हुडको कडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी 2014-2015 मध्ये रूपये 212 कोटी 82 लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या सन 2014-15 च्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात.

.....

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्यावतीने सभागृहात सादर केलेल्या सर्व पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी आपल्या वतीने विनंती करतो. या मागण्यांवर बोलत असताना सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या चांगल्या सूचना केल्या आहेत त्याची नोंद घेण्यात आली आहे. तसेच ज्या योजनेसाठी हा निधी सादर केला आहे त्याचे सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्वागत केलेले आहे. मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करतो की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सर्व मागण्या मंजूर कराव्यात.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : मी माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांना विचारू इच्छितो की, आपल्याला काही बोलावयाचे आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : नाही. माझ्या विभागाच्या सर्व मागण्या मंजूर करण्याबाबत मी सभागृहाला यापूर्वीच विनंती केलेली आहे.

तालिका सभापती : ठीक आहे. सन 2014-15 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक बुधवार, दिनांक 18 मार्च 2015 रोजी दुपारी 12.00 पुनः भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 53 मिनिटांनी बुधवार, दिनांक 18 मार्च 2015 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.....

`

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION